शनिवार १८ जानेवारी १९७५ **माणूस** मूल्य एक रुपया

# भ्रष्टाचार, जयप्रकाशांचे आंदोलन आणि साहित्यसंमेलन

◘ संपादक माणूस,

दि. २८ डिसेंबर १९७४ च्या माणूसच्या मुखपृष्ठावर इचलकरंजी साहित्य संमेलन : जयप्रकाश आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करणारा ठराव हवा ! या शीर्षकाखाली आपण जे आवाहन केलं आहे त्यावरून हे पत्र लिहित आहे.

१ : गेले कित्येक दिवस 'भ्रष्टाचार' हा विषय सर्वत्र चर्चिला जात आहे. कारण उघड आहे. भ्रष्टाचाराचे जे हिडीस स्वरूप आपल्याला गेली काही वर्षे विशेष प्रखरतेने जाणवते आहे त्याने समाजातला प्रत्येक माणूस त्रासून गेला आहे. कुठल्याही सामाजिक-आर्थिक व्यवहारात सुलभतेसाठी पैशाचे वंगण ओतले तर काम लवकर होतं हा व्यवहाराचा साधा व सुटसुटीत नियम लहान मुलांनाही ठाऊक झाला आहे. पैशाबरोबर सामाजिक स्थान, सत्ता यांनाही निर्लज्जपणे वापरले गेलेले आपण पाहतो आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे या भ्रष्टाचाराच्या परिणामांची आपण ज्या तीव्रतेने दखल घेतो त्या प्रमाणात भ्रष्टाचाराच्या मुळाशी जाऊन ' चुकचे कोठें ' हे पाहण्याचा प्रयत्न होत नाही. आपण भ्रष्टाचाराचे एकेक सुटे प्रकरण मोठ्या उत्साहाने पाहतो. कोणत्या प्रकरणात कोणी किती पैसे खाल्ले; कोणत्या आमदारांनी आयात परवाने देण्यासाठी मदत केली ह्याची पाळेमुळे खणून काढणे हे लोकशाहीची तत्त्व मानणाऱ्या प्रत्येक माणसाने महत्त्वाचे मानलेच पाहिजे. पण ' भ्रष्टाचार ' या विश्वव्यापी घटनेचा शोध घेण्याचे काम घेण्याचे काम सत्याचा शोध घेऊ पाहणाऱ्याने त्याहूनही महत्त्वाचे मानायला हवे.

भ्रष्टाचाराचे मूळ कशात आहे ? ' माणसाची नीतीमत्ताच आजकाल बिघडली आहे. ' या शब्दात ते कित्येकदा सुचवले जाते. हे उत्तर चुकीचे आहे हे उघड आहे. कारण भ्रष्टाचार वाढतो आहे हेच आपण नीतीमत्ता बिघडली आहे यातून सुचवत असतो. या दोहोंचा कार्यकारणसंबंध नाही. दोन्ही विधानांचा अर्थ एकच आहे.

भ्रष्टाचाराचे उगमस्थान शोधण्यासाठी आपल्याला आजच्या आर्थिक व्यवहाराकडे वळावे लागते. भ्रष्टाचार आजच्या अतिशय मंदगतीने होणाऱ्या आर्थिक विकासाशी निगडीत आहे. पण नुसत्याच मंदगतीचा हा प्रश्न नाही. त्याचबरोबर ज्या प्रकारे हा विकास होतो आहे त्याच्याशीही भ्रष्टाचार निगडीत आहे. एकीकडे पक्क्या मालाची बाजारपेठ आहे, पण त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची चणचण आहे. एकीकडे मोठा औद्योगिक प्रकल्प उभारायचाय पण वीजेचा तुटवडा आहे. किंवा अवजड उद्योगधंद्यातून निघणाऱ्या उत्पादनाशी ग्राहकवस्तूंच्या (कंझूमर गुड्स) उत्पादनाचा मेळ नाही या सर्वांच्यामधून जो असमतोल सतत निर्माण होत असतो त्याच्यातून साठेबाजीला व स्मगलिंगला उत्तेजन मिळत असते.

भांडवलशाही विकासाला भांडवलाची समृद्धी लागते. आपल्याकडे भांडवलाचीच सतत चणचण असल्याने भांडवलगुंतवणूक पुरेशा प्रमाणात होत नाही. त्यामुळे औद्योगिक विकास जलदगतीने होत नाही. त्यामुळे भांडवलाचा साठा जलद वाढत नाही; सरकारी तिजोऱ्यात पैसे वेगाने येत नाहीत. त्यामुळे औद्योगिक विकासासाठी मूलभूत असणाऱ्या गरजा भागवणारे उद्योग व सोयी (उदाहरणार्थ वीज, लोखंड कोळसा व तत्सम इंधन, खनिजे, रस्ते व लोहमार्ग, बंदरांचा विकास) वेगाने उभे राहू शकत नाहीत. त्यामुळे पुन्हा भांडवलशाही लंगडत लंगडत चालू ! हे दुष्टचक्र आहे. हरीतक्रांती यशस्वी कशी होईल ? जर उद्या खरोखरच भांडवलशाही पद्धतीने (शेतांचा मोठा आकार; इरिगेशन; यांत्रिकीकरण हे ओघाने आलेच) शेती व्हायला लागली तर जी मनुष्यशक्ती निकामी होईल तिला कामी लावण्याइतका उद्योगधंद्यांचा विकास आहे का ? तेवढं भांडवल आहे का ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

तेव्हा हे जोपर्यंत साठवणूक आणि त्या अनुषंगाने होणारी भाववाढ अटळ आहे. कारण अपुऱ्या उत्पादनाच्या आधारावरच साठेबाजीचे जंतू वाढत असतात. आणि एकदा हे घडल्यावर भ्रष्टाचार ओघानेच येतो. एखाददुसऱ्या साठेबाजाला फाशी देऊन अथवा तुरुंगात डांबून सुटणारा हा प्रश्न नव्हे.

शासनयंत्रणेत असणाऱ्या भ्रष्टाचाराकडे आता वळू. कल्पना करा की एखाद्या संस्थेने-कंपनीने एखाद्या जागेवर काम करण्यासाठी उमेदवाराकडून अर्ज मागवले. दहा अर्ज आले. त्यातला एकच निवडला जाणार. असेच जर सर्व इंटरव्ह्यूंच्यामध्ये होणार असेल तर नोकरी देणाऱ्या माणसाच्या खुर्चीचा भाव वाढणार. आडमार्गाने काही पैसे द्यावे लागणार किंवा चिठ्ठ्याचपाटचा, ' मोठ्या ' माणसाकडून दबाव वगैरे घाडणारच, जर स्थिती बदलली आणि एका जागेसाठी दहा अर्जाऐवजी दोन अर्ज येऊ लागले तर भ्रष्टाचार त्या प्रमाणातकमी होईल. हेच उदाहरण परवाने देण्यालाही लावता येईल.

थोडक्यात म्हणजे भ्रष्टाचाराचे मूळ शोधायचे असेल तर आपल्या आर्थिक मागासलेपणाचे मूळ शोधायला हवे. विकास जलदगतीने

पृष्ठ २ वर

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १८ जानेवारी | अंक : चौतिसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


## भ्रष्टाचार, जयप्रकाशांचे आंदोलन आणि साहित्यसंमेलन : पृष्ठ १ वरून

का होत नाही; नोकऱ्या मोठ्या प्रमाणावर का उपलब्ध होत नाहीत; अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर का होत नाही या प्रश्नाकडे पहायला हवे. एखाद्या वस्तूची/सोयीची चणचण निर्माण झाली की अधिकाऱ्याच्या खुर्चीची किंमत का वाढते; त्या अधिकाराचेही क्रयवस्तूत रूपांतर का होते इकडे पाहिले पाहिजे.

भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने सहज सुचलेले काही मुद्दे मांडले आहेत. खरे म्हणजे काही ठाम निष्कर्ष काढण्याचा अधिकार अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास करणाऱ्यांनाच आहे.

शेवटी या प्रश्नांना महत्त्व प्राप्त होते ते राजकारणातच. आज भ्रष्टाचार थैमान घालतो आहे हे स्वतंत्र पक्षापासून ते नक्षलवाद्यापर्यंत सर्वांनाच मान्य आहे. पण प्रत्येकाची उत्तरे याला वेगळी आहेत. आणि ही उत्तरे केवळ तत्त्वचर्चेपुरतीच मर्यादित आहेत असे म्हणणे स्वतःची फसवणूक करणारे आहे. कारण आपापल्या उत्तराशी आपल्या कृतीचा, घोषणांचा, मागण्यांचा, चळवळीच्या स्वरुपाचा संबंध आहे. म्हणूनच जयप्रकाशांच्या आंदोलनाकडे वळणे महत्त्वाचे वाटते.

२ : जयप्रकाशजींची चळवळ भ्रष्टाचाराविरुद्ध आहे. त्या चळवळीमागे भ्रष्टाचाराचं कोणतं विश्लेषण आहे ? भ्रष्टाचाराविरुद्धची चळवळ यशस्वी होण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक आहेत. १ : जनतेचे लोकशाही स्वरुपाचे दडपण आणि २ : भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी परिणामकारक आर्थिक उपाययोजना. यापैकी जयप्रकाशजींच्या चळवळीमुळे पहिला भाग काही काळ साध्य होतो आहे, होईल. त्यामुळे भ्रष्टाचारी माणसांना भीती उत्पन्न झाली असेल. पैसेखाऊपणाला काही प्रमाणात आळा बसला असेल. पण ही चळवळ सदासर्वकाळ चालणार नाही हे ज्यांना माहीत असेल ती मंडळी मनातून फारशी घाबरली नसतील. कारण जयप्रकाशजी कोणतीच परिणामकारक आर्थिक उपाययोजना सुचवीत नाहीत. शक्य असूनही सरकारवर 'अमकी गोष्ट करा' म्हणून दडपण आणीत नाहीत. उपाययोजनांची निश्चित दिशा सुचवीत नाहीत.

'डावे आणि उजवे हा भेद विसरून जयप्रकाशजींच्या मागे चला' असे मत मांडणारा एक प्रवाह आपल्याकडे आहे. हा विचार मला पटत नाही. कारण वरवर सोज्ज्वळ वाटणारा हा विचार अपुऱ्या राजकीय समजावर आधारलेला आहे. भारतीय राजकारणात दोन महत्त्वाचे व मूलभूत भाग आहेत.

(अ) भांडवलशाहीच्या चौकटीत काम करणारे पक्ष. यांनाही भ्रष्टाचार नको असतो; यांनाही महागाई, दारिद्र्य दिसत असते. ते नष्ट व्हावे असे वाटते. पण या प्रश्नाची उत्तरे ते भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या चौकटीत शोधू पाहातात. 'भांडवलदारांचे पक्ष' असे ज्यांना स्थूलमानाने म्हटले जाते ते आपल्या 'प्रत्येक' मागणीने भांडवलदारवर्गाचे हितच पाहातात असे नव्हे. एखाद्या उपाययोजनेमुळे काही काळ भांडवलदारांपैकी कित्येकांचे नुकसानही होते. (उदा. अलीकडील 'मिसा' कायद्याचा वापर). पण त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या सीमा सुरक्षित राहातात आणि ह्या सीमा सुरक्षित राखून कार्य करणारे जे पक्ष असतील त्यांना आपण उजवे पक्ष म्हणतो. जनसंघ, स्वतंत्र, भारतीय लोक दल, कॉंग्रेस (दोन्ही), शिवसेना, रिपब्लिकन इ. यात मोडतात. यापैकी कित्येक जणांना 'भांडवलशाही' हा शब्द आवडत नाही. तर कित्येकजण 'समाजात वर्गविग्रह नसतोच' असे म्हणतात. त्याचबरोबर 'मालक कामगार सलोखा राखला पाहिजे' असेही प्रतिपादन करतात. कित्येकजण 'भांडवलशाही आता खूप बदलली आहे, आता क्रांतीची गरज उरली नाही. विज्ञानाने खूप पुढे मजल मारली आहे' असले विनोदी सिद्धांत प्रसवत असतात. स्टॅलिनची रशियातील दडपशाही, अमेरिकेबद्दल (सुप्त वा उघडपणे) मऊपणा, व्यक्तिस्वातंत्र्य, काही वेळा राष्ट्रवाद, काही वेळा स्थानिक लोकांचे प्रश्न, सरदार पटेलांबद्दल प्रेम अशी काही ठराविक चलनी नाणी वापरून गोंधळलेल्या बापुड्या भारतीयांना चिखलातून बाहेर काढण्याचे उदात्त काम ही मंडळी करीत असतात.

(आ) भांडवलशाही चौकट नाकारणारे व आजच्या आर्थिक लंगडेपणाचे उत्तर भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सापडणार नाही असे मत व्यक्त करणारे जे पक्ष आहेत त्यांना डावे पक्ष असे म्हणता येईल. त्यांच्यात असणारे मतभेद मुख्यतः 'क्रांती कोणत्या मार्गाने करायची' याबद्दल असतात. उजवा कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, नक्षलवाद्यांचे निरनिराळे गट, क्रांतिकारी समाजवादी पक्ष (आर. एस. पी.), लाल निशाण पक्ष इत्यादींना डावे पक्ष म्हणता येईल. समाजवादी पक्षाला (एस. पी.) नेमके कुठे बसवायचे याबद्दल दुमत होण्यासारखे आहे.

हे सर्व विस्ताराने सांगण्याचा उद्देश एवढाच की, प्रत्येक पक्ष म्हटल्याबरोबर त्या पक्षाच्या विशिष्ट मागण्या असतात; विशिष्ट कार्यक्रम असतात आणि त्या आधारावरच समाजातले विशिष्ट घटक त्यांच्यामागे उभे असतात. उद्या कॉंग्रेस पक्षाने आपल्या युनियन्सच्या व पक्षाच्या जोरावर कामगारांची लढाऊ आंदोलने उभारली व खऱ्या अर्थाने क्रांतीच्या घोषणा द्यायला सुरुवात केली (हे सर्व कल्पनेतले आहे) तर कॉंग्रेसच्या मागे उभे असणारे कारखानदार दुसऱ्या पक्षांना सहाय्य करतील. हे गणित अगदी सरळ आहे.

जयप्रकाशजींची चळवळ राजकीय अर्थाने अद्याप गुलदस्तातच आहे आणि इथेच तिचे सामर्थ्य आणि दुबळेपणा आहे. जयप्रकाश यांच्या व्यक्तिगत सच्चाईच्या जोरावर आणि जनतेच्या अतिशय बिघडलेल्या अवस्थेत ह्या चळवळीने एक वावटळ उठवून दिली हे खरे. अशी वावटळ गुजराथच्या वेळीही उठली होती. पण तिचे पुढे काय झाले, हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. ही चळवळ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत (म्हणजे खेड्यापाड्यापर्यंत) पोचली का? तिच्यामुळे जनता किती निर्भय झाली? जनतेत चळवळीचे व स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले का? स्थायी स्वरुपाच्या जनतेच्या लढाऊ फळ्या निर्माण झाल्या का? हे प्रश्न चळवळीच्या प्रवर्तकाना पेचात टाकणारे आहेत. जयप्रकाशजींची चळवळ 'जनतेची चळवळ' आहे असे म्हटले जाते. पण तिच्यात जनतेच्या मागण्या कोणत्या? जनतेच्या मूलभूत प्रश्नाना ती हात घालते आहे का? ह्या प्रश्नाना स्पष्ट उत्तरे नाहीत. एखाद्या चळवळीत जनता आहे म्हणून ती चळवळ जनतेची ठरत नाही. कारण सत्तारूढ होऊ पाहाणाऱ्या कोणत्याही वर्गाला जनतेची मदत घेऊन पुढे जावे लागते. फ्रेंच राज्यक्रातीत जनताच लढली. पण परिणामत: सत्ता भांडवलदार-वर्गाच्या हाती आली. तेव्हा एखाद्या चळवळीच्या मागण्या, कार्यक्रम व पाठिंबा ह्या तिन्ही गोष्टी आपल्याला त्या चळवळीचे स्वरूप ठरवताना विचारात घ्याव्या लागतील. एखादा निश्चित कार्यक्रम आणि डावपेच आखण्याचा जयप्रकाश जेव्हा प्रयत्न करतील तेव्हा आजच्या 'नैतिक आवाहना'च्या एक पाऊल पुढे ही चळवळ सरकली असे म्हणता येईल आणि तेव्हा जयप्रकाशाच्या छायेत वावरणाऱ्या पक्षाचे स्वरूप स्पष्ट होईल. मला स्वत:ला या दृष्टीने शहाद्यासारख्या ठिकाणी चाललेले प्रयत्न महत्त्वाचे वाटतात. कारण त्याना निश्चित दिशा आहे आणि आपले सामर्थ्य व दुबळेपणा याच्याबद्दल स्पष्ट जाणीव आहे मुख्य म्हणजे अनुभवांतून काही शिकण्याची दृष्टी आहे.

पण तरीही महाराष्ट्रात उद्या जयप्रकाशी आदोलन सुरू झाल तर तरुणानी त्यात भाग घ्यावा असेच म्हणणे श्रेयस्कर ठरेल. पण भाग घेताना आपल्याजवळ राजकीय सावधानता असेल तरच. या आदोलनात भाग घेण्यापूर्वी स्वत:ची राजकीय दृष्टी साफ असेल तरच. नाहीतर शब्द आणि भावना यांच्याच गुंत्यात अडकण्याचीच शक्यता अधिक. 'क्रांती हवी' असे सगळेच म्हणतात. अलीकडे अटलबिहारी वाजपेयीही म्हणतात. पण इथे जास्त खोदकाम करण्याची आवश्यकता आहे कारण शेवटी अटलजींच्या क्रातीचा अर्थ 'राजकीय बदल' एवढाच असेल; जयप्रकाशजींच्या क्रातीचा अर्थ 'हृदयात परिवर्तन' इतकाच असू शकेल, आणि क्राती म्हणजे काय हा प्रश्नही हवेतच विरून जाईल. आजच्या घडीला हे प्रश्न निव्वळ सैद्धान्तिक स्वरुपाचे व काही वेळा पुस्तकी वाटले तरी महत्त्वाचे आहेत. कारण त्यांच्यामुळे आपणाजवळच्या राजकारणातूनही दूरवर पाहू शकू आणि कोणती निवड करायची; कोणती घोषणा घ्यायची इथपासून ते अधिक दूरच्या टप्प्यावरच्या क्रातिकारी समूहाच्या राजकारणाच्या सदर्भात आपले आडाखे माडता येतील.

३ : साहित्यसमेलनात जयप्रकाशी आंदोलनाला पाठिंबा देणारा ठराव यावा असे आपण म्हटले आहे. साहित्यिकांतली मताची भिन्नता तूर्त बाजूला ठेवू. शासन आणि श्रेष्ठ काँग्रेसी नेत्यानी या समेलनाला जो हातभार लावला त्यामुळे असा ठराव आणणे साहित्यिकाना गैरसोयीचे वाटले असणार. असो. साधा भ्रष्टाचाराविरुद्धही ठराव या समेलनात पास झाल्याचे कुठे वाचायला मिळाले नाही (चुकभूल द्यावी घ्यावी). शिवाय ह्या सर्व गोष्टी साहित्यबाह्य आहेत असे काहीना वाटणे स्वाभाविक आहे.

साहित्य समेलनात आजच्या भ्रष्टाचाराविरुद्ध एखादा ठराव जरी कोणी आणला असता तरी एखाद्या वाऱ्याच्या झुळकेसारखे प्रसन्न वाटले असते. पण शेवटी या साहित्यिकाकडून अपेक्षा तरी किती करायच्या?

शेवटी आपण आपल्या आवाहनात चारित्र्यसपन्न नेतृत्वाची अपेक्षा केली आहे ती योग्यच आहे. पण चारित्र्यसपन्नतेबरोबर त्या नेतृत्वात डोळसपणा नसेल तर त्याचा काय उपयोग? आणि माणसाला चारित्र्यसपन्न राखण्यासाठी जे तात्त्विक अधिष्ठान हवे ते जयप्रकाशजी पुरवू शकतील काय?

२९-१२-७४ —ए. के., मुंबई

## दैन्य

चद्र चादीचा
सूर्य सोन्याचा
पण
रात्री झाकल्याल
उजाडताच
उघड पडत ते दैन्य!

जोडलुगड्यातली लक्ष्मि
अनि
चिंध्या नेसलेली
उन्हापावसात पोसलेली
वडदी पोरगी
आगठा चोखत चोखत
अजुनी निजल्याला
उघडा नागडा पोरगा.. ...

"भूक भूक" करीत
एका भाकरीची वाटनी
रात्री दोघातच उडाली
राहाता राह्यलो
दोघ आम्ही
मी उपाशी नि 'ती' पण उपाशी
रिकाम्या पोटात
पाणीच नुस्त थडगार
पुन्हा झोप कुठली
काळजी न् घोरण अपरपार......

आढ्यावरली पाल चुकचुकली
भर काळोखात
आता म्हणाव?
उद्याची आशाच खुटली......

—मधुश्री

# खुशवंतसिंगांचे खुसखुशीत भाषण

भारतकुमार राऊत



सरदार खुशवंतसिंग. गेल्या दोन तीन वर्षांच्या काळात हे नाव फारच प्रसिद्ध झाले. खुशवंतसिंग हे ' इलस्ट्रेटेड वीकली 'चे संपादक. साधारणतः सचिवालय किंवा अन्य कुठल्याही टेबल खुर्च्या असलेल्या ऑफिसात कामकरणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आणि विशेषतः क्लार्क मंडळींनी वीकलीचा अंक महिन्यातून एकदा तरी विकत घ्यायलाच हवा, असा कायदा लोकसभेत पास झाला असा इतके दिवस माझा ठाम समज होता. पण नंतर कळलं की जेवणाचा गरम चपटा डबा हातात धरण्यासाठी वीकलीचा चांगला उपयोग होतो. इलस्ट्रेटेड वीकलीचा लांब रुंद पसरट आकार सुद्धा या दृष्टीनं विचार करूनच ठरवण्यात आला असावा, असो.

तर सरदार खुशवंतसिंग. हा एक डोकेबाज सरदारजी. या माणसाच्या फेट्यातल्या डोक्यात एकएक भन्नाट आयडीया भरलेल्या आहेत. त्या तो हळू हळू बाहेर काढीत असतो. आणि ' बच्चे लोग तालिया बजाव ' असं म्हणायच्या आधीच तमाम पब्लिक खुशवंतसिंगच्या कौतुकानं रंगलेलं असतं.

या माणसाला मुलाखती घेण्याची भारी हौस. पुन्हा मुलाखती घेऊन गप्प बसणार नाही. त्या शानपैकी, खुसखुशीदार आणि भारतीयांना शोभणार नाही अशा इंग्लिश इंग्रजीत लिहून त्या छापण्याची खोड त्याला आहे. या मुलाखती कुणापासून कुणापर्यंत असाव्यात याला काहीच धरबंध नाही. रस्त्यावरच्या मोचीपासून ते थेट पकिस्तास्तानच्या पंतप्रधानापर्यंत कुणाच्याही पुढ्यात हा सरदारजी कागद पेन्सिल घेऊन बसतो.

तर नमनालाच घडाभर तेल गेल्यानंतर आता या सरदार पुराणाचं औचित्य सांगतो. मला या माणसाचं दर्शन नुकतंच घडलं. नुसतं दर्शनच घडलं नाही तर जवळ जवळ पाऊण एक तास प्रशांत महासागरातल्या दीड फूटी संथ लाटांसारखं त्याचं भाषणही ऐकायला मिळालं.

स्थळः—मुंबई मराठी पत्रकार संघ.

मुंबई मराठी पत्रकार संघ दरवर्षी ६ जानेवारीला ' पत्रकार दिन ' साजरा करतो. याच दिवशी मराठीतलं पहिलं वृत्तपत्र 'दर्पण' सुरू झालं म्हणून या दिवशी पत्रकार दिन साजरा होतो. पत्रकार संघ ही घटनेप्रमाणे मुंबईतल्या पत्रकारांची संघटना. आता 'पत्रकार' या शब्दाच्या व्याख्येबाबतच प्रचंड घोळ असल्याने वर्तमानपत्र या शब्दाशी ज्यांचा नुसता वासानं सुद्धा संबंध आला नाही त्यांना देखील पत्रकार संघाचं सदस्यत्व मिळालं आहे. असो. नुकती च घटना दुरुस्ती होऊन याबाबतीत पत्रकार संघानं जरा कडक धोरण स्वीकारल्याचं समजतं. बघू या काय होतंय ते.

तर संघातर्फे दरवर्षी पत्रकार दिन साजरा होतो. या दिवशी दरवर्षी न चुकता फुलांच्या माळा लावून स्टेज सजवलं जातं. यावेळी एखाद्या वृद्ध पत्रकाराला ' महनीय प्रवक्ता ' म्हणून बोलवण्याची सुद्धा संघाची परंपरा आहे. मग तमाम जमलेल्या पत्रकारांपुढे हे महनीय प्रवक्ते दणादण भाषणं ठोकतात. वृत्तपत्रस्वातंत्र्यावरच्या हल्ल्यांच्या वगैरे जांभाया देत कडाडून निषेध केला जातो. तर यंदा महनीय प्रवक्ते म्हणून पुण्याचे मुकुंदराव किर्लोस्कर यांचं नाव जाहीर झालं होतं. पण दोनच दिवस आधी शंकरभाऊंचं दुःखद निधन झालं. मुकुंदराव येणार नाही असं कळल्याबरोबर पत्रकार संघात धावाधाव झाली. कारण महनीय प्रवक्ता नाही तर पत्रकार दिन कसा होणार ? इंट्रो नाही तर बातमी कशी लिहिणार इतका महत्त्वाचा प्रश्न. परंपरांच्या बाबतीत आम्ही पत्रकार ब्रिटिशांपेक्षाही वरचढ. ऐनवेळी कुणाला तरी हातात वळकटी केलेल्या वीकलीत खुशवंत सिंगांचं नाव दिसलं आणि पत्रकार संघाची मंडळी टाईम्स ऑफ इंडिया बिल्डिंगच्या पायऱ्या चढली. खुशवंत सिंगांनी ' हो ' म्हटलं आणि ते आले.

दणकट शरीर, आकाशी फेटा. त्याच

रंगाचा घट्ट होजियरी टी शर्ट. पांढरी पँट. पायात सपाता. भारतातल्या सर्वात लोकप्रिय साप्ताहिकाचा मुख्य संपादक अशा वेशात पत्रकार संघाच्या वर्षातल्या सर्वात महत्त्वाच्या समारंभाला उपस्थित झाला. खुशवंतसिग आले, त्यांनी हाताला अत्तर लावून घेतलं. गुलाबपाणी शिंपून घेतलं, दिलेलं गुलाबाचं फुल शर्टावर खोवून घेतलं. एकूण मुख्य पाहुण्यानं ज्या रुबाबात वागण्याची प्रथा असते. तसं ते वागले नाहीत.

पत्रकार दिनाचे सत्कार वगैरे सारे विधी शांत चित्तानं साग्र संगीत पार पाडल्यानंतर खुशवंतसिग बोलायला लागले. बसूनच. पहिल्यांदाच त्यांनी काही कारण नसताना आपल्याला मराठी येत नसल्याबद्दल माफी मागितली. नंतर झालेलं त्यांचं इंग्रजी भाषेतलं भाषण म्हणजे खरोखरच जीवाचा संतोष होता. एखादा माणूस इतक्या शांतपणे आणि इतक्या साध्या सरळ शब्दात, इतक्या प्रभावीपणे कान पिचक्या देऊ शकतो, हे त्या भाषणाला उपस्थित असल्याशिवाय उमगणं सुद्धा अशक्य आहे.

'आजचे पत्रकार व्यासंग करीत नाहीत' असा सरळ सरळ आरोप खुशवंतसिगांनी केला. प्रत्येक पत्रकाराला आपल्या विषयाचं यद्ययावत ज्ञान असायलाच पाहिजे. आमच्याकडे खुनाच्या खटल्याची बातमी लिहिताना खऱ्या वार्तेचाच खून पाडला जातो, असं खुशवंतसिग म्हणाले. पण हे म्हणत असताना आमच्या बातमीदाराला एकावेळी किती बातम्या कव्हर करायच्या असतात हे खुशवंत सिंग विसरले. खुनाच्या खटल्याचं रिपोर्टिंग केल्यानंतर आमच्या बातमीदाराला एखाद्या आमदाराच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित राहून तिथं वधुवरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी कोणकोण धेंड जमली होती याची यादी करावी लागते. एकवेळ खून खटल्याच्या बातमीत एखादं महत्त्वाचं नाव गाळलं गेलं तर चालेल पण या शुभाशीर्वाद देणाऱ्यामधल्या एखाद्याच्या 'सौ'चं नाव छापून आले नाही तर या मंडळींचे पितर स्वर्गात उपोषणाला बसतात, त्याचं काय? असो.


'वृत्तपत्र–स्वातंत्र्य' हा तमाम पत्रकार मंडळींचा चघळण्याचा विषय खुशवंतसिगांनी सुद्धा चघळायला घेतला आणि मी मोठी जांभई दिली. लहानपणापासून म्हणजे समजायला लागल्यापासून भारतातले वृत्तपत्र-स्वातंत्र्य धोक्यात असल्याचं मला कळतं आहे. कळतं आहे म्हणजे तसं सतत कुणीना कुणी बोंबलून सांगत आलं आहे. आपल्या देशात आतापर्यंत न समजलेले असे दोनच प्रश्न असावेत. एक महराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्न आणि दुसरा हा वृत्तपत्र-स्वातंत्र्याचा प्रश्न. हे वृत्तपत्र-स्वातंत्र्य म्हणजे काय, ते कशाशी खावे हे मला ठाऊक नाही. कारण ते आपल्याला नाही याची आम्हाला ठायी ठायी जाणीव करून देण्यात येते.

तर खुशवंतसिगांनी एक चांगला मुद्दा मांडला. ते म्हणाले की, आपण भले कितीही 'वृत्तपत्र-स्वातंत्र्यावर घाला' वगैरे बोंबाबोंब करू, पण आपल्याला जितकं स्वतंत्रपणे लिहिता येतं तितकं जपानपासून अमेरिका खंडातल्या देशांपर्यंत अनेक राष्ट्रांत लिहिता येत नाही. तमाम पत्रकार मंडळींवर हा जोराचा बॉम्ब अ‍ॅटॅक होता. कारण कुठलीही फालतू गोष्ट झाली की, ती जपान आणि अमेरिकेशी पडताळून पाहायची आमची जुनी हौस. शिवाय आपल्याला वृत्तपत्र-स्वातंत्र्य आहे असं मान्य केलं तर आमच्याकडे भांडायला पॉईंटच कुठे शिल्लक रहातो? मग पुन्हा बोंब. कारण असं स्वातंत्र्य जर आलं किंवा मान्य केलं तर तमाम महनीय प्रवक्त्यांची भाषणं बंद.

खुशवंतसिगांनी आपल्या भाषणात एक चांगली माहिती दिली. परदेशात वृत्तपत्रांत लेखन करण्याबद्दल अवाढव्य पैसा मिळतो. एका लेखाला अमेरिकेत साधारणतः आठ हजार रुपये मिळतात, अशी झंझावाती बातमी त्यांनी दिली. आता इतकं चांगलं मानधन मिळत असेल तर तिथं 'वॉटरगेट' प्रकरणं उघडकीस आली तर काय नवल असं माझ्या मराठमोळ्या मनात उगाचच आलं.

असो. तर एकूण सरदार खुशवंतसिग असं बरंच काही खुशखुशीत बोलले. पत्रकारांनीसुद्धा मधून मधून टाळ्या वाजवाव्या इतकं चांगलं बोलले.

□ □



# भारतीय लोकशाहीला लष्करशाहीचा पर्याय ?

ले. प्रा. दिनकर बोरीकर

[ शीर्षकी ताजा कलम:— मराठी वार्ताहर निळू दामले यांनी—बिहार भटकन्तीतून एक सूचक माहिती दिली. लेखाच्या आशयाशी ही माहिती बरीच सयुक्तिक आहे.

' एक अस्वस्थ करणारी गोष्ट सैन्यातला उच्च अधिकारी बोलून गेला. सैन्यालाही रशियाचे दडपण आता असह्य होत आहे. सतत रशियातर्फे सैन्यात हस्तक्षेप होतो असे तो बोलून गेला. आम्ही फार काळ हे सहन करू शकणार नाही असा त्याचा सूर आहे. हस्तक्षेपाचे नेमके स्वरूप कदाचित पुढच्या काही दिवसात मला कळेल. पण आज ही शक्यताही फार गंभीर परिणाम घडवून आणणारी आहे. सचिवालयासमोरच्या एका गुरखा सैनिकाशी बोलताना ही सैन्यातली अस्वस्थता जाणवली. '

दैनिक मराठवाडा २९।१२।७४ च्या रविवारीय आवृत्तीवरून उद्धृत ]

अमेरिकेतील ' सॅटर्डे रिव्ह्यू ' या नियतकलिकाने २०२४ साली म्हणजे ५० वर्षानंतर भारताची अवस्था काय राहील या विषयी ख्यातनाम विचारवंतांची मते मागविली, बहुतेकांनी भारताचे निराशाजनक चित्र रंगविले आहे.

युगोस्लाव्हियाचे मिलोव्हॅन जिलास म्हणतात, ' भारतासंबंधी मला फार आस्था वाटते. परंतु पन्नास वर्षानंतर भारत एकसंध राष्ट्र राहू शकेल असे मात्र मी म्हणू शकत नाही. भारतातील सध्याची भाषावार राज्ये हळू हळू विभक्त व स्वतंत्र होतील. दक्षिण भारतात बहुधा वेगवेगळी स्वतंत्र राज्ये निर्माण होतील असे मला वाटते. '

अमेरिकन स्तंभ लेखक एम्मेट जॉन ह्युदोस यांनी असे म्हटले आहे की भारतातील लोकशाही समाजवादाची वाटचाल ऐक्याकडे न होता फाटाफुटीच्या दिशेने होईल. पश्चिम युरोपात जेवढी राष्ट्रे आहेत तेवढी बहुधा हिंदुस्थानात निर्माण होतील.

एक ब्रिटिश अभ्यासक लॉर्ड ट्रेव्हिलेयनचे मत आहे की भारताचे भिन्न भिन्न प्रदेश कसे बसे एकत्र टिकून राहाण्याचा प्रयत्न करतील. कारण दीडशे वर्षांच्या ब्रिटिश राजवटीत तयार झालेले बंध एकदम तुटणार नाहीत. परंतु जी एकता राहील ती क्षीण असेल.

### काही प्रश्न

परदेशी विचारवंतांनी भारताच्या भवितव्यासंबंधी व्यक्त केलेल्या मतांच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात.

सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष हा वर्धिष्णू पक्ष आहे काय ? नसेल तर कॉंग्रेसला पर्यायी शक्तीमान पक्ष देशात उपलब्ध आहे काय ? तेही नसेल तर मग भारतात लष्करी राजवटीचा अमल सुरू होईल काय ? आणि लष्करी राजवट आलीच तर ती राजवट भारताचे ऐक्य टिकवून धरू शकेल काय ? की भारताचे बाल्कनायझेशन होऊन भारताची छोटी छोटी शकले पडतील ? देशात जी वर्तमान परिस्थिती आहे तिच्या संदर्भात वरील प्रश्न कुणाही सुबुद्ध नागरिकाला बेचैन करीत असतील.

जगात विविध देशातून लष्करी कट होऊन लष्करी राजवटी अमलात आल्याचे दिसून येते. लष्करी राजवट येणे ही घटना सामान्य लोक केवळ राजकीय घटना समजतात. तसेच अशा मार्गाने लष्करी राजवट अचानक अस्तित्वात आल्या सारखी दिसते. लष्कर सत्ता संपादन करते या घटने मागील परिस्थितीजन्य घटना फारशा विचारात घेतल्या जात नाहीत.

ज्या ठिकाणी लष्करी सामर्थ्य व राजकीय शक्ती यांच्या ध्रुवीकरणाच्या सीमा रेषा पातळ झालेल्या असतात, नागरी शासन समाजाच्या राजकीय व आर्थिक गरजा पूर्ण करण्यास असमर्थ ठरले असते अशा ठिकाणी लष्करी कट होऊन लष्करी राजवट अस्तित्वात येऊ शकते. लष्करी कट करून ती राजवट आणू पाहाणाऱ्यांनी या घटकांचे भान ठेवणे आवश्यक असते. अर्थात लष्करी कटाचे नेते नेहमीच यांचे भान ठेवतात असे समजावयाचे कारण नाही. उतावळेपणाने किंवा सामाजिक — आर्थिक परिस्थितीचे चुकीचे मूल्यमापन करूनही लष्करी कट होऊ शकतो. परंतु अशा परिस्थितीत अस्तित्वात आलेली राजवट सहसा स्थिर होऊ शकत नाही. व आधीच चिघळत असलेली सामाजिक—आर्थिक परिस्थिती आणखीच चिघळायला लागते.

प्रस्थापित नागरी शासन निष्प्रभ होऊ लागले तर सत्ताधारी पक्षाला पर्यायी सत्ता केंद्रे उदयाला येऊ पाहातात. अर्थात उलटेही होऊ शकते. पर्यायी सत्ताकेंद्रे क्रियाशील होऊन प्रस्थापित शासनाला कमकुवत करू शकतात. परंतु भारताच्या संदर्भात हे घडणे नाही. कारण आजपर्यंत कॉंग्रेसची सत्तेची मक्तेदारी अभेद्य राहिली आहे. उलट चित्र दिसते ते असे की विरोधी पक्ष एवढ्या छोट्या छोट्या गटात वाटले गेले आहेत की ते कॉंग्रेसला पर्यायी सत्ताधारी म्हणून उभे राहू शकत नाहीत.

### कॉंग्रेसची उतरती कळा

पाव शतकापेक्षाही अधिक काळ कॉंग्रेस सत्तास्थानी आहे. आपल्या सत्तास्थानाला कसलेही समर्थ आव्हान देणारा पक्ष देशात

नाही याची कॉंग्रेसलाही जाणीव आहे. असे असूनही आपल्या घोषित आदर्शाप्रमाणे हा पक्ष देशाची बांधणी करू शकला नाही. उलट कॉंग्रेसला उतरती कळाच लागल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यप्राप्ती पासून भारत सतत आर्थिकदृष्ट्या संकटग्रस्त राहात आला. काहीच आर्थिक प्रगती झाली नाही असा याचा अर्थ नाही. परंतु जे झाले व जे झाले नाही याचा ताळेबंद मांडल्यास जे झाले नाही त्याची बाजू मोठी आहे. त्याही पेक्षा जे व्हावयास नको होते त्याची बाजू अधिक मोठी दिसून येते. राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग दरसाल दर शेकडा तीन टक्क्याच्या वर जाऊ शकला नाही. लोकसंख्या नियंत्रणाच्या आघाडीवर जाणवण्याइतके अपयश दिसून येते अन्नधान्याच्या किंमती सतत वाढत्या असून जीवनावश्यक वस्तूही सर्व सामान्याच्या कक्षेबाहेर गेल्या. औद्योगिक उत्पादन असेच लंगडत लंगडत चालले आहे. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून पाहाता भारताच्या अर्थव्यवस्थेत एक प्रकारचे संचयन झालेले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार सतत प्रतिकूल रहात आला आहे. सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष या दुरवस्थेची जबाबदारी टाळू शकणार नाही.

राष्ट्रीय एकात्मता वाढीला लावण्याच्या बाबतीतही कॉंग्रेसची अशीच शोकांतिका आहे. आपल्या स्वातंत्र्यपूर्व पुण्याईत हा पक्ष स्वातंत्र्योत्तर काळात काहीच भर टाकू शकला नाही. भाषावर राज्य पुनर्रचना व धान्याची विभागीय व्यवस्था या योजना सत्ताधारी पक्षाने इतक्या सदोष रीतीने राबविल्या की देशात प्रादेशिक वाद वाढीला लागला. या प्रादेशिक वादापासून सत्ताधारी पक्ष मुक्त राहिले. अधूनमधून भारतापासून वेगळे होण्याची भाषाही ऐकू येऊ लागली. कॉंग्रेस सरकारने भारतीय संविधानात दुरुस्ती घडवून फुटीर प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केला परंतु केवळ संविधानातील तरतुदीने प्रत्यक्ष परिस्थितीतील प्रश्न सुटत नसतात. बांगला देशाची निर्मिती व या निर्मिती प्रक्रियेत भारत सरकारची भूमिका याचा परिणाम प्रादेशिक वादाला पूरक ठरणारच नाही असे म्हणता येणार नाही.

कॉंग्रेस सरकारची निष्प्रभता आणखी एका क्षेत्रात जाणवते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात ज्या वेगवेगळ्या चळवळी झाल्या त्या हाताळण्यात कॉंग्रेसने ब्रिटिश सरकारपेक्षा फार काही वेगळेपण दाखविले नाही. विशेषतः बिहारचे चालू आंदोलन तर साम्राज्यवादी सरकारच्या भूमिकेतूनच हाताळले जात आहे. शांततामय चळवळीला तोंड देण्यासाठी सशस्त्र लष्कराचा वापर हे त्याचेच द्योतक आहे. मराठवाड्याचे आंदोलन तर स्वच्छ विकासाचे आंदोलन होते. आंदोलनकारांनी स्पष्ट केले होते की आम्हाला कोणतेही सरकार पदच्युत करावयाचे नाही. तर फक्त सरकारच्याच स्वीकृत आणि घोषित धोरणानुसार मागास प्रदेशाचा विकास घडवून आणावयाचा आहे. परंतु याही आंदोलनात सरकारने एस. आर. पी सारख्या पाशवी शक्तीचा वापर केला

जनसामान्याच्या प्रश्नांना हात घालून ते प्रश्न सोडवीत सोडवीत आपले सत्तास्थान बळकट करावयाचे मनोबल कॉंग्रेस जवळ राहिले नाही. लाटेवर सत्ता वाहून न्यायची असा प्रकार सुरू झाला. इंदिरा लाट आली. काही काळ चैतन्य निर्माण झाल्याचा भास झाला. परंतु लवकरच इंदिरा लाट ही थंडीच्या लाटेसारखी जीव घेऊ बनली. अशा लाटेने समाज रचनेत गुणात्मक बदल होत नसतात. बदलाचा केवळ आभास मात्र निर्माण होतो.

या लाटेचा फायदा घेऊन १९७१ च्या निवडणुकीत कॉंग्रेसने लोकसभेत ३५० जागा मिळविल्या. मोरारजी देसाई, स. का. पाटील या सारख्या प्रतिगामी म्हणविल्या जाणाऱ्या शक्ती निष्प्रभ झाल्या. कॉंग्रेसला स्वत च्या शुद्धीकरणाची एक उत्कृष्ट संधी चालून आली. इंदिराजींना हवे असलेले स्थिर सरकारही मिळाले. परंतु तरीही त्या स्वत च्या पक्षाला बांधिलकीचे रूप देऊ शकल्या नाहीत. एक जनक्रांतीचे, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम व वाहक म्हणून कॉंग्रेस पक्षाकडून काही अपेक्षा करावी अशा प्रकारची पक्षाची बांधणी दिसून येत नाही.

## पर्यायी विरोधी पक्ष

कॉंग्रेसला उतरती कळा लागली तरी तो पक्ष केंद्रस्थानी राहीलाच. कारण कोणत्याही परिस्थितीत सत्ता हातची जाऊ द्यावयाची नाही याच दिशेने या पक्षाचे डावपेच उभे रहात गेले. विरोधी पक्षांची दु.स्थिती तर विचारूच नका. केवळ विरोध करण्यासाठी देखील अखिल भारतीय स्वरुपाचा समर्थ पक्ष या देशात आढळत नाही. कॉंग्रेसला आव्हान देऊ शकेल असा एखादा तरी समर्थ पक्ष असावा हे केवळ स्वप्नरंजन होऊन बसले. कुठे तात्त्विक आधारावर तर कुठे प्रादेशिक वादावर तर कुठे वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपायी जागोजाग विरोधी पक्षांनी आपापल्या वेगवेगळ्या चुली मांडल्या. १९६७ साली चमत्कार घडला. संयुक्त विधायक दलाच्या रूपाने विरोधी पक्षांना सत्तेवर येता आले. येथून तरी राजकीय ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू होईल असे वाटले होते. परंतु ही संधी आली तशीच गेली. केरळ आणि बंगालमध्ये डाव्या शक्ती प्रबळ होत्या. त्या देशभर पसरतील असे वाटले परंतु एक तर केंद्रस्थानी कॉंग्रेस सत्तेवर होती. व कॉंग्रेसचेच दोष या डाव्या शक्तीतही होते. म्हणून या शक्ती पर्याय म्हणून उभ्या राहू शकल्या नाहीत. अकाली दल, द्रमुक अशा पक्षाची नावे त्या त्या प्रदेशाच्या सीमेतच मर्यादित राहिली.

नक्षलवादी शक्ती काही काळ क्रांतिकारक म्हणून नावाजली. परंतु भारतीय जनमानस हिंसाचाराला एका मर्यादेपलीकडे पचवू शकत नाही हे सत्य या गटाच्या ध्यानी आले नाही. शेवटी या गटाचे रूपांतर केवळ एका साहसवादी गटात झाले.

पंजाब, बिहार, उत्तर प्रदेश येथील संयुक्त सरकारे हळूहळू केंद्रसत्तेला बळी पडली. कॉंग्रेसच्या विभाजनाचा रोग साथीच्या रोगासारखा पसरला आणि सर्वच विरोधी राजकीय पक्षात या ना त्या कारणामुळे विभाजनाची प्रक्रिया सुरू झाली. या सार्वत्रिक विभाजनातून एका नवीन शक्तीच्या संयोजनाची शक्यता निर्माण करता आली असती. परंतु तशा प्रकारचे कल्पक नेतृत्व भारतात कुठेच दिसून आले नाही. सत्तेसाठी सत्ता हे कॉंग्रेसचे राजकारण तर विभाजनासाठी विभाजन हे विरोधी पक्षाचे राजकारण असा खेळ सुरू झाला. मध्ये तर आयाराम गयारामने एक सद्दीच गाजविली. त्यातून आदर्शाधिष्ठित संघशक्तीची कुतरओढच झाली. एक जिनसी म्हणून गाजलेला कम्युनिस्ट पक्षही द्विभाजनच नव्हे तर त्रिभाजनाच्या

मार्गाने गेला. नक्षलवादी चळवळीने एक जी क्रांतीची हवा निर्माण केली तिचा परिवर्तनवादी शक्ती म्हणून वापर करता आला असता ती संधी या पक्षाने गमावली थोडक्यात चित्र येते ते असे. एकीकडे सत्ताधारी काँग्रेस पक्ष विरुद्ध सत्ताभिलाषी विरोधी पक्ष. काँग्रेसला समर्थशाली पर्याय व आव्हान यातून निर्माण होणे कदापी शक्य नव्हते.

काँग्रेस पक्ष सत्तेवर असूनही देशाच्या गरजा पूर्ण करण्याइतका वर्धिष्णू नाही. विरोधी पक्ष सत्तासंपादन करण्याची कुवत बाळगीत नाहीत. अशा परिस्थितीत इतर राजकीय नसणारी शक्ती केंद्रे असू शकतात काय? असा विचार करू जाता कामगार संघटना ही संघटित शक्ती डोळ्यापुढे येते दुर्दैवाने भारतातील कामगार संघटनांनी राजकीय पक्षाशी एवढी बांधीलकी पत्करली की त्याच्या राजकीय पक्षाला पडसे झाले तर त्यानादेखील पडसे होते. म्हणजे हा पर्याय आपोआपच बाद होतो.

युवा शक्ती ही एक नवीन शक्ती आता क्षितिजावर उदय पावली आहे परंतु सत्तासंपादनासाठी एक पर्यायी शक्ती म्हणून तिच्याकडे पाहाणे किती सूज्ञपणाचे ठरेल याची शकाच आहे. बिहारच्या आंदोलनात परिवर्तनवादी मूल्यांना आघाडीवर ठेवण्यात आले असले तरी युवा शक्तीचा वापर परिवर्तनाची प्रक्रिया वेगवान करण्याइतकाच होऊ शकेल निर्भयता व उत्साह या दोन गोष्टी या शक्तीत असल्या तरी सत्ता संपादन करून ती राबविण्याइतकी प्रगल्भता त्याच्याकडून अपेक्षिणे अवास्तव ठरेल. या नागरी शक्ती अशा प्रकारे बाजूला पडतात व समोर येते ती पोलीस यंत्रणा. परंतु पोलीस यंत्रणा आपल्या देशात राज्यसरकारांच्या कक्षेत असल्यामुळे केंद्रस्थानी ही शक्ती येऊ शकेल असे नाही. मुळात ही यंत्रणाच केंद्रानुवर्ती संघटित नसल्यामुळे राष्ट्रीय एकात्मता टिकवून धरण्यात ही यंत्रणा यशस्वी होणार नाही.

## लष्करी सत्तेचा पर्याय

भारताची फाळणी झाली आणि भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली पाकिस्तानात फारच लवकर म्हणजे १९५८ मध्येच लष्करी सत्ता अमलात आली. भारतात मात्र अद्यापी नागरी सत्ता टिकून आहे पाकिस्तानचे लष्कर गुणात्मक दृष्ट्या श्रेष्ठ होते व त्या मानाने भारतातील लष्कर कमी प्रतीचे होते असा या घटनेचा अर्थ काढणे बरोबर ठरणार नाही. भारताच्या फाळणीबरोबरच लष्कराचीही फाळणी झाली. एक धार्मिक श्रद्धेची भिन्नता सोडली तर इतर कोणताही फरक या दोन लष्करात दाखविता येत नाही. कारण ही दोन्ही लष्करे ब्रिटिश परंपरेतच तयार झालेली होती. ब्रिटिशांनी लष्करात प्रादेशिक निष्ठा निर्माण होऊ नयेत म्हणून फौजा नेहमी इकडून तिकडे फिरत्या ठेवल्या.

भारतीय लष्कर पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर व मध्य अशा पाच विभागात विभागण्यात आलेले असून प्रत्येक विभागाच्या प्रमुखपदी लेफ्टनंट जनरल असतो. वरील पदावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याची ब्रिटिश परंपरा अजून चालूच आहे. लष्कर हे केंद्र सरकारच्या कक्षेत असले तरी वरील विभागणीमुळे त्याला प्रादेशिक संघटनेचे स्वरूप प्राप्त झाले आहे त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी जे अखिल भारतीय स्वरूप असावयास हवे तसे स्वरूप भारतीय लष्कराचे नाही.

फाळणीनंतर ब्रिटिश सरकारची सेवा केलेल्या बऱ्याच श्रेष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना निवृत्त होऊ देण्यात आले. हे अधिकारी समाजाच्या शिष्ट वर्गातून आलेले होते. सँढर्स्ट येथे शिकून तयार झालेले होते बऱ्याच प्रमाणात ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या तोलामोलाचे होते. १९३२ नंतर भारतीय लष्करी अधिकाऱ्यांना सँढर्स्ट येथे शिकवून तयार करणे बंद करण्यात आले नंतर हे अधिकारी उत्तर भारतात शिकून तयार होऊ लागले व त्यांना भारतीय कमिशन देण्यात येऊ लागले. त्यांच्या वेतनश्रेणीही सँढर्स्ट निर्मित अधिकाऱ्यापेक्षा कमी होत्या. या सर्वांचा परिणाम असा दिसून आला की, नव्याने अधिकारी झालेल्यांचा दबदबा जुन्या अधिकाऱ्यांपेक्षा कमी होऊ लागला.

वायुसेना व जलसेना यांचे भारतीय लष्करातील स्थान व दबदबा स्थल सेनेच्या तुलनेत कमीच आहे. देशांतर्गत काही प्रसंगी लष्कराचा वापरच करावा लागला तर तो स्थलसेनेचा होतो.

सत्ता राबविण्याची जी दोन साधने असतात त्यापैकी लष्करी साधनाची वरीलप्रमाणे स्थिती होती. दुसरे साधन नागरी प्रशासनाचे. ते काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्यपूर्व कालापासून आपल्या प्रभावाखाली घ्यायला आरंभ केला होता. त्यातून नागरी प्रशासन अधिक नोकरशाही स्वरुपाचे होते. त्याची राजकीय महत्त्वाकांक्षा अशी नव्हतीच. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर ही नागरी प्रशासनाने जुनीच परंपरा चालू ठेवली. फक्त मालक बदलला एवढाच काय तो फरक.

लष्कराच्या बाबतीत मात्र काँग्रेसने दुरावा ठेवला होता. त्याचे कारण म्हणजे काँग्रेसच्या अनेक चळवळी लष्कराच्या साह्याने मोडून काढण्यात आल्या होत्या लष्कराला पार्श्वभूमीवर ठेवण्याची स्थिती १९६२ च्या आक्रमणापर्यंत कायम होती लष्कराचा राजकीय दबदबा वाढण्याचा एक प्रसंग मध्ये येऊ पाहात होता सुभाषबाबूंच्या आजाद हिंद सेनेचे अधिकारी व सैनिक भारतीय फौजेत सामावून घेण्याची सूचना होती. त्यावेळच्या लष्करी प्रतिष्ठितांनी यास विरोध केला. आझाद हिंद सेनेचे अधिकारी केवळ पगारी सेवक नव्हते. तर एका प्रेरणेने ते भारावलेले होते. ते भारतीय लष्करात दाखल झाले असते तर कदाचित आजच्या भारतीय लष्करासारखे राजकीय दृष्ट्या तटस्थ राहिले नसते.

१९६२ मध्ये आपल्याला चीनकडून जबरदस्त लष्करी पराभव पत्करावा लागला होता. तेथून आपणास लष्कराचे महत्त्व पटू लागले. पराभव लष्कराचा झाला तरी महत्त्व लष्कराचेच वाढते असा विचित्र अनुभव आहे. या पराभवाची मीमांसा प्रत्येक जण आपल्या परीने करतो. कुणी अकार्यक्षम लष्करी नियोजनाला जबाबदार धरतो तर कुणी राजकीय नेतृत्वाचे वाभाडे काढतो. ते काही असले तरी बळी मात्र गेला त्यावेळचे संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्ण मेननचा. कृष्ण मेननचा लष्करातील हस्तक्षेप तर प्रसिद्धच आहे. ब्रिगेडियर मोहन कौल या त्यांच्या मर्जीतील अधिकाऱ्यास त्यांनी पदोन्नतीचे नियम बाजूला सारून तिसऱ्या स्थानावर नेऊन ठेवले. असे म्हणतात की नागरी प्रशासनात हस्तक्षेप करण्याचा लष्कराचा अधिकार कौल प्रस्थापित करू पाहात होते. ते यशस्वी झाले असते तर भारतीय लष्कराचे राजकीय महत्त्व वाढलेले दिसले असते.

चीनकडून पत्कराव्या लागलेल्या पराभवानंतर नेहरूंनीही राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने लष्कराचे महत्त्व मान्य केले नॅशनल कॅडेट कोरची आवश्यकता वाढविणारे फतवे निघाले. देशातील युवकांचे लष्करीकरण झाले पाहिजे अशीही हवा पसरली. या सर्वांचा परिणाम असा झाला की जनतेत लष्कराविषयी सहानुभूती पसरली. आतापर्यंत जनतेच्या दृष्टीने लष्कराचे अस्तित्व देखील जाणवत नव्हते.

पृष्ठ २६ वर

# कापडगिरण्या मुंबईबाहेर हलवाण्यात पुढाकार कोण घेणार?

प्रा. वसंत देशपांडे, अध्यक्ष ग्रामायन, पुणे

दैनिक सकाळ दि. १९ डिसेंबर १९७४ च्या अंकात श्रीरामपूर येथील व्यापारी व कारखानदाराच्या बैठकीत श्री. आबासाहेब गरवारे यानी केलेल्या भाषणाचा गोषवारा आला होता. आपल्या भाषणात श्री. गरवारे यानी एका महत्त्वाच्या विषयावर आपले मत व्यक्त केले. मुंबई व त्याचे आसपास केंद्रित झालेल्या कापडगिरण्या हलवून, जिथे कापसाचे उत्पादन होते अशा भागात या गिरण्या न्याव्यात असे त्यांनी स्पष्टपणे सांगितल्याचे वृत्त आहे. ही सूचना अत्यंत स्वागतार्ह आहे. सरकार व सामान्यजनता यानी त्या कल्पनेचा स्वीकार करावा व त्याच्या अमलबजावणीसाठी योग्य ती उपाययोजना करावी.

तसे पाहिले तर ही कल्पना नवीन नाही. पूर्वीपासूनच ही सूचना पुन्हा पुन्हा माडण्यात येत आहे. परंतु कल्पना मांडण्यापलीकडे प्रगती झाली नाही. सरकार, विरोधी पक्ष व सामान्य जनता याबाबत उदासीन आहे. सरकार गिरणी मालकाच्या दडपणाखाली तर विरोधी पक्ष कामगारांच्या दडपणाखाली. आज असा आग्रह धरला तर कामगारांना नजिकच्या काळात अडचणी सोसाव्या लागतील, त्याना दुखविण्याची कुवत नाही. सामान्य नागरिक दिङ्मूढ असतो. त्याला यातले काही उमगत नाही. एकूण सारेच मूग गिळून स्वस्थ बसतात.

पण अशा मार्गांनी उद्योगधंद्याचे विखुरीकरण झाले तर त्यातूनच मागास भागाचा आर्थिक विकास होईल आणि त्यामुळे सामान्य नागरिकाचे, कामगारांचे व कारखानदारांचेही हित साधले जाईल हे नाकारून चालणार नाही. अशा तऱ्हेचा निर्णय घेऊन त्याची अमलबजावणी करणे म्हणजे एक प्रकारची शस्त्रक्रियाच आहे. केवळ तात्कालीन वेदना टाळण्यासाठी शस्त्रक्रिया नाकारून चालत नाही त्याचप्रमाणे अशा तऱ्हेचे निर्णय देखील अंतिम हित लक्षात घेऊन टाळू नयेत.

श्री. आबासाहेब गरवारे याच्यासारख्या उद्योगपतींनी ही सूचना माडावी व आग्रह धरावा ही गोष्ट अधिकच स्वागतार्ह आहे. कारण उद्योगपतींपैकी असा कोणी आग्रह धरल्याचे ऐकिवात नाही. महाराष्ट्रातील प्रमुख उद्योगपती व वित्तमहामंडळासारख्या संस्थाचे अधिकारी जर असा आग्रह सातत्याने धरू लागले तर त्याचा निश्चित चांगला परिणाम होऊ शकेल. याविषयावर एकमत होऊन त्याची अमलबजावणी करणे सोयीचे जाईल. श्री. गरवारे यांनीच पुढाकार घेऊन महाराष्ट्रात मुंबईबाहेर असलेल्या कापडगिरण्या अधिक चांगल्या कशा चालतील यासाठी प्रयत्न करावेत; कारण बहुतेक कापड गिरण्या बंद आहेत किंवा बंद पडण्याचे मार्गावर आहेत.

महाराष्ट्र सरकारने आजपर्यंत उद्योगधंद्याच्या विखुरीकरणाचा पाठपुरावा केलेला आहे. परंतु हे धोरण अपुरे असून त्यास म्हणावे तसे यश आलेले नाही. निश्चय करून देखील मुंबईची वाढ थोपवता आलेली नाही. उलट तिचा वेग वाढत राहिलेला आहे. सवलती व प्रलोभने (सबसिडी व इन्सेंटिव्हस्) सरकारने देऊ केली; औद्योगिक वसाहती स्थापन केल्या व काही तांत्रिक, आर्थिक सहाय्य देऊ केले. आजपर्यंतच्या अनुभवावरून तरी असे दिसते, की अशा उपाययोजनांचा अल्प प्रमाणातच उपयोग होतो. मुंबईसारख्या शहरांची वाढ या मार्गांनी थोपवता येत नाही व त्यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक आर्थिक समस्या सोडवणे दिवसेंदिवस आटोक्याबाहेर जाते. हा अनुभव सर्वश्रुत असल्यामुळे तो पुन्हा सविस्तर सांगण्याची गरज नाही.

मुंबईतून कापडगिरण्या हलवणे हा एक या सर्वांवर मोठा उपचार होऊ शकेल. मुंबई शहरातील उद्योगधंद्यात कापडगिरण्या अधिक आहेत. सर्वात अधिक कामगार वर्ग याच उद्योगधंद्यात गुंतलेला आहे याशिवाय या कारखान्यावर अवलंबून असलेले इतर लहानमोठे उद्योगधंदेही आहेत. आज यातील काही गिरण्या जरी हलविता आल्या तरी महाराष्ट्राच्या आर्थिक चेहरेपट्टीत जमीनअस्मानाचा फरक पडू शकेल. ज्या भागात गिरण्या जातील तेथील अर्थव्यवस्था भरभराटीस लागेल. रोजगारी वाढेल व त्यामुळे पुण्या-मुंबईसारख्या शहराकडे 'जगण्यासाठी' जाणाऱ्या लोकांची रीघ कमी होईल. त्या भागातील शेतीस नवीन प्रगतीची दिशा लाभेल. कापसाखालील क्षेत्र वाढेल व नव्या जातीच्या कापसाची लागवड करण्यासाठी लागणारी प्रेरणा मिळू शकेल. लहान शहराचा विकास एकदा होऊ लागला की भाजीपाला, दूधदुभते इ. उद्योगांना चालना मिळते असा जगातील सर्व ठिकाणचा अनुभव आहे.

हे सर्व विस्ताराने सांगण्याची गरज नाही. कारण हे सर्व फायदे मान्य झालेले आहेत व परिचित आहेत.

प्रश्न असा की हे कसे घडवून आणावयाचे. सरकारचे विखुरीकरणासंबंधीचे धोरण या दृष्टिकोनातून अपयशी ठरलेले आहे. प्रलोभने व सवलती यांचा फारतर नवीन निघणाऱ्या उद्योगधंद्यांना उपयोग होऊ शकतो. कित्येकदा ते एक कर्मकांड होऊन बसते. 'जेवढे शक्य आहे तेवढे केले' असे म्हणावयास शासन मोकळे होते. साहजिकच त्यातून औदासिन्य निर्माण होते. सामान्य माणूस, होत आहे ते निसर्गनियमानुसारच होत आहे, अशा निर्णयाप्रत येऊन ठेपतो.

पृष्ठ २२ वर

# सोलकढी

## □ दिग्दर्शक दामूची चोरपावले

जुन्या आणि नव्या (मराठी) नाटकात कोणता वैशिष्टिक वेगळेपणा आढळतो? माझ्या मते, जुनी नाटके जुनी होती आणि नवी नाटके नवी आहेत, हाच त्यांच्यातला नेमका वेगळेपणा होय. खरे म्हणजे माझे मत निर्णायक म्हणून स्वीकारले जायला हवे. पण, का कुणास ठाऊक, तसे ते नाही स्वीकारले जात. हेकट जिज्ञासूना नेमकेपणा झेपत नसावा. ते आपले प्रस्थापित जाणकाराकडे धाव घेतात. मराठी नाट्यक्षेत्रात सामान्य प्रेक्षकापेक्षा असामान्य जाणकार अधिक आहेत, जाणकारांच्या मते, जुन्या आणि नव्या मराठी नाटकात असा फरक आहे: जुनी नाटके खोटी होती, नवी नाटके खरी आहेत. जुनी नाटके अधिक श्राव्य होती, नवी नाटके अधिक दृश्य आहेत; जुनी नाटके (जणु काही) कादबऱ्याच होती, नवी नाटके (येथे वाचकाना 'जणु काही' असे वाचण्याचा जो अटळ मोह होईल तो त्यानी टाळावा हे बरे) नाटकेच आहेत; जुनी नाटके शिकवणुकीसाठी आणि करमणुकीसाठी लिहिली जात, नवी नाटके अनुभवणुसाठी आणि कलाणुकीसाठी लिहिली जातात; जुनी नाटके प्रेक्षक पाहायचे, नवी नाटके समीक्षक पाहतात; जुनी नाटके नाटककारांची नाटके होती, नवी नाटके दिग्दर्शकांची नाटके आहेत!

नव्या नाटकाला नाटककार, नट, प्रेक्षक नसले तरी एकवेळ चालेल ('चालेल' म्हणजे 'नाटक चालेल' असे नव्हे हो; 'नसणे चालेल'); पण दिग्दर्शक मात्र हवाच. कोठल्याही नव्या नाटकाची जाहिरात पाहा: तिच्यात दिग्दर्शकाच्या भूमिकेतल्या निर्मितिसकल्पाचे नाव ठळकपणे झळकत असते. विवाहाला 'शरीरसबध' म्हणावे त्याप्रमाणे काही दिग्दर्शक स्वतःला उघडपणे 'निर्मिति-सकल्पक' म्हणवून घेतात. दिग्दर्शकाचे हे वाढते महत्त्व जसे मराठी प्रेक्षकाला आकळू लागले आहे तसे ते सगीत नाटक अकादमीच्या सदस्यानासुद्धा उमगले असावे. म्हणून त्यांनी सगीत नाटक अकादमीचे १९७३ सालचे दिग्दर्शनाचे पारितोषिक दामू केंकरे याना बहाल करून टाकले आहे. यापुढे मराठी प्रेक्षक दामू केंकरे याना नट आणि नेपथ्यकार म्हणून न ओळखता दिग्दर्शक म्हणून ओळखू लागतील.

दामू केंकरे याना दिग्दर्शकाच्या भूमिकेत मी गेली वीस वर्षे पाहतो आहे. (आणि अनतरावाना प्रेक्षकाच्या भूमिकेत दामू केंकरे गेली वीस वर्षे पाहत आहेत.) सुरुवातीला महाविद्यालयीन एकाकिकाचे आणि 'माणूस नावाचे बेट' या विजय तेंडुलकरांच्या नाटकाचे दिग्दर्शन त्यानी केले. त्यावेळी नाट्यक्षितिजावर एक दिग्दर्शक–तारा उगवला, अशी सर्वांची समजुत झाली. ती समजूत पक्की करण्यासाठी दामूने नाना जोगाचे 'तीन अकी हॅम्लेट' बसवले. ('बसवले' म्हणजे 'उभे केले.') त्यात दिग्दर्शनापलीकडे दामूने हॅम्लेटची प्रमुख भूमिकासुद्धा केली होती. (नेपथ्य प्रभाकर गोऱ्याचे होते.) दामूची ही भूमिका विख्यात कलासमीक्षक साक्षात ज्ञानेश्वर नाडकर्णी यानी 'अमलदार'मध्ये केलेल्या सर्जेरावाच्या भूमिके इतकीच अविस्मरणीय होती, असे म्हणतात.

यानतरची पुष्कळ वर्षे, दामू केंकरे यांनी, पान खाऊन चेहेरा कोरा ठेवायचा आणि चढाव घालून सरळ चालायचा सराव करण्यात घालवली. या काळात दामू वाढला, त्याचा व्यासग वाढला, ससार वाढला. मग एकदम अलीकडच्या काळात 'मेजर चद्रकात,' 'अस झालं आणि उजाडलं,' 'घेतल शिगावर,' 'बिऱ्हाड बाजल,' 'आतून कीर्तन वरून तमाशा,' 'विदूषक,' 'सभ्य गृहस्थहो' आणि 'अखेरचा सवाल' अशा विविधरगी नाटकाचे दिग्दर्शन दामूने केले आणि तो थोर्थोर मराठी नाट्यदिग्दर्शकांच्या मालिकेत चोरपावलानी जाऊन बसला. सगीत नाटक अकादमीचे कान भलतेच तल्लख: तिने दामूच्या चोर पावलांचीसुद्धा चाहूल घेतली.

दामू केंकरे याना दिग्दर्शनाचे हे पारितोषिक मिळाल्यानतर 'महाराष्ट्र टाईम्स'ने एक स्फुट लिहिले त्यात, भालबा केळकर आणि आत्माराम भेंडे याचे स्मरण सगीत नाटक अकादमीला झाले नाही, याबद्दल खत व्यक्त केली होती.

एकूण असे की काही चोरपावले चागली वाजतात; काही चोरपावले चांगली वाजत नाहीत. आणि वाजणे–न वाजणे अखेर ज्या कानावर ठरते ते कान कधी तल्लख असतात; कधी हल्लख असतात. □

## □ सभेत कसे वागावे?

सभेत कसे वागावे, हे बाराकसारीक तपशिलानिशी सागणारी इग्रजी पुस्तके पुष्कळ आहेत. भारतीय भाषात असे एखादे पुस्तक आहे किंवा नाही याची मला कल्पना नाही. अर्थात आपल्याला अशा पुस्तकाची गरज नाही. आपण काही पुस्तके वाचून शहाणपणा जमवत नाही. तो आपल्याकडे असतोच. सभ्यतेचे, म्हणजेच सभेत कसे वागावे याचे, काही सकेत आपण सिद्ध केले आहेत. होते एवढेच की कधी कधी त्यांचा परस्परमेळ बसत नाही. मग उथलपुथल होते. उदाहरणार्थ, काही जणांना सभास्थानीच, अनेक दिवस साचलेल्या शिंका, जांभया, बोटेमोडी, खोकल्याचा यथास्थित निचरा करायचा असतो; इतराना त्याच नेमक्या वेळी सभामचावरच्या कार्यक्रमात कमालीचे स्वारस्य प्राप्त झालेले असते. वेफर्स हा सभास्थानी खाण्यासाठी मुद्दाम तयार केलेला पदार्थ आहे, आणि त्या पदार्थाला सामावणारा कागद खास सशोधनपूर्वक कुरकुरीतचुरचुरीत बनवलेला आहे, अशी काहीची धारणा असते; इतराना त्या आवाजाने आपल्या अस्मितेला धक्का लागल्यासारखे वाटते. कार्यक्रमाचा कटाळा आला तर काहीना आपलेच दोन्ही हात एकत्र आणून नापसतीदर्शक धुमध्वनी निर्माण करावासा वाटतो; इतराना डोक्यापोटातली नापसती हातात सक्रान्त करणे असभ्यपणाचे वाटते.

परवा मुबईला षण्मुखानद सभागृहामध्ये उस्ताद विलायतखाँ याच्या सतारवादनाच्या कार्यक्रमाच्या वेळी असेच घडले. भारतीय नौदलाने धर्मादाय निधी उभारण्यासाठी हा

निवडणूक पद्धतीत सुधारणा नाही तोपर्यंत

# निवडणुकांवर बहिष्कार

वा. दा. रानडे

जयप्रकाश नारायण येत्या २३ जानेवारीस पुण्यास येत आहेत. बिहारमध्ये गेले नऊ दहा महिने त्यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या आंदोलनाने देशात एक नवे वातावरण निर्माण केले आहे. देशाचा चेहरा मोहरा बदलून टाकणारी प्रभावी शक्ती या आंदोलनातून उभी राहील काय ? आंदोलनाबाबत आपली भूमिका काय आहे ? काय असायली हवी ? देशात आता पर्यंत झालेल्या निरनिराळ्या आंदोलनापेक्षा आ आंदोलनाचे वैशिष्टय व वेगळेपण कशात आहे ? या सर्वच मुद्यांचा येथे विचार करणे शक्य नाही, पण मुख्यत: निवडणुकासबंधी भूमिकेबाबत काही विचार माडीत आहे.

सर्वांगीण, सर्वंकष क्रांति हे आपल्या आंदोलनाचे उद्दिष्ट असल्याचे जयप्रकाशानी अनेकदा सांगितले आहे. सर्वांगीण म्हणजे राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, नैतिक सर्वच क्षेत्रात त्याना क्रांती हवी आहे. या सर्वच क्षेत्रातील सध्याची व्यवस्था अमूलाग्र बदलून टाकावयाची आहे. समाज बदलावयाचा आहे, तसाच माणूस बदलावयाचा आहे. पण ' सर्वांगीण क्रांती ' या शब्दानी त्याना निश्चित काय अभिप्रेत आहे, याचे शक्य तितके तपशीलवार व स्पष्ट चित्र त्यानी देशापुढे ठेवले पाहिजे. भांडवलशाही नष्ट करून समाजवादी समाज रचना स्थापणे त्याना अभिप्रेत आहे काय ? बिहार आंदोलनाची भूमिका विशद करणारी आपली भाषणे, मुलाखती, लेख व पत्रकातून ' समाजवाद ' शब्द त्यांनी एकदाही वापरलेला नाही. याचा अर्थ ते समाजवाद विरोधी आहेत असे नव्हे. स्वत ला समाजवादी म्हणविणारे सारेच खऱ्या अर्थाने समाजवादी असतात असे नाही. शब्द अनेकदा फसवे असतात. शब्दापेक्षा प्रत्यक्ष कृतीवरून नेत्याची व त्याच्या राजकीय पक्षाची खरी पारख करावयाची असते. आपले राज्यकर्ते लोकशाही समाजवादाची भाषा बोलतात पण त्याच्या कारभारात लोकशाही सकेत व लोकशाही कार्यपद्धती पायदळी तुडविली जात आहे. बँकांच्या राष्ट्रियीकरणासारखे काही उपाय योजून समाजवादाच्या दिशेने पावले टाकल्याचा देखावा सत्तारूढ पक्षाने केला असला तरी प्रत्यक्षात बड्या उद्योगपतीच्या हाती सत्तेचे आणि सपत्तीचे केंद्रीकरण वाढत आहे. खरी लोकशाही आणि खरा समाजवाद आणल्याशिवाय सर्वांगीण क्रांती होणार नाही. या दोन्ही उद्दिष्टावर वास्तविक सारखाच भर द्यावयास हवा पण जयप्रकाश सध्या तरी खऱ्या लोकशाहीच्या प्रस्थापनेवर अधिक भर देत असल्याचे दिसते. जयप्रकाशाचे आंदोलन लोकशाही विरोधी आहे, ससदीय लोकशाहीवर ते आघात करीत आहेत अशी टीका त्याच्यावर काँग्रेस नेते करीत असतात. पण जयप्रकाशाच्या भूमिकेचा हा हेतुपुरस्सर विपर्यास आहे. जयप्रकाशांना नुसती नावाची लोकशाही नको आहे ! आजच्या लोकशाहीत लोकानाच स्थान राहिलेले नाही. त्यांच्या हाती निर्णायक शक्ती राहिलेली नाही. निवडणुकीत मत देण्यापलीकडे ते काही करू शकत नाहीत. हा मताचा हक्क सुद्धा त्याना खुलेपणाने–निर्भयपणाने बजावता येत नाही. अर्थ, सत्ता, जात याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष दडपण त्यांच्यावर येत असते. यात सर्वात प्रभावी दडपण पैशाचे. लोकसभेपासून पचायतीच्या निवडणुकीपर्यंत सर्वत्र पैशाचा वापर फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. त्यातून मग भ्रष्टाचाराचे न थाबणारे चक्र सुरू होते. पैशाच्या या दडपणाला आळा घालण्यासाठी सध्याची ही निवडणूक पद्धतीच बदलली पाहिजे असे जयप्रकाशाचे म्हणणे आहे. *निवडणूक पद्धतीत कोणत्या सुधारणा हव्यात* याचा विचार करण्यासाठी तज्ञाची एक समिती त्यानी नेमली आहे. सध्याच्या पद्धतीत त्यांना आढळणारा मुख्य दोष म्हणजे लोकप्रतिनिधीवर लोकाचे नियत्रण राहिलेले नाही. एकदा निवडून आल्यानतर पुढची निवडणूक होई पर्यंत आपण कसेही वागलो तरी आपणास कोणी हलवू शकत नाही हे लोकप्रतिनिधींना माहीत असल्याने लोकहिताकडे पाठ फिरवून स्वार्थ साधण्याची

---

कार्यक्रम आयोजिला होता. आता विलायतखाँ म्हणजे केवढा मोठा सूरसाहेब तरी त्याच्या सतारवादनाचा काहीजणांना अर्ध्या तासात कटाळा आला. कटाळा येण्यातला आणि आलेला कटाळा जाहीर करण्यातला काहीजणाचा उत्साह अनावर असतो. या काहीजणापैकी काहीजण सतारवादनाच्या कार्यक्रमाला होते. त्यानी टाळ्या पिटायला सुरुवात केली. खाँसाहेबांनी वादन चालू ठेवले. तेव्हा पुन्हा टाळ्या वाजल्या. अखेर खाँसाहेबानी वादन अर्ध्यातच थाबवले. टाळ्या न पिटणाऱ्या रसिकाची घोर म्हणतात तशी निराशा झाली. टाळ्या पिटणाऱ्याचे पुढे काय झाले ते समजले नाही. या कार्यक्रमाचे जे वृत्तान्त वर्तमानपत्रातून आले त्यात टाळ्यापिट्या टंटवाळाची कडक हजेरी घेतली आहे. कलानिर्मितीत रगलेल्या कलावताचा अभद्र अपमान करायचे कुकर्म त्याच्या हातून घडले होते.

माझ्या मेंदूत मीठ कमी असल्यामुळे असेल, पण मला आपले वाटत राहिले की विलायतखाँसाहेबानी वाजवणे *अर्ध्यात टाकायला* नको होते. कलावताने कौतुकाच्या टाळ्या जशा सहन केल्या पाहिजेत; तसे कटाळ्याच्याही टाळ्याचे स्वागत केले पाहिजे.

सभेत कसे वागावे, हे सागणाऱ्या पुस्तकात सभेत कलावताने कसे वागावे, हे कधीच सांगितलेले नसते, ही गोष्ट माझ्या प्रिय वाचकाच्या लक्षात आली आहे काय ?

—अनंतराव

प्रवृत्ति त्यांच्यात वाढली आहे. याला आळा घालण्यासाठी लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार मतदारांना असला पाहिजे आपल्या घटनेत व निवडणूक कायद्यात तशी तरतूद नाही. ती केली जात नाही तोपर्यंत आपले कर्तव्य न बजावणाऱ्या लोकप्रतिनिधीचे राजिनामे मागण्यासाठी आंदोलन करण्याचा हक्क जनतेस आहे. गफूर मंत्रिमंडळाच्या राजिनाम्याची व विधानसभा बरखास्तीची मागणी याच भूमिकेवरून केली जात आहे. संसदीय लोकशाहीवर हा आघात नसून उलट तिला खऱ्या लोकशाहीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न आहे. पण जयप्रकाशाच्या अलीकडच्या भाषणावरून या मागणी बद्दलचा आग्रह त्यानी सोडल्याचे दिसते. पंतप्रधानानी निवडणुकांचे आव्हान दिले ते जयप्रकाशानी स्वीकारले असून आम्हालाही घाई नाही, निवडणुकीत आमच्या मागण्याबाबतचा अंतिम निर्णय लावून घेण्यास आम्ही तयार आहोत अशी भूमिका त्यानी घेतली आहे.

मला ही भूमिका योग्य वाटत नाही. पंतप्रधान निवडणुका घेतील तोपर्यंत थांबावयाचे तर मग विधानसभा बरखास्तीची मागणी केली तरी कशाला? ही मागणी त्वरित मान्य झाली पाहिजे यासाठी आग्रह व आंदोलन चालू ठेवणे आवश्यक आहे. मागणी मान्य होण्यासाठी अंतिम मुदत देऊन त्यानंतर जनता विधानसभेच्या निवडणुका घेण्याचा कार्यक्रम आपण पार पाडला पाहिजे. मार्चपर्यंत आमची मागणी मान्य न झाल्यास आम्ही जनता विधानसभेच्या निवडणुका घेऊन जनता सरकार स्थापन करू असे जयप्रकाशाची काही आठवड्यापूर्वी एका भाषणात जाहीर केले होते. पण या घोषणेचा पुनरुच्चार त्यानी त्यानंतर केलेला नाही. त्यामुळे या बद्दलचा आग्रह त्यानी सोडला असल्याची शंका येते. हा कार्यक्रम सोडणे म्हणजे आंदोलनाची धार बोथट करणे होय असे मला वाटते. निवडणूक पद्धतीत सुधारणा झाल्याशिवाय या पुढच्या निवडणुकात भाग घ्यावयाचा नाही अशी स्पष्ट भूमिका आपण घ्यावयास हवी. खुल्या निवडणुका झाल्या तर त्या आम्ही निश्चित जिंकू असे जयप्रकाशानी अनेक भाषणातून सांगितले. सध्याच्या निवडणूक पद्धतीत पैशाच्या प्रभावावर मतदारांवर दडपण आणून निवडणुका जिंकणे सत्तारूढ पक्षाला सोपे व सोयीचे जाते. त्यामुळे ही पद्धती बदलण्याची त्याना निकड नाही. बिहारमध्ये काँग्रेस राजवटीविरुद्ध सध्या एवढा असंतोष आहे की सध्याच्या निवडणूक कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुका सुद्धा पैशाच्या दडपणावर मात करून आपण जिंकू असा विश्वास जयप्रकाशाना वाटतो म्हणून पंतप्रधानाचे आव्हान त्यानी स्वीकारले आहे.

निवडणुकीवरील बहिष्काराबाबत सर्वत्र एक धोरण स्वीकारावे की बिहारचा अपवाद करावा? नव्या पद्धतीने निवडणूक लढविण्याचा प्रयोग करून त्याचे यश जयप्रकाशाना बिहारमध्ये अजमावून पहायचे आहे. प्रत्येक मतदार संघात विद्यार्थीसंघर्ष समित्या व जनसंघर्ष समित्या स्थापन करून त्यानी जनता उमेदवार निवडावे. या उमेदवारानी काँग्रेसशी सरळ लढत द्यावी असा प्रयत्न व्हावयाचा आहे. जयप्रकाशाच्या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या विरोधी पक्षाच्या नेत्यानी या बाबतीत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. मतदाराचा विश्वास गमावलेल्या लोकप्रतिनिधीस परत बोलावयाचा हक्क मतदाराना देणारी तरतूद आपल्या घटनेत होईल तेव्हा होवो तो पर्यंत वाट न पहाता लोकानीच आपल्या आंदोलनाने व नैतिक दडपणाने हा हक्क प्रस्थापित केला पाहिजे. 'आम्ही तुमचा विश्वास गमावला आहे असे तुम्हाला वाटेल तेव्हा आमच्या राजिनाम्याची मागणी करा, आम्ही ती मान्य करू' असे आश्वासन संघर्ष समित्यांनी निवडलेले उमेदवार जनतेला देतील. या उमेदवारावर संघर्ष समित्यांचे म्हणजे पर्यायाने मतदाराचे नियंत्रण राहील. बिहारपुरता हा प्रयोग या दृष्टीने जयप्रकाश करू पहात आहेत, पण सर्वांगीण क्रांतीच्या आंदोलनाचा हा एक भाग आहे याचा विसर पडून निवडणुकीच्या राजकारणात आंदोलन गुरफटले जाण्याचा धोका मला त्यात वाटतो. निवडणुका जिंकण्याचे दृष्टीने जयप्रकाशाच्या लोकप्रियतेचा व वजनाचा आपणास उपयोग करून घेता येईल या उद्देशानेच मुख्यत विरोधी पक्ष त्यांच्या आंदोलनाला आज पाठिंबा देत आहेत. जयप्रकाशाना याची जाणीव आहे पण निवडणुकीच्या राजकारणात एकदा गुरफटल्यानंतर त्यातून बाहेर पडणे कठीण जाते. निवडणुका जिंकून काँग्रेसच्या जागी दुसरे सरकार आले तरी परिस्थिती ते फारशी बदलू शकणार नाही असे जयप्रकाशानीच काही महिन्यापूर्वीच्या एका भाषणात म्हटले आहे. तेव्हा निवडणुकांच्या राजकारणात न पडता लोकाचे निकडीचे प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष करून आंदोलनाचे पाऊल पुढे पडणार आहे. निवडणूक पद्धतीत सुधारणा होईपर्यंत सर्व निवडणुकावर आम्ही बहिष्कार घालू अशी ठाम भूमिका घेतल्याशिवाय या प्रश्नाची तड लागणार नाही. तेव्हा बिहारचा अपवाद न करता सर्वत्र हीच भूमिका घेण्यात यावी. काँग्रेसला पाठिंबा देणाऱ्या ३०–३५ टक्के लोकांनीच मतदान केले, बहुसंख्य लोकानी बहिष्कार पुकारला तर निवडणुका जिंकूनही काँग्रेसचा तो सर्वात मोठा पराभव होईल.

□

# विधिज्ञ निषेध समितीचे असामान्य कार्य

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा क्रमांक ११

अशोक परळीकर, परभणी

हैदराबाद राज्यातील अराजकतेने बुद्धिजीवी वर्ग विचलित झाला, व्यथित झाला. त्याची परिस्थिती मोठी चमत्कारिक झाली. चूप बसणे शक्य नव्हते आणि काही करणे तर त्याहूनही अशक्य होते. एक विचित्र कूट-समस्या होती. श्री. सदाशिवराव महा हे याच वर्गातील तरुण, तडफदार आणि प्रतिष्ठित विधिज्ञ, त्यांनी स्वकर्तृत्वाने थोड्याच दिवसांत आपल्या व्यवसायात नावलौकिक मिळविला होता. तत्कालिन परिस्थितीमुळे ते अत्यत विचलित आणि क्षुब्ध झाले. काय करावे? बस्स! फक्त विचार–विचार! विचार! आणि विचार! पण उत्तर सापडत नव्हते. त्याची झोप उडाली. रात्र रात्र ते अथरुणावर तळमळत पडत–पाण्याबाहेर काढलेल्या मासोळीप्रमाणे. परतु उपाय सापडत नव्हता. एके दिवशी त्यांची प्रामाणिक तपश्चर्या फळाला आली त्याना एक कल्पना सुचली, एक उपाय सुचला. उपाय अवघड परतु हमखास होता. राज्याबाहेरील सर्वांचे लक्ष वेधण्यास पुरेसा होता. राज्यातील सर्व विधिज्ञानी (राज्यात न्यायराज्य नसल्यामुळे) न्यायालयावर बहिष्कार घालावयाचा आणि मिळालेला वेळ (हिन्दूवर) नागरिकावर होणाऱ्या अन्यायाची निःपक्षपाती चौकशी करणे, (हिन्दू) प्रजेचे मनोधैर्य कायम ठेवणे, अत्याचार आणि 'अत्याचारीना' प्रकाशात आणणे–इत्यादी कार्यांत व्यतित करावयाचा. निझामाच्या चेहऱ्यावरील असत्याचा बुरखा फाडून त्याच्या कुटील, धर्मांध आणि अन्याय्य सत्तेचे स्वरूप सर्वांना दाखवावयाचे. बस्स! ठरले. त्यानी आपली कल्पना आपल्या मित्राना सागितली. काहीजणानी 'बहिष्कार टाकण्याची' कल्पना अव्यवहार्य असल्याचे सागून त्याना निराश केले. परतु त्याच्या एक–दोन तरुण मित्रानी मात्र या कल्पनेला उचलून धरले आणि मनापासून सहकार्य देण्याचे मान्य केले. हे मित्र म्हणजे श्री. जे. व्ही. नरसिंगराव, बॅ. शहाबुद्दीन आणि श्री. माधव रेड्डी. या सर्वांनी एकमेकास सहकार्य करण्याचे वचन दिले आणि ही मडळी उत्साहाने एजट जनरल श्री. के. एम्. मुन्शी याच्याशी सल्लामसलत करण्यासाठी गेली. श्री. मुन्शीनी ही कल्पना प्रत्यक्षात येणे जरा कठीण आहे असे म्हटले. राष्ट्रपिता महात्मा गांधी याच्या असहकार आंदोलन काळातील अशा बहिष्कारांचा अनुभव विशेष उत्साहवर्धक नव्हता. हे तरुण निराश होऊन परत आले. निराश झाले, परतु मैदानातून बाहेर पडणे त्याना प्रशस्त वाटेना. त्यानी आपली धावपळ, सल्लामसलत चालू ठेवली. एकदा हे सर्व तरुण श्री. विनायकराव कोरटकर विद्यालकार याच्याकडे गेले. त्यानी शातपणे या तरुण विधिज्ञाचे म्हणणे ऐकूण घेतले. बिचारे अगदी तळमळीने आपले म्हणणे माडीत होते. उरात नाउमेद करण्याची भीती होती. परतु बॅ. विद्यालकारानी त्याना निराश केले नाही. गाधींना यश मिळाले नाही म्हणून यश मिळणारच नाही असे का व कसे गृहित धरावयाचे? त्यानी विचार करण्याचे आश्वासन दिले. ही मडळी आनदली. बॅ. विद्यालकारांनी आपल्या घरी शहरातील वकिलांची एक अनौपचारिक बैठक बोलाविली. प्रश्न आणि कल्पनेला धरून खूप चर्चा झाली. अनुकूल–प्रतिकूल वाद रगला. प्रतिकूल विचार प्रकट करणाऱ्यानी असा प्रश्न केला–"ठीक आहे बहिष्कार टाकू. परतु ज्याना या व्यवसायाशिवाय उपजीविकेचे दुसरे साधन नाही त्याचे काय? त्यानी कशाच्या जोरावर आपल्या ससाराचा रथ हाकावयाचा?"– प्रश्न समर्पक होता. यावरही उपाय सुचविण्यात आला–'अशा विधिज्ञाना दरमहा आर्थिक मदत दिली जावी.' ठरले. प्रतिकूल असणाऱ्यानी 'नुसते ठरून उपयोगी नाही. बहिष्काराचा कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी आवश्यक रक्कम, निदान दहा सहस्र जमा केले जावेत.' असे प्रतिपादले. बहिष्काराचा कार्यक्रम केवळ पैशामुळे अडणार असेल तर आपण आपल्या पत्नीचे सर्व अलकार तारण ठेवून आवश्यक रक्कम उद्याच देऊ असे श्री. जे. व्ही. नरसिंगराव यांनी म्हटले. त्याच्या बोलण्यात विलक्षण आवेश आणि उत्साह होता. तेव्हा जास्त ताणण्यात अर्थ नाही असे लक्षात घेऊन सर्व उपस्थितानी बहिष्काराची ही कल्पना उचलून धरली आणि समर्पणाच्या भावनेने सर्वतोपरी सहभागी होण्याचे मान्य केले. श्री. सदाशिवराव महा आणि त्याचे तरुण मित्रमडळ आनदले.

बहिष्काराचे नक्की ठरले. या तरुणानी पैशाची व्यवस्था करण्याचे ठरविले. त्यांनी थोड्याच दिवसात दहा हजार रुपये मिळविले.

सर्वश्री जे. व्ही. नरसिंगराव, बी. रंगारेड्डी, दोंती गोपालरेड्डी यांनी या कामी फार परिश्रम घेतले. वनपरतीचे राजा रामेश्वर यांनी आंदोलन समाप्त होईपर्यंत मासिक दोन हजार रुपये देण्याचे मान्य केले. धनसंग्रह झाला. आता 'बहिष्कार घोषणा पत्रावर' स्वाक्षऱ्या घेण्याचे कार्य सुरू झाले. शभर एक विधिज्ञाच्या स्वाक्षऱ्या झाल्या. विरोधक या झपाट्यामुळे निष्प्रभ झाले. पूर्वतयारी होताच श्री. काशिनाथराव वैद्यांच्या बंगल्यावर बैठक बोलाविण्यात आली. या सभेत विधिवत् Pleaders Protest Committee ( विधिज्ञ निषेध समिती )ची स्थापना झाली. पदाधिकारी निवडले गेले. अशा प्रकारे P. P. C. ( वि. नि. स. ) अस्तित्वात आली. बुद्धिजीवी वर्गाची संघर्ष समिती प्रत्यक्षात आली. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने वि. नि. स. ला त्याच्या झेंड्याखाली कार्य करण्यास सुचविले. परंतु वि. नि. स. ने ते अमान्य केले. ते स्वतंत्रपणे, कोणताही राजकीय रंग न आणता कार्य करू इच्छित होते या त्याच्या स्वतंत्रपणातच त्याचे सामर्थ्य एकवटले होते. हे बहिष्कार आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित नव्हते तर या आंदोलनाचा मूळ हेतू राज्यातील अराजकता, अन्याय, अत्याचार नष्ट होऊन, राज्यात शांती आणि सुव्यवस्था म्हणजेच न्यायराज्य स्थापन व्हावे हा होता. सर्व संमतीने निवडलेले पदाधिकारी असे– अध्यक्ष . बॅ. विनायकराव विद्यालंकार, उपाध्यक्ष : श्री. गोपाळराव एकबोटे, कार्यवाह : श्री. धरणीधर संघी आणि कोषाध्यक्ष श्री. जे. व्ही. नरसिंगराव. कार्यालयासाठी जागेचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा श्री. वसंतराव मुखेडकर यांनी आपल्या घरात कार्यालयासाठी जागा देण्याचे मान्य केले. त्यांच्या या साहसाचे आणि धैर्याचे कौतुक करण्यात आले कार्यालय श्री. वसंतराव मुखेडकरांच्या जागेत ठेवण्याचे निश्चित झाले. रीतसर त्यांच्या घरी कार्यालय आले. त्या काळात श्री. मुखेडकरांच्या घराला 'आनंदभवन' म्हटले जात असे. परंतु तत्कालीन स्फोटक परिस्थिती लक्षात घेता 'आनंदभवन'पेक्षाही या घराचे स्थान महान होते. कारण कोणत्याही वेळी संघटित रझाकार या कार्यालयावर ( म्हणजेच घरावर ) हल्ला करून, 'आनंदभवन'चे 'अनाथ भवन' वा 'सपाट भवन' करू शकले असते. असुरक्षिता, आक्रमणाचे भय असूनही श्री. वसंतराव मुखेडकरांनी जे धैर्य केले त्यामुळे सर्वजण प्रभावित झाले, दुप्पट उत्साहाने आपल्या नियोजित कार्यास लागले.

मुख्य न्यायमूर्तींना निवेदन दिल्याच्या दुसऱ्या दिवसापासून वि. नि. स. च्या केंद्र कार्यालयातून पुढील कामाचा श्रीगणेशा करण्यात आला. विविध उपसमित्या, संयोजक आणि साहाय्यकांसह, स्थापण्यात आल्या. अत्यंत जोमाने कार्यास प्रारंभ झाला. केंद्र कार्यालय फारच कार्यक्षम होते. उपसमित्यांपैकी 'फिरत्या समिती'च्या प्रयत्नाने, पाहता पाहता, बहिष्कार राज्यव्यापक बनले. न्यायालयांवर बहिष्कार 'टाकलेल्या' विधिज्ञांची संख्या सातशेपेक्षाही जास्त झाली होती. या कार्यात मोहरीर आणि अशीलांनी जे सहकार्य दिले तेही अत्यंत प्रशंसनीय असेच आहे. या सर्वांच्या एकजुटीने अनेक न्यायालयाचे कामकाजच बंद पडले

विधिज्ञ निषेध समितीची सर्वांत प्रभावी उपसमिती 'तक्रार आणि चौकशी' विषयक होती. राज्यभर प्रतिदिन होणाऱ्या अन्याय, अत्याचारांना प्रकाशित करणे, भीषण अग्निकांड आणि पाशवी अत्याचार स्थळांना प्रत्यक्ष चौकशीसाठी भेट देणे, प्रत्यक्ष अनुभवातून सत्य घटना, वार्ता आणि छायाचित्रे समितीला प्रस्तुत करणे–एकंदर सर्वच कार्य अवघड, जिवावर बेतण्याची शक्यता असलेले; परंतु हे लोक आपले कार्य अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणे पार पाडीत. अशा वृत्तांतामध्ये बीदर आणि वरंगल जिल्ह्यातील अनेक घटना अंगावर (आजसुद्धा) शहारे आणतात. वृत्तप्रसारणाच्या कार्यात लिंगायत कॉन्फरन्सची स्थायी समिती आणि मद्रासच्या 'हिन्दू' दैनिकाचे स्थानीय वार्ताहर श्री. वामनराव अग्रेसर होते. अत्याचारासंबंधीची संकलित माहिती राज्य सरकारला प्रार्थनापत्रे, तारा द्वारे पोचविली जाई. काही गंभीर घटना भारताचे प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू, एजंट जनरल श्री. के. एम्. मुन्शी, आणि कॉंग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबू राजेंद्रप्रसाद यानाही कळविण्यात येत अर्थात त्या प्रत्येकाची एक प्रत राज्याच्या संबंधित मंत्र्यांना आणि प्रधानमंत्र्याला देण्यात येई. कोणतीही गोष्ट लपून छपून नव्हती. एक दोनदा तर प्रत्यक्ष निझामाकडेच तक्रार नोंदविली गेली. वि. नि. स. च्या या चौकशी साहित्याचा उपयोग नंतर भारत सरकारने आपल्या श्वेतपत्रिकेत केला. समितीने एकत्र केलेले माहिती साहित्य अत्यंत महत्त्वाचे–अत्यंत दुर्लभ आणि अप्राप्य. जवळ जवळ पाचशे घटनांची पूर्ण चौकशी करून, पडताळून, साग्र–संगीत माहिती, छायाचित्रांसह, जमविण्यात आली होती. [ वि. वि. स. (P. P. C.)चे सारे कागदपत्र (Record) लायक अली मंत्रिमंडळातील सदस्यांवर खटले चालविण्याच्या संदर्भात तत्कालिन गुप्तचर विभागाने–नगर= वाला-घेतल्याचे म्हटले जाते. परंतु तो सर्व अमूल्य आणि ऐतिहासिक ठेवा आज सुरक्षित आहे किंवा काय हे कसे सांगावे. 'कालाय तस्मै नमः' दुसरे काय ? ]

निषेध समितीचे आणखी एक उल्लेखनीय कार्य मजलिसे इत्तेहादुल मुसलमीनशी संबंधित होते. मजलिसच्या नेत्यांची भडक आणि विषारी भाषणे, प्रस्ताव, स्थानीय उर्दू वृत्तपत्रातील संपादकीय, लेख इत्यादीचा संग्रह करणे, त्या सर्वांचे इंग्रजीत भाषांतर करून, वेळोवेळी भारत सरकारला कागद पत्रे पाठवून, इकडील परिस्थितीचे यथार्थ दर्शन घडविणे–हे कार्यही अत्यंत जोमाने आणि परिश्रमपूर्वक करण्यात आले. या विषयावर चार मोठे संग्रह प्रस्तुत करण्यात आले.

निषेध समितीने प्रेस (वृत्तसंस्था) आणि प्रकाशन समितीद्वारेही अशीच महत्त्वाची कामगिरी पार पाडली. प्रतिदिवशी महत्त्वाच्या बातम्या मिळवायच्या आणि त्यावर आवश्यक टीका–टिप्पणी लिहून, विस्तृत रूप देऊन, विविध भाषेतील वृत्तपत्रांना प्रकाशनार्थ पाठवायचे. हे कार्यही यशस्वीपणे चालविले गेले. परंतु थोड्याच दिवसात निझाम सरकारने प्रेस आणि वृत्तपत्रे यावर काही कडक बंधने घातली आणि या वार्ता बाहेर पडणार नाहीत अशी व्यवस्था केली तरीही स्थानीय रहनुमा आणि इमरोज या वृत्तपत्रांनी अत्यंत निर्भीडपणे सत्यकथन करण्याचे व्रत चालूच ठेवले आणि निषेध समितीला चांगलेच सहकार्य दिले. त्यांच्या या धोरणामुळे सरकारचा त्यांच्यावर रोष झाला. या वृत्तपत्रावर गंडातर आले.

'रहनुमा' बंद पाडण्यात आले आणि 'इमरोज'चा तरुण संपादक श्री. शोईब उल्लाखा याची 'तिखट लेखणी' बंद पाडण्यासाठी, त्याचा विरोध मोडून काढण्यासाठी, त्याला दि. २१।८।१९४८ रोजी मारेकरी घालून मारण्यात आले. ( **अधिक माहितीसाठी 'हुतात्मा पत्रकार श्री. शोईब उल्लाखा' ही कथा वाचा. 'माणूस' दि. १९-१०-१९७४) तरीही** समितीने आपले कार्य चालूच ठेवले.

निषेध समितीतर्फे वेळोवेळी अनेक महत्त्वपूर्ण वक्तव्ये प्रकाशित करण्यात आली. या वक्तव्यातून सरकारच्या चुकीच्या पावलावर उघड उघड आणि रास्त टीका असे. त्यांच्या अविवेकी धोरणाचा विरोधही केला जाई–यामुळे त्या सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीतही हिन्दूचे मनोबल कायम राहाण्यास निश्चितच मदत झाली. दि. ६ एप्रिल १९४८ रोजी निझामाला एक निवेदन देण्यात आले. विधानसभा संबंधित निझामाच्या घोषणेची वैधानिक टीका प्रकाशित करून जनतेला मार्गदर्शन करण्यात आले. स्वाभाविकपणेच सरकार आणि मजलिसची कृपादृष्टी (!) यांच्याकडे वळली. त्यांनी निषेध समिती सदस्याचा सूड घेण्याचे ठरविले. हाती अनियंत्रित सत्ता होतीच. मग काय ? तसे सुरुवातीपासूनच विधिज्ञांचा हा बहिष्काराचा निर्णय न रुचून काही सरकारी अधिकाऱ्यांनी निषेध समितीवाल्यांना, सत्तेविरुद्ध बंड उभारल्याच्या आरोपावरून न्यायालयासमोर उभे करण्याची धमकी आणि सूचनाही (Notice) दिली. एवढेच नव्हे तर त्यांच्या सनदा जप्त केल्या जातील म्हणूनही सांगितले. परंतु या धमक्या, सूचनांचा त्या बुद्धिजीवी वर्गावर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी एखादे कारण दाखवून वा न दाखविताही वि. नि. स. च्या कार्यकर्त्यांना गजाआड करण्याचे कार्य सरकारने आरंभिले. फिरत्या समितीचे सदस्य सर्वश्री रामराव भादेकर आणि वासुदेवराव गावसुदकर यांना, बॉम्ब कटाचा आरोप लादून, पकडण्यात आले. समितीचे कार्यवाह श्री. धरणीधर संघी यांना सुरक्षा कायद्याखाली पकडण्यात आले. सर्वश्री ताताचार, के. रामगोपाल आणि ए. राघवन यांना अकारणच बंदी करण्यात आले. १५ ऑगस्ट १९४८ रोजी स्वतंत्र भारताच्या प्रथम स्वातंत्र्य वर्धापन दिनानिमित्त, एजंट जनरल श्री. के. एम. मुन्शीजींच्या आमंत्रणावरून विधिज्ञ निषेध समितीचे काही सदस्य भारतीय स्वातंत्र्य समारोहात सम्मीलित होण्यासाठी लोकल ट्रेनमधून बोलारमला जात असता रझाकारच्या एका सशस्त्र तुकडीने त्या लोकल ट्रेनवर हल्ला केला. सुदैवाने कोणी कामाला आला नाही. परंतु समितीचे दोन सदस्य जखमी झाले. स्वाभाविकपणेच निषेध समितीने तीव्र शब्दात या हल्ल्याचा निषेध केला आणि सरकारी प्रशासन आणि व्यवस्थेची उघड उघड निर्भर्त्सना केली. परिस्थितीची पावले कोणत्या दिशांनी पडताहेत हे दिसत असूनही श्री. धरणीधर संघींचा कार्यभार सांभाळण्यास श्री. सदाशिवराव महा पुढे आले. श्री. सदाशिवराव महा विधिज्ञ निषेध समितीचे कार्यवाह झाले हे कळताच त्यांच्या आणि श्री. जे. व्ही. नरसिंगराव यांच्या विरुद्ध पकड वॉरंट काढण्यात आले. परंतु पूर्वसूचना मिळाल्यामुळे हे दोघेही भूमिगत झाले. या दोघांच्या भूमिगत होण्याने सरकारला हात चोळत बसावे लागले. एका मुसलमान पोलीस अधिकाऱ्याने त्या दोघांना वॉरंटची सूचना दिली आणि भारत सरकारतर्फे थोडयाच दिवसांत 'पोलीस कारवाई' होणार आहे, तेव्हा थोडे दिवस भूमिगत व्हा असा मित्रत्वाचा प्रेमळ सल्लाही दिला. इथ एका गोष्टीचा उल्लेख करणे अप्रासंगिक होणार नाही की विधिज्ञ निषेध समितीद्वारा सन्माननीय मुख्य न्यायाधिशांना जे निवेदन सादर केले गेले होते. (पहा–'माणूस' दि. ११ जानेवारी १९७५ मधील वि. नि. स. चा न्यायालयांवर अपूर्व बहिष्कार ही कथा.) त्याची रचना ( Drafting) जस्टिस कमर हसन साहेबांनी केली होती. ते राष्ट्रीय विचारसरणीचे होते आणि श्री. सदाशिवराव महांचे सीनियरही होते. त्यांनी अतिशय नम्र भाषेत परंतु स्पष्ट शब्दात समितीचा बहिष्कार निर्णय निवेदनाद्वारे कागदावर उतरविला. असो !

परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत चालली. हैदराबादचे शिष्टमंडळ शेवटची दिल्लीयात्रा करून, वाटाघाटी फिसकटल्यामुळे, अयशस्वी होऊन परतले. भारत सरकारनेही आता पाऊल उचलले. त्यांनी हैदराबाद राज्याची आर्थिक नाकेबंदी केली. इकडे पिसाट रझाकारांचा हैदोस अत्युच्च शिखराला पोचला होता. वातावरण भलतेच स्फोटक, ज्वालाग्राही बनले होते. ठिणगी पडावयाचाच अवकाश होता. इकडे भारताने राज्याच्या सीमेवर भारतीय सेना सज्ज ठेवली. निझामाचा आपल्या सैन्याच्या पराक्रमावर




आणि सालारे आझम कासिम रझवीच्या रझाकार दलाच्या बहाद्दुरीवर (!) अतत विश्वास होता. त्याने आपल्याकडून या सर्व बहाद्दुराच्या जोरावर युद्धाची पूर्ण (!) तयारी केली होती. दुसरीकडून आपल्या स्वतत्र राहण्याच्या अधिकाराचा न्याय्य प्रश्न (!) U. N. O. कडे नेण्याचाही प्रयत्न त्याचा चालूच होता. एकदर हैदराबादचे भविष्य टागते होते.

१९४८ चा सप्टेंबर मास. हैदराबादचे प्रधानमत्री श्री. लायकअली यानी विधिमडळात घोषणा केली की, हैदराबाद राज्यात शाती आणि सुव्यवस्था असून कोणालाही कोणताही धोका नाही. तेव्हा भारत सरकारने आपली सेना सिकदराबादला पाठवू नये. लायकअलीची वरील घोषणा म्हणजे सत्यावर पाघरूण घालणे, जगाच्या डोळ्यात धूळ फेकणे होय. तेव्हा विधिज्ञ निषेध समितीचे अध्यक्ष बॅ विनायकराव विद्यालकार यानी प्रधानमत्र्यांच्या या घोषणेचा पुराव्यासह समाचार घेण्याचे योजिले आणि दि. ९ सप्टेंबर १९४८ रोजी त्यानी आपल्या वक्तव्यात प्रधानमत्री श्री. लायकअलीला खुले आव्हान दिले आणि आपले विधान, राज्यात शांती आणि सुव्यवस्था आहे, सिद्ध करण्यास सागितले. बॅ. विनायकराव कोरटकर विद्यालकार यांनी केलेले वक्तव्य निम्नप्रकारे होते—

'प्रधानमत्री श्री. लायकअली यानी राज्य विधिमडळात राज्यातील सुरक्षा आणि शातीसबधी जे विधान केले ते सत्यविपर्यस्त म्हणजेच निखालस खोटे आहे. आपली ही घोषणा, हे निवेदन कोणत्याही विचारप्रणालीच्या व्यक्तीस विस्मित करणारे आहे. आपण घोषित केले की, राज्यात सुरक्षा आणि शाती नादते आहे. मग गेल्या सहा महिन्यापासून राज्यातील विधिज्ञानी न्यायालय आणि कार्यालयातून काम करण्याचे का बद केले ? राज्यात झालेल्या, होणाऱ्या अत्याचारासबधीची माहिती एकत्र करण्यासाठी यातील काही नामवत विधिज्ञाची समिती कार्यरत आहे. त्यांच्या चौकशीचा अहवाल वेळोवेळी आपणालाही सादर करण्यात आला. त्याच्या चौकशीतून निष्पन्न झालेले सत्य कोणत्याही निःपक्ष व्यक्तीसमोर प्रमाणित, सिद्ध केले जाऊ शकेल. तरी राज्यातील सर्वच अत्याचाराची माहिती इथे एकत्रित झालेली नाही. केवळ आमच्यापर्यंत आलेल्या तक्रारींची चौकशीच आम्ही केली आहे. कितीतरी घटना चौकशी न झालेल्या आहेत. १५ जानेवारी १९४८ ते ११ ऑगस्ट १९४८ मध्ये घडलेल्या पाशवी अत्याचारांपैकी आमच्या समितीने ३५३ (तीनशे त्रेपन्न) खेड्यात झालेल्या अन्याय, अत्याचाराची चौकशी केली. निष्पन्न काय तर पन्नासपेक्षा अधिक खेडी जाळून राख करण्यात आली, शेकडो व्यक्तींची कत्तल करण्यात आली. अनेकाना जिवत जाळण्यात आले. अनेक ठिकाणी लोकाना एका रागेत उभे करून गोळ्या चालविण्यात आल्या, अनेक महिलावर बलात्कार करण्यात आला आणि अनेकींना विहिरीत फेकल्याचेही दृष्टोत्पत्तीस आले आहे या उदाहरणात ते पन्नास अत्याचार नाहीत, ज्याच्या निषेधार्थ श्री. जे. व्ही. जोशी यांनी आपल्या मत्रिपदाचा त्याग केला. काही अत्याचार तर असे भयानक आणि अमानवी आहेत की शब्दातून, वाणीद्वारे त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

गोर्टा गावी ९ मे रोजी २०० लोकांची निर्दय कत्तल करण्यात आली वा जिवत जाळण्यात आले. शिवाय पंचाहत्तर लाख रुपयांची सपत्तीही लुटण्यात आली. या गावावर झालेल्या भीषण, अमानवी आक्रमणानंतर कित्येक दिवसानी आमच्या समितीचे सदस्य तेथे गेले. तेथे त्याना तेव्हाही अनेक फुटलेल्या कवट्या, इतस्ततः विखुरलेली हाडे, जळालेली प्रेते दिसली. (सविस्तर माहितीसाठी 'माणूस'चा १९ ऑक्टोबर १९७४चा अक, 'परमवीर हळबरे नागण्णा' ही कथा वाचा.) ११ ऑगस्टनतरही अत्याचाराचे सत्र चालूच आहे.

उदगीर येथे मुसलमानाच्या एका मोठ्या जमावाने दोनशे लोकांना (हिन्दूना) गोळ्या घातल्या. कित्येकांना जिवत जाळण्यात आले. एक मठ लुटण्यात आला. स्थानकावर, प्रवाशावर हल्ले करण्यात आले. आणि या सर्वांवर कडी म्हणजे रझाकारानी भरलेल्या ट्रक्स घेऊन स्वतः कासिम रझवीने या भागाची (उदगीर परिसराची) विजययात्रा केली. १९४८ च्या जानेवारी महिन्यात परमळसकेस गावी १९ व्यक्तीना रागेत उभे करून गोळी मारण्यात आली. १४ एप्रिलला एका पोलीस सब-इन्स्पेक्टरच्या आज्ञेने २७ व्यक्तीना अशाच प्रकारे मारण्यात आले. १९ ते २१ मार्चपर्यंत वलाडी गाव लुटण्यात आले. आणि एका जोडप्याला जिवत जाळण्यात आले. २६ ऑगस्टच्या, सकाळी ५ वाजता, भैरवुनिपल्ली गढीवर रझाकार, पोलीस आणि सेना यांनी सघटित आक्रमण केले. २६ हॅंडग्रेनेडस् फेकले. १५० व्यक्तीना मारले त्यात तीन महिला होत्या. १५ महिलांवर पाशवी बलात्कार करण्यात आला. त्यांचे मगळसूत्र तोडण्यात आले. गावातील प्रत्येक घर लुटण्यात आले. त्याच दिवशी या गुडानी कोटिगलवर हल्ला करून १८ व्यक्तीना मारले. (सविस्तर माहितीसाठी 'माणूस'चा दि. ३० नोव्हेंबर १९७४ चा अक पाहा. कथा— 'रक्तरजित भैरवुनिपल्ली.)

वरील अत्याचाराची माहिती वेळोवेळी अधिकाऱ्याना दिली गेली. फार क्वचित प्रसगी अपराध्याना दडित करण्यात आले.

परतु या अत्याचाराना थाबविण्याचा कोणताही प्रयत्न न करता आपण जगासमोर ही घोषणा देत अहात की राज्यात अशाती नाही. आश्चर्य ! अर्थात आपणावर टीकाटिप्पणी करावी हा आमचा उद्देश नाही. परंतु आपण जगाच्या डोळ्यात धूळ फेकावी आणि आम्ही प्रेक्षकाची भूमिका घेऊन स्वस्थ बसावे हे आम्हाला शक्य नाही.'

वरील निवेदनाने सर्वत्र हाहाकार माजला. प्रत्यक्ष राज्यात, प्रधानमत्री लायकअलीला ही एक लायक चपराक होती. राज्यातील अराजकतेचे बीभत्स आणि नग्नरूप जगासमोर प्रस्तुत करण्यात आले. बॅ. विनायकरावाना या अपराधाबद्दल कैद करण्यात आले. त्याना चचलगुडा कारागृहात नेण्यात आले. तेथे पूजनीय स्वामी रामानदतीर्थ तुरुगवास भोगीत होते. त्यानी म्हटले, 'शाबास ! म्हणजे शेवटी आपणही आलात ?' श्री. विनायकरावजी उत्तरले, 'आलो पण आपणा सर्वांना मुक्त करण्यासाठी.'

योगायोगाने तीन दिवसातच म्हणजे दि. १३–९–४८ रोजी 'पोलीस ॲक्शन'चा आरभ झाला आणि स्वतत्र इस्लामी राज्याचे स्वप्न पाहणारा, लाल किल्ल्यावर आसफिया झेडा, सालारे आझम कासीम रझवी आणि त्याच्या पराक्रमी (!) रझाकाराच्या जोरावर, उभारू इच्छिणारा निझाम हात जोडून शरण आला. चार दिवसांत खेळ समाप्त. आझाद हैदराबादचे भूत दि. १७–९–४८ रोजी नेहमीसाठी गाडले गेले.

११ ऑक्टोबर १९४८ रोजी पुन्हा एक निवेदन सन्माननीय मुख्य न्यायाधीशांच्या सेवेत प्रस्तुत करून, विधिज्ञानी न्यायालयावर घातलेल्या या अपूर्व बहिष्काराची यशस्वी सांगता करून पूर्ववत कामास प्रारभ केला.

□ □



# भागामायची सूनबाई!

कुं. ल. पुरी

'**स**रसे ऽऽ! अवं ए सरसे!'

'जी अत्याबाई ऽ!'

'हिगं, इकडं ये!'

'कश्शाले ऽ?'

'तुलं ये म्हते ना! नसत्या पंचाइती कामून करतीस?'

गोठ्यातलं शेण काढता काढता सरस्वतीचा जीव मेटाकुटीला आला व्हता. तिला भागामायपुढं जावं वाटंना, पन विलाज नव्हता. भागामाय तिची सासू. लई कजाग बाई. सुनंच्या कंबरेत लाथ घालायला मागंपुढं बघायची नाय! लईच दरारा तिचा. तव्हा शेणाच्या भरल्या हातापायानं ती भागामायपुढं उभी न्हायली.

'झालं का शेण?'

'नाही!'

'न्हायी? म्हंजेनी काय? काम करतीस का झोप काढतीस?'

'इतक्या लवकर कसं व्हयीलजी! चांगलं खंडीभर ढोराचं हागलंमुतलं काढायचं–गवऱ्या वळायच्या...'

'मढ्यावानी काम केल्यावर कसं व्हयील.. हातापायातून जीव गेला का तुझा?...नटवी, भटकभवानी...' भागामायच्या मुलुकमैदानच्या भडीमारात सुनबाईचा किल्ला भक्कम तटबंदीचा असल्यामुळं शाबूत राहिला. ती तितक्याच चढ्या आवाजात म्हणाली, 'सासूबाई, उगीच काही-बाही बोलू नका रामपाऱ्यात, निघाला का दिस कुत्र्यावानी भुकायला...'

'चूप सटवे, मला म्हंतेस–या भागाबाईला–बुचडचाला धरून हासडीन चांगली, काय वाटते? खुंदळू खुंदळू मारीन...आँ... बेशरम, लई चुरूचुरू जबान चालत्ये; उपटून हातात देईन!'

'पन एवढं कहापायी बोलताजी, माजा गुन्हा काय?'

'बरं बरं, मला बोलायला येळ न्हायी... जा, लवकर आटप काम. मंग धवायला जा. लवकर परत ये. बोलत नगं बसू! शेतात पेरणीचं तास धरायचंय्!' भागामायचं फर्मान सुटलं. भागामायला न्हायी म्हणण्याएवढी सूनबाईची हिंमत नव्हती. तव्हा ती तणतणत– फणफणत– पाय आपटत गेली. अन् जोरजोरानं झाडणी आपटून गोठा साफ करू लागली.

सरस्वतीचं लगन च्यार महिन्या अगुदर झालं व्हतं. शाहरची पोर. बापाची गरिबी. माय काही सायेब लोकाकडे भांडी घासायची. बरोबर कधीमधी सरस्वती असायची. एकदा जोशी डागदर तिच्या मायला म्हणाले 'सरस्वती हुशार आहे. शाळेत पाठवा!' तव्हा तिच्या मायनं तिला शिकवलं पाचव्या वरगापर्यंत! तिच्या लगनासाठी बापानं खूप पायपीट केली. शाहरचा अन शिकलेला मुलगा मिळाला नाही. त्यांचे भाव पन लईच. तव्हा दिली भागामायला सून म्हणून. नवरा आडमुठ मिळाला.

भागामाय लई कजाग. तिचा खाक्याच येगळा. सरस्वती पहिल्यांदा नांदायला आली तव्हाची गोस्ट. सरस्वती गाडीतून खाली उतरली. नव्या नवरीनं उंबरठ्यावर पाय ठेवला तव्हा भाकरीचा कुटका ओवाळून टाकता टाकता भागामायनं तोफ डागली, 'सुनबाय, हे खेडंगाव. वाकडा भांग आन नट्टापट्टा चालायचा नाय! सुनेनं सुनेपरीस

वागावं !' या पहिल्या फेरीत सरस्वतीचा किल्ला जमीनदोस्त झाला व्हता.

भागामायनं हुकमत गाजवायला सुरुवात केली. सुनेला ढोरासारखं राबवू लागली. तोंडातून गोड शब्द निघंल तर शप्पत ! नेहमी वटवट. आदळआपट. धुरकटल्या चेहऱ्यानं वागायची. जळजळीत नजरेनं बघायची. सारा गाव गिरणीचं पीठ खायचा. पन सरस्वतीला भल्या पहाटं उठून जात्यावर बसावं लागे. एकदा सरस्वती काम करून खूप थकली. गाढ झोप लागली. दळायला उठायचं भानच राहिलं नाही. तर सासूनं सरळ तिच्या बुचड्याला हात घातला. एकदा भाकर जळाली व्हती, तर भागामायनं तश्शी गरम भाकर तिच्या गालावर फेकून मारली.

बापाच्या इथं खेळून खाल्लेल्या सरस्वतीला इथं सकाळी दळण दळावं लागे, मंग सारवण, शेण काढणे, धुनं धुने, स्वयंपाक करणे आन शेतात उन्हात पऱ्हाट्या गोळा करणे इ. कामे करावी लागत. ती च्यार महिन्यातच सासरला कंटाळली. 'बापूनं कसं वाळवंटात आणून सोडलंय...इथं माजं कुणी नाय !' असा इच्यार आला की ती रातभर रडत बसायची. नवऱ्याचा काही आधार नव्हता. उठल्यासुटल्या भाईर पळायचा. एका दिवशी भागामाय त्याला म्हणाली, 'भडव्या, काही लाज शरम, भाईर काय जातूस राती ? घरी शानीसुरती बाईल...' तव्हा कुठं आला. बोलला नाय, हसला नाय !

अंधारात आला, जनावरासारखं वागला.

सरस्वतीचा जीव गुदमरू लागला. 'काय करावं ? बापूला कळवावं ? कार्ड मिळवायचं कसं ? लिहायचं कसं ? का जाऊ बापूकडं पळून ? पन... बापू पुन्हा आणून घालायचा... काय करू ? सासुरवासातून सुटका कशी व्हयील ?' अशा इच्चाराच्या भुंग्यांनी तिचं डोकं पार खाऊन टाकलं व्हतं.

भागामायची सून भर अर्ध्याराती चिरकली. भागामायची झोप खाडकन् उडाली अन् ती ताडकन् उठून आपल्या खाटेवर बसली. काळीज जोरानं धडधडू लागलं. ढाळजत झोपलेला सरस्वतीचा नवरा जागा झाला. काळजात कसं लक्कन् झालं त्याच्या. उघडाबोडकाच तो भागामायकडं आला.

'मा, काय झालं वं ?' त्यानं घाबरून इच्चारलं.

'कायजनू बाप्पा ! सुनबायच्या खोलीतून आवाज आला. झोपत चिरकली जनू !' भागामाय कशीतरी बोलली.

'बघतो...'

'गण्या, डोस्क्यावर पागुटं ठिव ! पायात खेटरं घाल !'

'कशाला ? घरात खेटरं नेऊ ?'

'ने. आरंऽ आज आमुष्या हाये !'

पुन्हा किंकाळी. दोघांचंही काळीज कापीत गेली. 'गण्या, लक्षणं ठीक नाहीत. कंदिल पेटव... घरात अंधार हाये !'

गणानं अंधारात चाचपडत खुंटिवरला कंदिल काढला. त्याचं हुरदय धडधडत व्हतं. हात थरथरत व्हता. माचीस सादळल्यामुळं आगकाडी काही पेटेना !

कसाबसा कंदिल लावला. इतक्यात—

'मी आल्येय्...' पुन्हा घरातून कर्कश आवाज. मायलेक दचकलेच. दोघांच्याही अंगातून रघत जोर जोरानं वाहू लागलं.




'गण्या, मी येते बरोबर !' असं म्हणत भागामाय खाटंखाली उतरली.

दोघंही घाबरत घाबरत, दबकत दबकत, हळूहळू सरस्वतीच्या खोलीत आले आणि नुसते बघतच राहिले. सरस्वतीचा भयंकर अवतार !

सरस्वतीचे केस मोकळे. कपाळास शेंदूर. भांगात शेंदूर ! कपडे विस्कटलेले. उभी राहून झुलू लागली. डोळे गरगरा फिरवू लागली., 'अं हं : अं हं : उं हूं : !' भागामायला बघताच ती ओरडली, 'ये ये थेरडे ये ! मी तुला नेणार हाये... मी...अं हं: अं हं: मी मरीआई... हूं: हूं: !'

दोघांचे पाय जमिनीला खिळले. शरीर बधीर झालं... रघत गोठलं जनू. म्हूनच त्यांना संकरच्या हाका ऐकू आल्या नाही. संकर भायरून जोरजोरानं दार बडवू लागला, 'गण्याऽऽ ए गण्या !' कुणीच जागचं हाललं नाही. तशी सरस्वती गणावर— नवऱ्यावर— खेकसली, 'आरं असा काय उभा मुडद्यावानी ! जा दार उघड. माजी भगतीन आली... शांती आली !' तव्हा कुठं गणानं धडपडत दार उघडलं.

'संकर हा रातचा कसा आलास ?' गणानं मऱ्या आवाजात इच्चारलं. 'गड्या माफ कर. या बायलीनं इथं आणलं. ती म्हंते तिला सपन पडलं. मरीआई दिसली सपनात. काहीतरी वंगाळ व्हणार हाये म्हणती. देवी म्हणाली, मी सरस्वतीच्या अंगात जात्ये... बायकूनं टुमणंच लावलं की चला भागामायच्या घरी...' संकरचा खुलासा.

'आँ... ? मरी आई ! हं... हो... हो !' गणा पुटपुटला. त्यो संकर अन् शांतीला घेवून सरस्वतीच्या खोलीत आला. सरस्वतीचा ताल बघून सकर पन मनात टरकलाच. भागामायची कवाचीच दातखिळी बसलीय ! सरस्वती घुमत म्हणाली, 'संकऱ्या आलास !' संकर तिला काहीतरी म्हणणार तोच ती डोळे वटारत संकरच्या अंगावर खेकसलीच, 'चूप ! मी सरस्वती नाही... मी मरी आई... ' गोल गोल फिरत ती घुमू लागली.

'सरस्व...' संकरची उगीच धडपड. शांती घाबरून नवऱ्याला म्हणाली, 'नका कारभारी, उगीच काहीतरी बोलू नका. देवीचा कोप व्हयील !'

'संकऱ्या लई माजलास रेड्यावानी! बायकोला इनाकारण जव्हातव्हा बडवतूस! तुझी माय लई कजाग... जा, पळ घरी. तुझ्या मायला हागवक सुरू झालीय! मी सगळ्या राकेशी सास्वांना खाणार... त्यांच्या राकेशी पोरांना पन उचलणार... हाः हाः!' असं म्हणत तिनं बसकण मारली अन् झुलू लागली.

संकर अन् शांती लगबगा घरी आले. त्याच्या मायच्या पोटात भयंकर खळबळ माजली व्हती, अन् बघता बघता भाईर पळाली तांब्या घेवून... एकदा... दोनदा... रातभर! हातपाय पार गळाले. जागचं उठवेना. म्हातारीला समूर यमदूत दिसू लागले.

भल्या पहाटंच शांती सासूला घेऊन भागामायकडं आली. देवीचं घुमणं चालू व्हतंच. भागामाय आन् गणा रातभर उभेच्या उभे! शांतीच्या सासूला बघून देवी कडाडली, 'ही पापीन इथं? शांते, माजं मंदिर बाटवलंस!' शांतीच्या सासूनं केविलवानी देवीकडं पाहिलं.

शांतीनं देवीच्या अंगावर बेलफुलं–कुंकू–तांदूळ उधळले. पेटत्या गवरीवर ऊद टाकला. निवद ठेवला. खण-नारळ ठेवला. देवीला साष्टांग दंडवत घातला. देवीला इनवलं, 'मरीआई, माझ्या सासुलं माफ कर. आता ती मला छळणार नाय!' संकरनं पन हात जोडून म्हटलं, 'देवीमाय, चुकलं आमचं. दया कर!' संकरच्या मायनं हात जोडले. तिच्यात रामच राहिला नव्हता. बोलू शकत नव्हती. बोलण्याचा प्रयत्न केला पन तोंडातच शब्द घोटाळले.

सगळे हात जोडून उभे व्हते. देवीचं हुः हुः सुरूच.

इतक्यात पारू पन आपल्या हागून वकून बेजार झालेल्या सासूला घेऊन आली.देवीला नमस्कार करून पारू म्हणाली, 'मरीआये, सासुबाईला माफ कर. ती मलं आता छळणार न्हायी. तुज्या रागानंच गंगी मांगणीचा नवरा भिक्या मेला!'

'हुंः हुंः मेला! अंहं, उलथला! माझ्या तावडीतून सुटतो कसा! ...रम्या वांझीचा नवरा, राधी महारणीची सासू कोंडी, कम्या गोसाइनीचा सासरा...ही...ही भागी... उलथणार...एक दोन दिसात!' देवी करकरा दात खात बोलली. भागामायचा जहांबाजपना कव्हाच पळाला व्हता. ती नुसती सरस्वतीकडं टुकू टुकू बघू लागली. गणाचं टकुरं चालत नव्हतं.

शांती, पारू व संकर लई इनवू लागले. तव्हा कुठं देवीनं अभय दिलं. मग हळुहळू ते तिथून घरी गेले.

गावात वणव्यासारखी बातमी पसरली, 'मरीमायचा फेरा आलाय! माणसं मरणार! मुडद्यांचा खच पडणार! भागामायच्या सुनंच्या अंगात मरीमाय आलीय्! शांतीची व पारूची सासू कशीतरी वाचली. भिक्या हागून वकून मेलाय्!'

देवीनं ज्यांची नावं घेतली, त्यांच्या तर तोंडचं पानी पळालं. आणखी एकदोन हागवणीनं बेजार झाले. त्यांनी देवीकडं धाव घेतली.

भागामायचं घर देऊळच बनलं. लोकांची तोबा गर्दी. जत्राच भरली जणू! खणानारळाचा ढीग पडला. उदानं घर दरवळलं! लोक येत, नमस्कार करीत. 'चुकलं माकलं आसलं काही तर माफ कर म्हणत' व जात. दिवसभर देवीनं नुसता हैदोस घातला.

संध्याकाळ झाली. लोकांची गर्दी ओसरू लागली. देवी आता शांत होऊ लागली. पारूनं व शांतीनं देवीला बंगईवर बसविलं व्हतं. संकर पंख्यानं वारा घालीत व्हता. एक बाई बंगईला झोके देत व्हती. जिवावरच्या संकटातून वाचलेली शांतीची सासू भागामायजवळ बसली व्हती. ती भागामायला म्हणाली, 'माय, तुही सून लई पुन्येवान! मरीमायनं पावन केलं तिला... देवीची किरपा झाली म्हून मी वाचले. भागामाय तुजं तू पाहून घे...' असं म्हणत तिनं देवीला बसल्या जागीच हात जोडले.

भागामाय उठली अन् बंगईला झोके देऊ लागली. तसा गणानं संकरच्या हातून पंखा घेतला. देवीला वारा घालू लागला.

अन् याचवेळी शांतीनं, पारूनं, सरस्वतीनं परस्परांकडं चमकून पाहिलं...त्या तिघींचाही चेहरा समाधानानं उजळून निघाला. वाघासारखी नेहमी गुरगुरणारी भागामाय शेळी बनली व्हती.

सास्वांच्या छळाला कंटाळलेल्या सुनांचं सरस्वतीनं संघटन केलं. पाणवठ्यावर कट शिजला! सरस्वतीच्या अंगात मरीमाय आली तर ठरल्याप्रमाणं शांतीनं सासूला पाण्यातून, पारूनं चहातून, दुसऱ्या एकीनं भाकरीतून आपल्या सासवांना परगोलॅक्सच्या गोळ्या भरपूर प्रमाणात दिल्या. गंगीच्या नवऱ्याला हाग–वक झाली ती दारूमुळं. त्यामुळंच तो मेला! या घटनेचा सरस्वतीनं चांगला उपेग केला. सरस्वती नागपंचमीला माहेरी गेली व्हती. सासरी परतताना गोळ्या घेऊन आली व्हती. ☐ ☐




UH 744

पुस्तके

# ' ज्ञानेश्वरी संशोधन : पाटांगण परंपरा—एक अध्ययन '

वि. वा. कुलकर्णी

नागपूर विद्यापीठातील स्नातकोत्तर मराठी विभागातील प्राध्यापक आणि माझे स्नेही श्री. मधुकर रामदास जोशी यानी लिहिलेल्या प्रस्तुत अभ्यसनीय संशोधग्रथाचे प्रकाशन होऊन उणेपुरे वर्ष होत आले आहे विविध नियतकालिकातून गेल्या सहा वर्षापासून प्रसिद्ध होत असलेल्या त्याच्या संशोधनपर स्फुट लेखाकडे जाणत्याचे लक्ष गेलेले आहे. त्याचे लेखन प्राधान्याने प्राचीन मराठी वाङ्मयातील संशोधनविषयाचे मूलग्राही विवेचन करणारे, त्यासाठी हस्तलिखितापासून, ताम्रपट-लेखादी सामग्री व अद्ययावत अभ्यासाचा व निष्कर्षांचा परामर्श घेणारे व पूर्वग्रहरहित असावे, यावर त्याचा कटाक्ष असतो, 'Let the facth speak for themselves' असे ते प्राचीन हस्तलिखिताबाबत त्याना न अवमानता म्हणतात. हस्तलिखिताच्या अध्ययनाचे महत्त्व त्यानी चागले ओळखले, हस्तलिखिताचा सग्रह व अध्ययन यासाठी त्यानी केलेले परिश्रम त्याच्या व्यासगात सूचून भरलेल्या सदर्भामुळे कोणालाही सहज समजणारे आहेत. नाथ सांप्रदाय व त्यातही ज्ञानेश्वरीच्या प्रतीच्या अभ्यासावर त्यांनी अलीकडील ४ वर्षात केलेले चिंतन उल्लेखनीय आहे,

### ज्ञानेश्वरीची राजवाडे-प्रत

ज्ञानेश्वरीच्या कितीतरी प्रती हस्तलिखित स्वरुपात असल्यामुळे, त्याच्यापासून ज्ञानेश्वरी-अध्ययनार्थ होणारा लाभ घ्यावा तेवढा करून घेतला गेला नाही. त्यामुळे ज्ञानेश्वरीच्या विद्यापीठीय अभ्यासाला प्रमाणित व आधारभूत म्हणून मानण्यात आलेली ज्ञानेश्वरीची मुद्रित राजवाडे-प्रत ही चर्चेचा व अभ्यासाचा प्राचीन मराठी वाङ्मयातील एक महत्त्वाचा प्रश्न म्हणून मानण्यात येऊ लागणे स्वाभाविक होते. त्यामुळे रा-प्रतीवर विद्वानांचे अध्ययन केंद्रित होणे क्रमप्राप्त होते. अध्ययनाचे निष्कर्ष अनेक विद्वानानी माडलेले पाहण्यात ज्ञानेश्वरी-अध्ययनाचा आलेख दिसतो. स्वत: राजवाडे शके १२१२ ते १२४० च्या दरम्यान प्रस्तुत प्रत विवेकसिंधुकर्त्या मुकुदराजाकडून लिहिली गेली असे म्हणतात. डॉ. रा. ग. हर्षे याच्या मते प्रस्तुत रा-प्रत गोपाळाश्रम-प्रतीनतरची म्हणजे शके १६३४ नतरची निर्मिती होय. योगमार्तण्ड-कर्ता मुकुद रा. प्रतीचा सग्राहक असावा असे कानोले याना वाटते. विद्वद्वर्य बनहट्टीनी माडगावकरी पाटागण प्रत जनीजनार्दनानतरची असल्याचे आणि रा प्रत व फा. प्रत या या दोहोत आवळया-जावळया बहिणीइतके सादृश्य असल्याचे व फाटक प्रतीतील पाठ राजवाडे प्रतीतल्यापेक्षा जुने व विश्वसनीय असल्याचे म्हटले आहे. वि. मो. केळकराना फाटक प्रत एकनाथ-संशोधित प्रत वाटते व राजवाडे प्रत ज्ञानेश्वरकालीन वाटते. एकनाथ-प्रतिशुद्ध सहितेची रा. प्रत नक्कल असावी असे ना ब जोशीना वाटते. भाषा-व्याकरण-दृष्टया साप्रदायिक प्रतीच्या अग्राह्यतेबद्दल मगरूळकरानी लिहिले, तर रा-प्रतीच्या अर्थ, पाठ, ओव्याची मांडणी याबाबत सोनोपत दाडेकर प्रतिकूल अभिप्राय व्यक्त करतात व आणखीही काहीचे दृष्टिकोन व्यक्त झालेले आहेत. वरील सर्वांनी केलेल्या व्यासगाबद्दल वाद नाही, तथापी काहीना योग्य दिशा व आवश्यक ती सामग्री याचा लाभ झाला असता तर त्याच्या व्यासगाचे फलीत आहे त्यापेक्षा वेगळे झाले असते.

### राजवाडे-प्रत व प्रा. जोशी

प्रा. मधुकरराव जोशीचे लक्ष रा-प्रतीतील गीतासहितेच्या अशुद्ध लेखनाकडे गेले. तीतील श्लोक व सबंद्ध ओव्याची मांडणी व पाठ त्यांच्या चिकित्सेचा विषय झाला. ज्ञानेश्वरीच्या रा-प्रतीशी जुळणारे कित्येक पाठ देणाऱ्या अनेक हस्तलिखित प्रती त्याना आढळल्या, तेव्हा रा-प्रतीचे कोडे उकलण्याची जबर जिज्ञासा त्याना अस्वस्थ करू लागली. मूळ ज्ञानेश्वरीचे स्वरूप व सहिता केवळ एकाच प्रतीत सुरक्षित आहे असा जो समज होतो तो ज्ञानेश्वरीच्या अनेक हस्तलिखीत प्रती पाहिल्याने दूर होतो, हे त्यांना आढळून आलेले सत्य प्रा. जोशीनी मांडले हे फार चागले केले. मूळ ज्ञानेश्वरीचे नव्हे, सपूर्ण ज्ञानेश्वरीचेही नव्हे, तर ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखितांच्या विविध परंपरापैकी एका परंपरेच्या प्रातिनिधिक प्रतीचे अध्ययन रा-प्रतीच्या अध्ययनामुळे होते व त्यामुळे पाटंगण-परपरेच्या अभ्यासास प्रारभ होतो हे त्याचे विधान महत्त्वाचे आहे. रा-फा प्रतीवरून काढलेले निष्कर्ष स्व परपरेचे यथार्थ स्वरूप दर्शविणारे होत नाहीत, तसेच अन्यपरपराच्या स्वरुपाबद्दल त्यामुळे अपसमज होतात. हस्तलिखिताचे वर्गीकरण, त्याच्या विविध परपरा, त्यांचे अन्योन्य अनुबंध, प्रतकारासमोरची प्रत, तिचा पूर्वेतिहास इत्यादी तपशीलाच्या सम्यक् अभ्यासामुळे मूळ ज्ञानेश्वरीच्या स्वरुपाच्या जवळात जवळच्या प्रतीजवळ जाण्याचा प्रयत्न अभ्यासकाने करणे योग्य होईल.

एकनाथ-प्रतिशुद्ध ज्ञानेश्वरीच्या स्वरुपाबद्दल व्यक्त झालेली प्रतिक्रिया व त्यातील एकनाथाबाबतची अवहेलना प्रा. मधुकररावाना निर्मूल, भ्रममूलक व अस्थानी वाटणे, त्याच्या हस्तलिखिताच्या अध्ययनाधारे प्राप्त होते. विविध सदर्भ देऊन त्यानी आपले विचार माडलेले आहेत. ज्ञानेश्वरी संशोधनाचे जे स्वरूप आधुनिकासमोर असेल त्याचा पगडा दूर करून स्वत: एकनाथच त्याबाबत जे म्हणतात ते प्रमाण मानून त्याच्या ज्ञानेश्वरी प्रतिशुद्ध प्रतीचे स्वरूप व कार्य याचे नव्याने आकलन केल्यावर एकनाथाची भूमिका मूळ ज्ञानेश्वरीच्या जवळच्या प्रतीच्या स्वरुपाला, तसेच त्याच्या सांप्रदायाला न्याय देणारी आहे असे म्हणता येईल.

## अपूर्व उपलब्धी

बीड–पाटांगणात जी माहिती व हस्तलिखिते प्रा. जोशींना मिळाली ती व तंजावरच्या गोविंद बाळस्वामी मठात दा. के. ओकांना उपलब्ध झालेले व प्रथम दुर्लक्षित झालेले टिपण, यांच्या आधारे प्रा. जोशींनी केलेले तर्क उचित आहेत. जनार्दन–एकनाथ गुरु-शिष्य जोडी आणखी असू शकेल ही कल्पना नसल्याने व तसा आधार न शोधल्यामुळे उणीवा उत्पन्न झाल्या. जनिजनार्दनाचे शिष्य एकनाथ या व्यक्तीची निश्चिती त्याच्या दशम-एकादशस्कंधादी रचनेवरून प्रा. जोशींनी केली ही एक उपलब्धी होय. पैठणकर एकनाथ व जनिजनार्दन-शिष्य एकनाथ यांची स्थळ, काल व रचना या बाबतीत प्रमाणे व वैशिष्टचे प्रा. जोशींनी दिली, ती अभ्यसनीय आहेत. ज्ञानेश्वरीची फाटक-प्रत व जनिजनार्दनशिष्य एकनाथकृत दशमस्कंध यातील समाप्तीमुद्रा, नमन, लेखक यातील एकरूपता, व तुलनेने पैठणकर एकनाथांच्या कृतीतील त्या त्या बाबीसंबंधी भिन्नता प्रा. जोशींनी दाखवून फाटक-प्रत यका-जनार्दन नाममुद्रा देणाऱ्या जनिजनार्दन शिष्य एकनाथांची आहे हे सिद्ध केले आहे.

दोन भिन्न एकनाथांच्या निश्चितीच्या पार्श्वभूमीवर एकनाथ–माधवस्वामी संबंधावर प्रा. जोशींनी लख्ख प्रकाश पाडून टिपणाची तथ्यपूर्णता व टिपणातील एकनाथ पैठणकर नसून, उत्तरकालीन जनिजनार्दन शिष्य एकनाथ होत हे सिद्ध केले, ही आणखी एक अपूर्व व उल्लेखनीय उपलब्धी होय. त्या बाबतचे उचित असे श्रेय खास त्यांचे आहे. या उत्तरकालीन एकनाथांचे गुरु जनिजनार्दन व सासरे विसाजीपंत उर्फ विश्वनाथ कोनरे धोलरदेवनूरकर होत. हे विश्वनाथ जनिजनार्नचे मामेभाऊ होते. पृष्ठ २३ वरील त्या बाबतचे विवेचन महत्त्वाचे आहे. उमा–एकनाथ–माधवस्वामी नागनाथ–सिद्धनाथ, सूर्यपंत–रेणुका–समर्थ, कमलाकर– भीमस्वामी– बाळगोविंद यांचा आलेख दिला तो महत्त्वाचा आहे. योग्य प्रकाशाच्या अभावी रास्त माहितीतील तथ्ये दुर्बोध व उपेक्षणीय ठरतात. नव्या दृष्टीने पाहाताच सर्व उलगडा होतो, हे वरील टिपणाबाबत म्हणता येईल.

रा. प्रतीचे प्राचीनत्त्व अप्रमाण असल्याचे प्रा. मधुकररावांनी सिद्ध केले आहे. भाषा–व्याकरणादी व ओवीसंख्या आदी साधनांची एकदेशीयता व मर्यादा, त्याचे यथास्थान महत्त्व ओळखूनही, अभ्यासकांनी जाणणे अवश्य आहे. फाटक-प्रतीच्या अनुरोधाने रा. प्रतीच्या प्राचीनत्त्वाचा विचार करणाऱ्या वि. मो. केळकरांचे-रा. प्रतीचे ज्ञानेश्वरी कालीनत्व व अनुषंगाने महानुभावी साती ग्रंथांचे एककालीनत्व– याबाबतचे प्रा. जोशींचे विवेचन मुळातून पाहाण्यासारखे आहे.

## पाटांगण परंपरा

पाटांगण परंपरा मूळ ज्ञानदेवीनंतरच्या कालौघात एका नकललेल्या पूर्वज प्रतीवरून रूढ झाली. तीत रा. फा. प्रती, अनंत गोपीनाथ-प्रत यांचा अविर्भाव झाला. या परंपरेच्या विघटनास त्यानंतर प्रारंभ झाला, तेव्हा सावळापूरकर प्रत, नंतर जालगिरी प्रत या तयार झाल्या. त्यात पाठमिश्रणाची ordonflation ची समस्या निर्माण झाल्यामुळे गोपाळाश्रमींनी पाटांगण परंपरेच्या ज्ञानदेवी संशोधनाचे कार्य केले, हे प्रा. जोशींनी मांडलेले प्रमेय मान्य व्हायला हरकत नसावी. पाटांगण परंपरेच्या विशदीकरणास त्यांच्या ग्रंथातील प्रकरण नऊ, दहा, अकरा व बारा यातील साधार व सखोल विवेचन उपयुक्त होईल. त्यासाठी त्यानी केलेल्या परिश्रमाचे चित्र त्यांच्या या एका परंपरेच्या परिचयातून देखील संदर्भातून स्पष्ट होते. पाटांगण परंपरेच्या उगमाशी विश्वनाथ कोनेर-प्रत व नंतरच्या अन्य प्रती यात आणखी सदृश प्रती उपलब्ध झाल्यास पाटांगण परंपरेचे पूर्ण चित्र होऊ शकेल.

सात शती गीता व रा. प्रतीच्या गीतासंहितेतील अध्याय १३ तील प्रथम श्लोकाबाबत प्रा. जोशींचे विवेचन विचार करण्यासारखे आहे. दहाव्या अध्यायाच्या श्लोक ७–८ वरील १४ ओव्यांची ज्ञानेशांची टीका रा. प्रतीत व फा. प्रतीत नसणे ही विचारणीय बाब आहे. बीड पाटांगणच्या वंशावळीत विद्याधरांचे नाव आल्यानंतर अन्य दुव्यांच्या शोधासाठी प्रा. जोशींनी दिशा शोधताना मुकुंद बीड पाटांगण वंशात कल्पिला आहे.

## बीड पाटांगण आणि नाथसांप्रदाय

ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखितांच्या विविध परंपरा तयार होण्याचे कारण ज्ञानदेवमुखाने ज्ञानदेवी श्रवण करणाऱ्या योगी, नाथपंथी, वारकरी इत्यादी विविध प्रकारच्या श्रोतृमंडळात असल्याचे प्रा. जोशींनी म्हटले आहे ते विचारार्ह आहे; त्या शिवाय हस्तलिखितात पृथगात्मस्वरूप आले नसते. नुसते लेखनिकाचे हस्तदोष, दृष्टिमांद्य, अज्ञान, अनवधान इत्यादी अशा परंपरांना निर्मू शकणार नाहीत.

पाटांगण-परंपरेत ज्ञानेश्वरी-प्रत नाथसांप्रदायी परंपरेतून आल्याचे प्रा. जोशी सुचवितात. आदिनाथ–कंथडी यातील पहिले आदिगुरु व दुसरे नाथसिद्ध हा एक धागा त्यांनी त्यासाठी आधाराला घेतला आहे. सोपाननाथांच्या शिष्यपरंपरेत नाथपंथी स्वयंप्रकाश ऊर्फ प्रकाशनाथ येतात. सोपानांना वंदन करणाऱ्या शिवाचा पुत्र सहजानंदी टीका लिहिणारा सहजानंद नाथपंथीय आहे हे दाखविण्याी त्यांनी भक्तितत्त्वामृत, हठयोग प्रदीपिका व अमृतानुभवाची सहजानंदी टीका यांचा आधार घेतला आहे. सोपान स्वयंप्रकाश सहजानंद अशा धाग्याने पाटांगण संहितापाठ सिद्ध झाला, असे काही आधार देऊन प्रा. जोशी म्हणतात त्याचा पुनर्विचार झाला पाहिजे.

## काही प्रश्न

जनिजनार्दनांच्या पूर्वपरंपरेवर अधिक प्रकाश पाडणारी सामग्री पुढे आल्यास सहजानंद पिता शिवाची निमित संहिता व



राजवाडे प्रत याची तुलना व अनुबंध यावर अधिक विचार करता येईल. नाथपंथी शिवाने नाथपंथाला अभिमत असे फेरफार करून संहिता सिद्ध केली असे प्रा. जोशींना सुचवावयाचे आहे काय ? ते संहिता विकृत करणे ठरणार नाही का ? वारकरी एकनाथाच्या प्रतिशुद्ध प्रतीपेक्षा राजवाडे प्रत भिन्न दिसते, म्हणून नाथपंथी पाटांगणाची कल्पना प्रा. जोशी मांडीत आहेत काय ? आणि कथडी केवळ नाथसिद्ध आहेत काय ? विसाजीपंताची प्रत एकनाथाना जनार्दनानी सरळ का देऊ नये ? नारायणाकडून एकनाथ–मुकुंदाकडे ती येणे अवश्य आहे का ?

सोपान, विसाखेचर, नामदेव, भानुदास, सत्यामलनाथ, नागनाथ, रंगनाथ मोगरेकर या साधुपुरुषांपैकी कोणा एकाची शिष्यशाखा बीडपाटांगणाशी अनुबंध जोडते काय? पूर्वायुष्यात जनिजनार्दनाचे वास्तव्य विजापूर व भूम येथे होते. तेथे ज्ञानेशाची शिष्यपरंपरा चालत आलेली होती. तेथून जनिजनार्दनांना संहिता मिळाली असेल काय ? असे काही प्रश्न उभे राहातात आणि त्यांची उत्तरे मिळाल्यास वरील प्रश्नांवर काही प्रकाश पडू शकेल.

पाटांगण संस्थानाची २३ दप्तरे मी स्वतः पाहून टिपणे केलेली आहेत व त्याबद्दल विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिकांक १९७१ ( पृष्ठ १७६–१७७ वर ) व वार्षिकांक १९७२ ( पृष्ठ १८१ ते १८८ ) यात लिहून बीड–पाटांगण वंशात स्ववंशीयाखेरीज अन्याला गुरु करण्याचा प्रघात नसल्याचे कळते हे सांगून व त्यावरून गोविंद हेच मुकुंद असल्याचे मी अनुमित केले आहे ते जिज्ञासूंनी अवश्य पहावे. एकनाथ व मुकुंद हे जनिजनार्दनाच्या शिष्य–प्रशिष्यांत असू शकतील. पण त्यासाठी ते त्यांच्या वंशाचेच असणे अपरिहार्य नाही. पाटांगणातील अन्य कागदही शंकराचार्य संबंधित ग्रंथ व त्यांच्या नकला यांनी परिपूर्ण आहेत. नाथसंप्रदायाशी दुरूनही जोडता येण्यासारखा दुर्बलही धागा मला दिसला नाही एवढे मी म्हणू इच्छितो. अर्थात् येथे नाथसंप्रदायाशी संबंध असण्याचे प्रमेय मुख्य नाहीच व त्यामुळे प्रा. मधुकररावांच्या संपूर्ण सिद्धांताला बाध येत नाही असे मी म्हटले पाहिजे.

प्रा. जोशींनी बहुमोलाची भर प्राचीन मराठी वाङ्मयाच्या संशोधन क्षेत्रात घातली हे सर्वजण मान्य करतील. त्यांच्या अनेक अपूर्व उपलब्धीबाबत त्यांचे श्रेय त्यांना दिले पाहिजे. किंबहुना ज्ञानेश्वरी–अध्ययन विषयक सूचीत किती तरी भर टाकणारी बहुमोलाची माहिती त्यांच्या संग्रही आहे. शासनाने किंवा तत्सम संस्थेने आगामी ज्ञानेश्वर जन्म सप्तशताब्दिनिमित्त त्यांचेकडून भरीव असे ज्ञानेश्वर–ज्ञानेश्वरीसंबंधित संशोधन कार्य करवून घ्यावे, असे सुचवावेसे वाटते. त्यांच्या प्रस्तुत ग्रंथाकडे एक दृष्टिक्षेप टाकून सुचलेले विचार मांडण्यात मला समाधान मिळाले, तेवढे मला तूर्त पुरे आहे. ⌑

'ज्ञानेश्वरी संशोधन'
'पाटांगण परंपरा–एक अध्ययन'
प्रा. म. रा. जोशी
मूल्य रु. १०
साहित्य प्रसार केंद्र, नागपूर

---

## कापडगिरण्या मुंबईबाहेर हलवाव्यात, पुढाकार कोण घेणार ? : पृष्ठ ९ वरून

पण आज सामान्य माणूस जागृत होत असल्याची नवीन चिन्हे दिसत आहेत. ग्राहकराजा निद्रेतून जागा होत आहे. म्हणून पुन्हा एकदा प्रत्यक्ष कृतीचा विचार करणे आवश्यक वाटू लागले आहे. ह्या दृष्टीने किमान कार्यक्रम सुचविता येईल. तो असा.

१ : मुंबई व तत्सम मोठ्या शहरातील कापड गिरण्यात तयार होणाऱ्या मालावर ग्राहकसंघटनांनी बहिष्कार टाकावा. इतर भागातील, विशेषतः मागास भागातील कारखान्यात तयार झालेला माल स्वीकारावा.

२ : मुंबई–पुणे बाहेरील जनतेमध्ये जागृती अधिक प्रमाणात झाली पाहिजे. कारण कापडगिरण्या व इतर उद्योगधंदे जर आजपर्यंत उपेक्षित राहिलेल्या भागात गेले तर त्यांना त्याचा फायदा मिळणार आहे. मराठवाडा, विदर्भ कोकण इत्यादी मागास प्रदेशातील जनतेत यासंबंधी लोकमत जागृत करण्याची तजवीज व्हावयास हवी.

३ : स्थानिक पातळीवर ज्या संस्था व यंत्रणा असतील त्यांच्यावर अधिक जबाबदारी पडते. जिल्हा परिषदा, तालुकापंचायती, सहकारीसंस्था इत्यादी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी यासंबंधी आग्रह धरला पाहिजे; सरकारवर दडपण आणले पाहिजे; त्याचबरोबर त्यांच्या प्रदेशात कारखाने फायदेशीररीत्या कसे चालतील, त्यासाठी काय उपाययोजना हवी याचीही अभ्यासकाच्या दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे.

४ : कारखाने मुंबईशहरातून हलविण्यात अनेक अडचणी व प्रश्न आहेत. त्यात काही तांत्रिक स्वरूपाच्या तर काही आर्थिक स्वरूपाच्या आहेत. त्या सर्व प्रश्नांवर तोडगा मिळू शकतो. निरनिराळ्या क्षेत्रातील संशोधक व अभ्यासक यांनी या प्रश्नाचा विचार करून उपाययोजना सुचविली पाहिजे.

५ : आजारी म्हणून गणल्या जाणाऱ्या गिरण्या मुंबईतच प्राणवायू देऊन टिकविण्यात अर्थ आहे की नाही हे पाहिले पाहिजे. या गिरण्या मोडीत काढून त्या ऐवजी नवीन गिरण्या मुंबईबाहेर काढणे योग्य ठरेल असे वाटते. सरकारने याबाबत पहिले पाऊल टाकावे व इतरांना उदाहरण घालून द्यावे.

६ : सरकारी खाती, सार्वजनिक क्षेत्रातील संस्था, जिल्हापरिषदा यासारख्या शासनयंत्रणा, शैक्षणिक संस्था, इत्यादी क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी आपल्या संस्थांना लागणारे कापडचोपड मुंबईबाहेरील गिरण्यातून घ्यावे. यासाठी त्यांचे हरतऱ्हेच्या वस्तू खरेदी करण्यासंबंधीचे धोरण तपासून पाहाण्याचे काम नागरिकांच्या संघटनांनी, पत्रकारांनी करावे व जनतेसमोर या धोरणाची तपशीलवार चिकित्सा करावी.

७ : मुंबईबाहेरील गिरण्यांनी आपला माल विकण्यासाठी अधिक प्रयत्नही करावयास हवे. खास दुकाने काढून त्यास प्रसिद्धी द्यावी.

८ : वर सांगितल्याप्रमाणे फार मोठा कामगारवर्ग या उद्योगधंद्यावर अवलंबून आहे. त्यांच्या जीवनाची घडी या हालचालीत विस्कटून जाण्याची शक्यता आहे. साहजिकच त्यांना प्रथम याची झळ सोसावी लागेल. म्हणून त्यांना नवीन उद्योगात प्राधान्य मिळणे व त्यांच्या पुनर्वसनासाठी जे काही करावे लागेल त्याचा विचार करणे आवश्यक आहे, त्यांची मनोभूमिका तयार करण्याची अवघड जबाबदारी समाजावर पडते. त्याचे सहकार्य या कामासाठी आवश्यक आहे. ☐ ☐

पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचा रौप्यमहोत्सव नुकताच साजरा करण्यात आला. या ग्रंथालयाची समाजातील ग्रंथप्रेमी नागरिकांना ओळख व्हावी म्हणून श्री. वि. शं. पारगावकर यांनी जयकर ग्रंथालयाचे ग्रथपाल श्री. कृ. शं. हिंगवे यांची घेतलेली मुलाखत.

# जयकर ग्रंथालय

◻ जयकर ग्रथालयाच्या सुरुवातीपासून तुम्ही ग्रथपाल आहात. आज या ग्रथालयाचा रौप्य महोत्सव तुम्ही अनुभवीत आहात. या प्रसंगी तुमच्या भावना काय आहेत ?

आपला मुलगा मोठा झाला, त्याला मान–मान्यता लाभली, लौकिक लाभला, त्याच्या हातून विद्यादानाचे, ज्ञानप्रसाराचे कार्य होत आहे, समाज त्याचे कौतुक करीत आहे हे पाहून व ऐकून मुलाच्या वडिलांना जसा आनद वाटतो, समाधान लाभते तीच भावना जयकर ग्रथालयाच्या सदर्भात माझी आहे.

सस्थेच्या सदर्भात, विशेषत: ग्रथालयाच्या सदर्भात २५ वर्षांचा काळ फार मोठा नाही. २५ वर्षापेक्षा जास्त काळ अस्तित्वात असलेली अनेक नामवत ग्रथालये पुण्यात आहेत आणि म्हणूनच २ जानेवारी १९७५ रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमास महोत्सव न समजता आतापर्यंत या ग्रथालयातर्फे झालेल्या कार्याचे मूल्यमापन करणे, काही उणिवा असतील तर त्या सुधारण्याची सधी घेणे व सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल सदिच्छा व्यक्त करणे असा आहे.

◻ पहिला ग्रंथपाल म्हणून तुमच्या आकांक्षा काय होत्या ? काम करीत असताना प्रत्यक्षात तुमची स्वप्ने साकार झाली का ?

आकाक्षा साधी परंतु मौलिक होती अशी माझी समजूत आहे. ज्ञानप्रसाराचे कार्य हे एक पवित्र काम आहे असे मी मानतो. स. प. कॉलेजमध्ये शिकत असतानाच तेथील ग्रथालयात मी काम करीत असे. त्यावेळी माझ्या मनात असे विचार येत असत की शिक्षक, अध्यापक याच्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्ती होते खरी. परतु ग्रथ आणि ग्रथालये यामुळे विद्यार्थ्यांनाच काय परतु समाजातील कोणत्याही व्यक्तीला ग्रथाचा, ज्ञानाचा अखडपणे आस्वाद मिळविता येणे शक्य आहे. आपल्याला हे करण्याची संधी मिळेल अशी मला त्यावेळी कल्पना नव्हती. ' ग्रथ आणि ग्रथालया 'ची महती पुस्तकामधून वाचीत असे. परंतु ग्रथांची उपयुक्तता वाढविणे हे वेगळेच तत्र आहे असे नंतर लक्षात आले. ग्रथालयाची उपयुक्तता वाढविण्यासाठी ग्रथप्रेम आणि लोकांच्याबद्दल आत्मीयता निश्चितच लागते. परंतु तेवढ्याने भागत नाही. मोठ्या, सदैव वाढत्या ग्रथालयाची इमारत वरील दोनच खांबावर उभारली तरी तो आधार पुरत नाही. त्यासाठी सुव्यवस्थापन लागते. ग्रंथालयाच्या सुव्यवस्थापनात दर्जेदार ग्रथसंग्रह, वाचकाच्या सोयी, ग्रंथालयाची रचना, सदर्भसेवा, संशोधकांना मार्गदर्शन इ. सर्व तपशिलाचा समावेश करावा लागतो. वरील प्रयत्न यशस्वी करण्याची माझी आकांक्षा होती. सुदैवाने ही सधी मला लाभली. बऱ्याचशा प्रमाणात माझे स्वप्न साकार झाले असावे असे मला वाटते.

◻ ग्रथपाल म्हणून तुमच्या यशापयशाचा जमाखर्च काय ?

या प्रश्नाचे उत्तर देणे जरा अवघड आहे. परतु प्रयत्न करतो. ' यशापयश ' ही गोष्ट सापेक्ष आहे. माझ्या दृष्टिकोनातून मानलेला यशस्वीपणा इतराना मान्य होईलच असे नाही. काहीना मान्य असेलही ! काहीना नसेलही ! पत्करलेले काम मन ओतून, त्यात रस निर्माण करून करीत रहाणे एवढेच तत्त्व मला गवसले होते. त्याचा मी पाठपुरावा करीत आहे एवढेच ! माझ्या अपेक्षित कार्यात मी यशस्वी झालो किंवा नाही हे इतरानी ठरविणे औचित्यपूर्ण ठरेल.

जयकर ग्रथालय हे एक आदर्श ग्रथालय असे म्हटलेले ऐकतो. कुणी लिहिले असले तर वाचण्यात येते. हा आदर्श निर्माण करण्यास माझे नेतृत्व लाभले असले आणि ते माझे यश समजण्यात आले तरी त्यात अनेकाचा वाटा आहे. त्यामागे अनेकाचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य, मार्गदर्शन आणि सदिच्छा आहेत.

विद्यापीठासारख्या मोठ्या व सदैव वाढत जाणाऱ्या ग्रथालयात, नियोजन करणे व सहकाऱ्याकडून कार्यक्षमतेने कामे करवून घेणे हीच कामे प्रमुख ग्रथपालाला करावी लागतात. डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिटयूटमधील व पुणे विद्यापीठातील प्रारभीची वर्षे सोडली तर वाचकाशी माझा प्रत्यक्ष सबध कमी होऊ लागला. जसे ग्रथालय वाढू लागले, त्याप्रमाणात पुस्तकाची देवघेव करणे, त्यांना सदर्भ देणे, मार्गदर्शन करण्यासाठी स्वतत्र सेवकवर्ग नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली. आणि या सर्व विभागप्रमुखाच्या कार्यतत्परतेमुळे मला माझ्या अपेक्षित कार्यात यश मिळू शकले.

◻ तुम्ही व्यवसायाने ग्रथपाल आहात का धर्माने ? ग्रथप्रेमी वाचकाचे काही अनुभव तुम्ही या प्रसगी सागू शकाल काय ?

मी ' धर्माने ' ग्रथपाल आहे आणि ग्रंथपाल म्हणूनच मला धन्यता वाटेल ! सगळेच प्राध्यापक झाले, सगळेच सशोधनाचे कार्य करू लागले तर या सर्वांना लागणारी साधने सुव्यवस्थितपणे सघटीत (Organize) करण्याची जबाबदारी कोण पत्करणार ? ती ग्रथपालानीच– ग्रथालयाचा व्यवसाय ज्यांनी पत्करला आहे त्यांनी– पत्करली पाहिजे. ग्रंथपाल हा मनाने ग्रंथपाल पाहिजे. कर्तव्य म्हणून तो ग्रथालयात काम करीत राहिला आणि त्याचे मन जर दुसऱ्या

कक्षात असेल तर वैयक्तिक त्याचा व ग्रंथालयाचा फायदा होणार नाही. ग्रंथपालाला ग्रंथप्रेम, ज्ञानलालसा, वाचकाबद्दल, संशोधकाबद्दल आस्था असणे हे जेवढे अगत्याचे आहे तेवढीच आस्था, कुतूहल त्याला ग्रंथालयीन तंत्रासबंधी असणे अत्यावश्यक आहे.

¤ ग्रंथालय आणि ग्रंथपालाविषयी विशिष्ट अपेक्षा असतात. त्या पुऱ्या करताना अनेक अडचणी येतात. त्यातून तुम्ही कसा मार्ग काढता ?

माझ्या व्यावसायिक जीवनातील ३६ वर्षे संशोधक व विद्यापीठ ग्रंथालयात गेली. या काळात अनेक व्यासंगी, विद्वान, ग्रंथप्रेमी वाचकाशी माझा संबंध आला. वाचकाच्या ग्रंथप्रेमापेक्षा प्रत्यक्ष व्यवहारातील आचरणामुळे अनेकाच्याबद्दल माझ्या मनात जवळीक निर्माण झाली, आदर दुणावला व स्नेह जडला.

विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे, संशोधकाचे ग्रंथप्रेम मला निरनिराळ्या स्वरूपात पहावयास मिळाले. ' व्यावहारिक मर्यादां 'चा विचार करण्याची मला गरज नाही. मला हवे हसलेले प्रत्येक पुस्तक ग्रंथालयाने विकत घेतलेच पाहिजे, असा हट्ट करणारे आणि वीस-पचवीस पुस्तकांची चळत जिन्यावरून घेऊन जाणारे प्रा. शंकरन् मला भेटले. दररोज न चुकता ग्रंथालयात येऊन आपल्या विषयाच्या प्रत्येक पुस्तकाशी हितगूज करणाऱ्या कै. टी. एस. शेजवलकरांची आठवण मी विसरू शकत नाही. आपल्या विषयावर नवीन कोणती पुस्तके, कोणते लेख प्रसिद्ध झाले आहेत याचा मागोवा घेण्यासाठी व्रताप्रमाणे जयकर ग्रंथालयात येणारे, वाचन व चिंतन करणारे ग्रंथालयाच्या नियमाचे ततोतंत पालन करणारे, ग्रंथालयातल्या सेवकाना प्रसंगी मार्गदर्शन करणारे रँग्लर नारळीकर यांच्याबद्दल माझ्या मनात आदराची भावना निर्माण झाली आहे. दिवसभर अध्यापन, संशोधन केल्यानंतर सायंकाळचा वेळ ग्रंथालयात व्यतीत करणारे डॉ. नागराजन् व आपल्या विषयाचा ग्रंथसंग्रह समृद्ध करण्याच्यादृष्टीते मला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे माझे हितचिंतक आहेत असे मी मानतो. महानगरपालिकेच्या व्यवस्थापनाचा प्रचंड भार डोक्यावर असतानाही जेवणाच्या सुट्टीत जयकर ग्रंथालयात नियमाने डोकावणारे कमिशनर भावे यांच्याबद्दलची आठवण माझ्या मनात कायमची ठाण माडून बसली आहे. स्वत च्या नावावर ग्रंथालयातले पुस्तक नेऊन ते आपल्या मित्रामध्ये महिनेच्या महिने फिरविणाऱ्या नानाकाका भाटयाबद्दलही मला आत्मियता वाटत होती. कारण त्यांना ग्रंथप्रेम होते ! माझ्याप्रमाणे माझ्या मित्रानी चांगली चागली पुस्तके वाचावीत असे त्यांना वाटत असे. डोळयानी दिसत नाही परंतु वाचनाची मनस्वी हौस ! ती भागविण्यासाठी ' रीडर ' नेमणारे व जयकर ग्रंथालयातील पुस्तके वाचावयास नेणारे वि. द. घाटे यांच्या ग्रंथप्रेमाला तोड नाही.

आपल्या मर्यादित मिळकतीपैकी रक्कम नियमाने ग्रंथखरेदीवर खर्च करणारे डॉ. रा. ग. हर्षे याच्यासारख्या ग्रंथप्रेमीबद्दलही माझ्या मनात आदर आहे. दुर्मिळ ग्रंथ सुस्थळी पडावे व त्याचे जतन व्हावे या हेतूने एकेका ग्रंथासाठी पुण्याचे फुटपाथ, जुन्या ग्रंथांच्या दुकानातून पायपीट करणारे वयोवृद्ध कै. पारखीशास्त्रीसारखा अनोखा ग्रंथप्रेमी मला लाभला. आपल्याला शक्य नाही तर आपल्याजवळ पिढयान्‌पिढया असणारा ' सांस्कृतिक वारसा ' (ग्रंथसंग्रह) विद्यापीठ ग्रंथालयाला देणगी म्हणून देणारे अनेक ग्रंथप्रेमी वाचकाशी माझे हितगूज झाले. ग्रंथालयात आलेले प्रत्येक पुस्तक मलाच प्रथम मिळाले पाहिजे आणि ते माझ्यासाठीच आहे या वृत्तीची जोपासना करणारेही ग्रंथप्रेमी भेटले. ' पुस्तक परत करीत आहे. त्यातली काही पाने सुटली आहेत. पुस्तक व्यवस्थित बांधून घ्या. असा निरोप पाठविणारे ग्रंथप्रेमी भेटले आहेत. पुस्तकाचा फायदा केवळ आपल्याला मिळावा या हेतूने ' राज्यशास्त्र ' विषयावरील पुस्तक ' रसायनशास्त्र ' विषयावरील पुस्तकात घुसडून ठेवणारे ग्रंथप्रेमीही आठवतात ! आपल्याप्रमाणेच ग्रंथालयातील साहित्याचा उपयोग इतरानाही करावयाचा असतो या जाणिवेने आपण नेलेले प्रत्येक पुस्तक काम झाल्यावर ताबडतोब परत करणारे कित्येक ग्रंथप्रेमी मला भेटले. पुस्तकामधील आशयाशी व चित्राशी आपले अतूट नाते आहे हे सिद्ध करण्याच्यादृष्टीने ठिकठिकाणी शेरे मारणारे वाचकही माझ्या जीवनात डोकावून जातात. पण ह्या सर्व ग्रंथप्रेमीवर मी प्रेम करतो. ज्ञानप्रसारावर आणि माझ्या व्यवसायावर माझे प्रेम आहे.

वाचकामध्ये ग्रंथप्रेम निर्माण होणे आणि टिकणे ही स्वागतार्ह घटना आहे. परंतु ग्रंथपाल या नात्याने एवढेच म्हणावेसे वाटते की या ग्रंथप्रेमाला स्वार्थीपणाची झालर असू नये. आपल्याप्रमाणे इतरांनाही ग्रंथप्रेम असते, वाचनाची आवड असते, संशोधनासाठी त्यांनाही अनेक पुस्तके लागतात याची जाणीव सर्वच ग्रंथप्रेमी वाचकाना झाल्यास ग्रंथालय हे खऱ्या अर्थाने सरस्वतीचे मंदीर शोभून दिसेल.

ग्रंथालयीन सेवा आणि ग्रंथपालाविषयी वाचकांच्या निरनिराळ्या अपेक्षा असणे अगदी स्वाभाविक आहे. परतु अनेकजण एकच गोष्ट विसरतात ! आणि ती म्हणजे अशी की ग्रंथपालाच्या व्यक्तीत्वाला, अधिकाराला, कर्तृत्वाला मर्यादा असतात, इतराप्रमाणे विद्यापीठाचा ग्रंथपाल हाही एक संस्थेतील सेवक असतो, संस्थेचे धोरण, नियमाची चौकट साभाळूनच त्याला आपले कौशल्य प्रकट करावे लागते. मीही त्याला अपवाद नाही !

' तत्त्व आणि व्यवहार ' या दोहोमधील सुसवाद राखण्याची जबाबदारी ग्रंथपालाला क्षणोक्षणी पत्करावी लागते. वाचक ग्रंथप्रेमी असले तरी माणसेच ! आणि विद्यापीठासारख्या मोठ्या ग्रंथालयात तर माणसाशी– अधिकारी, वाचक व सहकारी व इतर अनेकांचा सतत सपर्क येतो. ज्यावेळी नाजूक समस्या निर्माण होतात त्यावेळी अतिरेकीपणाची भूमिका पत्करून चालत नाही. वैयक्तिक प्रतिष्ठा, मोठेपणा बाजूस सारून ज्यामुळे ग्रंथालयाच्या व्यवस्थापनात स्वास्थ्य, स्थैर्य लाभेल अशा धोरणाचा पाठपुरावा करावा लागतो.

कोणत्याही परिस्थितीत आपण ज्या ग्रंथालयात काम करतो त्याची प्रतिमा शैक्षणिक क्षेत्रात, समाजात डागळता कामा नये. यासाठी काही पथ्येही सांभाळावी लागतात.

विद्यापीठाचा ग्रंथपाल या नात्याने मला ' व्यक्तीनिष्ठ ' ( Subjective ) भूमिके ऐवजी ' वस्तुनिष्ठ ' ( objective ) भूमिका स्वीकारणे क्रमप्राप्त ठरते. व्यक्तिगत हेव्यादाव्यांवरून,

कोणी काहीही म्हटले, टीका केली तरी वाचकांच्या आणि ग्रंथपालाच्या कर्तव्यात मी कधीही कसूर केली नाही. मला तसा अधिकारही नाही.

विद्यापीठाने मान्य केलेल्या नियमांच्या मर्यादामध्ये वाचकांना जास्तीत जास्त पुस्तकांचा लाभ करून देणे हे मी माझे कर्तव्य समजतो. जी पुस्तके बाजारात सहजासहजी उपलब्ध असतात ती कोणालाही उपलब्ध करून देण्यात मी किंवा माझे सहकारी खळखळ करीत नाही. परंतु दुर्मिळ, मौल्यवान पुस्तक मी माझ्या मित्रांनाही देत नाही. मित्राच्या अथवा इतर कोणाच्या हलगर्जीपणामुळे दुर्मीळ पुस्तक हरवले तर त्यामुळे अनेक वाचकांची, संशोधकांची जी गैरसोय होण्याची शक्यता असते त्यापेक्षा मित्राचा रोष मी पत्करतो !

ग्रंथालयीन व्यवस्थापनात कार्यक्षमता निर्माण करण्याच्या वेळी सर्वांना विश्वासात घेतो ! धोरणांच्या व अंमल बजावणीच्याबाबतीत सर्व निर्णय संबंधितांशी चर्चा करून घेतो. यामुळे माझ्या एकट्याचेच मत कोणावर लादण्याचा प्रसंग येत नाही. समस्या निर्माण झाल्यानंतर त्याचे निराकरण करण्यापेक्षा त्या निर्माणच होऊ न देण्याच्या प्रयत्नात असतो.

◻ तुमच्या ग्रंथालयाचा खास वाचक कोणता ? परीक्षार्थी वाचक आणि ज्ञानार्थी वाचक यामधील दरी तुम्ही दूर करण्याचा प्रयत्न करता का ?

या संदर्भातील विद्यापीठ ग्रंथालयातील माझा अनुभव आशादायक व उत्साहकारक आहे. जोपर्यंत एखाद्याची गुणवत्ता केवळ परीक्षेतील यशावरूनच अजमाविली जाते तोपर्यंत परीक्षेच्या दृष्टीनेच विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा वापर केला तर त्यांना दोष देऊन चालणार नाही. विद्यार्थ्यांनी क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त पुस्तके वाचावीत अशी जर अपेक्षा असेल तर आपल्या शिक्षण पद्धतीतच बदल व्हावयास पाहिजे. ग्रंथालय जास्तवेळ उघडे ठेवा, वर्षभर उघडे ठेवा ही मागणी हे मी सुचिन्ह मानतो.

विद्यार्थ्यांना, समाजाला ज्ञान देण्याच्या प्रक्रियेत अध्यापक व व ग्रंथपाल या दोघांनीही वाटा उचलला पाहिजे. काय वाचावे, कसे वाचावे, संशोधन कसे करावे, त्यासाठी कोणती साधने उपलब्ध आहेत यासबंधीचे मार्गदर्शन शिक्षकांनी, अध्यापकांनी, संशोधकांनी करावे. आणि ज्या लक्षावधी ग्रंथांत अमर्याद लेखाच्यारुपाने व इतर साधनांच्याद्वारे हे ज्ञान जतन केले जाते ते वाचकांना तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात सुव्यवस्थापन निर्माण करणे ही ग्रंथपालाची जबाबदारी ! माझ्या मते या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत.

◻ ग्रंथालयाचा फायदा इतर ग्रंथप्रेमी नागरिकांना देखील करून घेता येतो का ?

जयकर ग्रंथालयाचा फायदा केवळ विद्यापीठातील विद्यार्थी, अध्यापक, संशोधक घेतात असा गैरसमज कृपया कोणी करू नये. समाजातील अनेक स्तरांवरील नागरिक या ग्रंथालयाचा फायदा घेतात. तो दिला जावा असेच विद्यापीठाचे धोरण आहे. त्याचा फायदा किती करून घ्यावयाचा हे मात्र समाजातील घटकांवर अवलंबून आहे.

◻ ग्रंथपालाचे ९०% यश त्याच्या सहकाऱ्यांवर अवलंबून असते. असे सहकारी तुम्हाला लाभले आहेत काय ?

एकदम मान्य ! माझ्या मते हा प्रश्नच उद्भवू नये ! माणसाला जन्मापासून मृत्यूपर्यंत इतरांच्या आधारावर जीवन कंठावे लागते. आणि जेथे दैनदिन सर्व व्यवहार इतरांच्या सहकार्याने कार्यक्षम, यशस्वी होऊ शकतो याची जाणीव जर मला नसती तर विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपालाचे पद भूषविण्यास मी पात्र नाही हे आपोआपच सिद्ध झाले असते.

## सहकार्याचे मनोज्ञ प्रसंग

जयकर ग्रंथालयाची समाजातील प्रतिमा हे माझ्या सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याचे उत्कृष्ट उदाहरण समजावे लागेल. अशी किती तरी उदाहरणे देता येतील. पण काही देतो. पुणे विद्यापीठातर्फे १९६३ मध्ये जी अखिल भारतीय ग्रंथालय परिषद् भरली तिचे व्यवस्थापन इतके उत्कृष्ट झाले की अनेकांनी त्याची प्रशंसा केली. हे शक्य झाले ग्रंथालयातील माझ्या मित्रांच्या सहकार्यामुळे ! १९७० मध्ये लांब मुदतीच्या रजेवर जाण्याचा प्रसंग निर्माण झाला. सर्वजण माझ्या घरी आले. तुम्ही काळजी करू नका असा मला धीर दिला. आणि माझ्या गैरहजेरीतही विद्यापीठ ग्रंथालयाचा कारभार अत्यंत दक्षतेने केला. गेल्या वर्षी मी एकाएकी आजारी पडलो. ग्रंथपालन शास्त्राची परीक्षा जवळ येऊन ठेपली होती. मनात काळजी दाटली होती. पुन्हा माझे मित्र धाऊन आले. आपले काम संभाळून माझा विषय शिकविण्याचीही जबाबदारी त्यांनी पत्करली. शारिरिक दुर्बलता असतानाही वर्षानुवर्षे कोणतीही तक्रार न करताना मला सहकार्य देणारे मित्र मला लाभले.

असे किती तरी मनोज्ञ प्रसंग ! ते सर्वच जाहीर केले तर मी निवृत्त झाल्यानंतर ज्या स्मृतिवर माझे पुढील जीवन कंठणे शक्य होईल त्याला मी मुकेन ! आणि म्हणूनच अधिक विस्तार करीत नाही.

एकच इच्छा आहे. २५ वर्षे पालन केलेल्या उपवर झालेल्या कन्येला योग्य वराच्या हाती देण्यास मी उत्सुक झालो आहे. तो क्षण मला लवकरच लाभेल अशी आशा करतो ! ◻ ◻



## भारतीय लोकशाहीला लष्करशाहीचा पर्याय

पृष्ठ ८ वरून

१९६५ मध्ये भारत–पाक युद्धात भारताने लष्करी विजय प्राप्त केला. परिणामी भारतीय जनतेस लष्कराविषयी जी सहानुभूती वाटत होती त्या ऐवजी आता अभिमान वाटू लागला. १९७१ च्या भारत–पाक युद्धातील पाकच्या निर्णायक पराभवाने व बांगला देशाच्या निर्मीतीने भारतीय लष्कराची लोकप्रियता कळसाला जाऊन पोचली.

परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार लष्कराचे सामर्थ्य वाढत गेले. फाळणीपूर्व भारतात सुमारे अकरा हजार आठशे अधिकारी व साडे चार लक्ष सैनिक होते. फाळणीनंतर स्वतंत्र भारताच्या वाट्यास तीन लक्ष दहा हजार एवढे सख्याबळ आले. १९६६ मध्ये ही सख्या आठ लक्ष पचवीस हजार नियमित व पन्नास हजार राखीव सैन्य अशी झाली. पहिल्या प्रथमच काही डॉक्टर्स व इंजिनियर्स याची सक्तीने सैन्य भरती करण्यात आली.

याच काळात नॅशनल कॅडेट कोरही वाढत गेले. १९५८ मध्ये याची सख्या दीड लक्ष होती. ती १९६३ मध्ये तीन लक्ष तीस हजाराच्यावर गेली. १९६७ मध्ये यात खूपच वाढ झाली. पुरुष कॅडेटची सख्या सोळा लक्षाच्या आसपास झाली. दीड लक्ष महिलाही कॅडेटच्या गणवेशात दिसू लागल्या.

चीनच्या आक्रमणानतर लष्करावरील खर्च वाढत गेला. १९६४ मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा ४·१ टक्के भाग सरक्षणावर खर्च होता. १९६७ मध्ये तो ३·२ टक्के झाला, १९६८ मध्ये तो वाढून ३·४ टक्के झाला. पुढे हा वाढतच राहीला. १९७०–७१ साली तो ३·५ टक्के झाला. यात परकीय लष्करी मदतीचा समावेश नाही.

परकीय लष्करी मदतीच्या बाबतीत भारत वाढत्या प्रमाणात रशियावर विसबून आहे. याचे कारण रशियाकडून मिळणारी मदत फारशी शर्तीच्या जाळ्यात गुतलेली नसते. असे असले तरी भारतीय लष्कर राजकीय दृष्ट्या साधारणपणे उजव्या प्रवृत्तीकडे कललेले दिसून येते. याचा अर्थ ते पाश्चिमात्य शक्तीच्या आहारी जाईल असा मात्र नाही. कारण पाश्चिमात्य देशाकडून मिळणारी मदत शाश्वत व खात्रीलायक असेल असा अनुभव नाही. याचाच अर्थ भारतीय लष्कर व्यावसायिक स्वरुपाचे आहे. स्वहित आणि राष्ट्रीयहित याची जपणूक ज्या मार्गाने होईल त्या मार्गाने जाणारे असे आपले लष्कर आहे मग त्यांचा राजकीय झुकाव कोणत्याही बाजूने असो.

वाढती लोकप्रियता व वाढते सामर्थ्य असलेले परंतु व्यावसायिक स्वरुपाचे लष्कर देशावर राज्य करणारी पर्यायी शक्ती होऊ शकेल काय हा प्रश्नच आहे. किमान अशा प्रकारचा सुगावा लष्करी नेत्याच्या उद्‌गारावरून तरी लागत नाही. लष्कराची राजकीय महत्त्वाकांक्षा वाढली असे दाखविणारे काही दिसून येत नाही. अलबत देशातर्गत कायदा व सुव्यवस्था या बद्दल मात्र लष्करी नेते मत व्यक्त करताना दिसून येतात. अतर्गत कायदा व सुव्यवस्थेबद्दल निवृत्त सेनानी जनरल करिअप्पा यानी मध्ये एकदा जाहीर मतप्रदर्शन केले होते. 'तात्पुरती एकतत्री राजवट आणावी, राजकीय पक्षांवर बदी आणावी व राष्ट्रपती राजवट लादून लष्कराच्या साह्याने राज्यकारभार चालवावा असे त्यांनी म्हटले होते. अर्थात राष्ट्रपती व जनता यानी आग्रह केला तरच लष्कराने हस्तक्षेप करावा असेही त्यांनी म्हटले होते. आणखी एक निवृत्त सेनानी जनरल कुमार मंगलम यानी पाकिस्तान व ब्रह्मदेश येथील लष्करी प्रशासन पद्धतीविषयी गौरवोद्‌गार काढले होते. नागरी प्रशासन देशात कायदा व सुव्यवस्था नांदवू शकले नाही तर लष्करातील तरुणरक्त केवळ बघ्याची भूमिका घेईल असेही सांगवत नाही. मात्र लष्कराचे जे व्यावसायिक रूप आहे त्यामुळे ही संघटना देशाचा राज्यकारभार हाती घेणारी पर्यायी शक्ती होऊ शकेल असे वाटत नाही. या उपरही लष्करी सत्ता अस्तित्वात आलीच तर देशाचे प्रश्न सोडविण्यास ही शक्ती पुरेशी ठरेल असे चित्र नाही. फारतर मृदू नागरी प्रशासना ऐवजी कठोर लष्करी प्रशासन अमलात येईल. परतु येथील सामाजिक समस्या, आर्थिक विकास व राष्ट्रीय एकात्मता टिकवून धरणे व वाढीला लावणे याबाबतीत लष्करी राजवट जवळ जवळ निष्प्रभ ठरणार आहे.

### लोकशाही पर्याय :

वरील सर्व विवेचनांती चित्र उभे राहते ते असे:–उतरतीकळा लागलेला कॉंग्रेसपक्ष निवडणुका जिंकीत असला तरी राष्ट्राच्या आशा आकांक्षाचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करीत नाही. गटा गटात वाटले गेलेले विरोधी राजकीय पक्ष सत्ता सपादनाचे सामर्थ्य मुळीच बाळगून नाहीत. कॉंग्रेस पक्षाचे मनोबल खचत असल्यामुळे लोकाचे प्रश्न सोडवीत सोडवीत सत्ता बळकट करण्याऐवजी विरोधी पक्षांच्या चळवळी लष्कराच्या किंवा पोलिसाच्या साह्याने चिरडून टाकण्याची भूमिका मात्र हा पक्ष घेत आहे. लोकशाहीचे भवितव्य केवळ कॉंग्रेसच्या किंवा विरोधी पक्षाच्या मर्जीवर सोपवून चालेल असे दिसत नाही. निवडणुकाच्याकाळात मतसपादनासाठी सत्ताधारी पक्ष व विरोधीपक्ष याची लढत होते एवढ्याच औपचारिक लोकशाहीवर राष्ट्र टिकून राहू शकणार नाही.

जीवनाच्या सर्वच थरावर लोकशाहीची नीट वीण होण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची लोकशाही जीवन पद्धतीच शेवटी तुल्यबल राजकीय पक्षाना विकसित करू शकते. आणि असे विकसित राजकीय पक्षच राष्ट्राला लोकशाही स्थैर्य प्राप्त करून देऊ शकतात. परंतु सर्व स्तरीय लोकशाहीची वीण आज या देशात का होत नाही हा प्रश्नच आहे. या सदर्भात जयप्रकाश नारायण यानी व्यक्त केलेले विचार मननीय आहेत. लोकशाहीची सर्व स्तरावर नीट वीण होण्यासाठी आवश्यक असलेल्या लोकशाहीचा पायाच आपल्याकडे अस्तित्वात नाही. त्याचे चार भाग असे सागता येतील.

१. स्वातंत्र्य उपभोगू शकणारी वृत्तपत्रे आपल्याकडे पुरेशा सख्येने व पुरेशा सामर्थ्याने उभी नाहीत. त्याचे कारण वृत्तपत्राची शेंडी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मार्गाने सरकारने आपल्या हाती ठेवली आहे.

२. लोकशाही प्रक्रियेचा अभ्यास करून त्यातील बऱ्या वाईट घटना स्वच्छ स्वरुपात लोकापुढे माडून त्यासबधी लोकांच्यासमोर विचार ठेवणारा व लोकांच्या लोकशाही मूल्याविषयीच्या जाणिवा प्रगल्भ करीत राहाणारा बुद्धिमताचा वर्ग आपल्याकडे जवळ जवळ नाहीच. अशा प्रकारच्या ॲकॅडेमिक इन्स्टिट्यूशन्सचा आपल्याकडे अभाव आहे.

३. लोकशाहीतील स्वयंदुरुस्तीची प्रक्रियाही आपल्याकडे घडत नाही. एखादी गोष्ट लोकशाहीच्या विरुद्ध घडली तर पुढील वेळी ती दुरुस्त करीत न्यायची हे आपल्याकडे घडत नाही.

४. ॲक्टिव्ह लोकमत आपल्याकडे अस्तित्वातच नाही. काहीही घडले तरी सरकारवर दबाव येईल असे लोकमत क्वचितच आपल्याकडे तयार होते.

हे चारही घटक निष्प्रभ असल्याने लोकशाही सकेनाची घडोघडी व पदोपदी पायमल्ली चाललेली आहे. जयप्रकाशांची ही व्यथा क्रियाशील विचाराला चालना देईल तर सहभागी लोकशाहीच्या आधारावर भारताची नवनिर्मिती योग्य मार्गाने वाटचाल करू शकेल. लोकशाहीला पर्याय लष्कर शाहीचा नसून निकोप लोकशाहीचाच आहे हेच सत्य विचारात घ्यावे लागेल.

# जब्बार पटेल....
# आगे बढो ! आगे बढो !!

## वि. भा. देशपांडे

प्रिय जब्बार,

तू दिग्दर्शित केलेला 'सामना' चित्रपट पाहिला. आवडला. आणि या निमित्तान तुझ्या कला जीवनाचा चित्रपट डोळ्यासमोरून सरकायला लागला...

दहा-बारा वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. तू तेंडुलकरांची 'बळी' एकांकिका पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत सादर करून सर्वांचे लक्ष वेधल होतस. त्या स्पर्धेत अभिनय, दिग्दर्शन वगैरेची बक्षिस मिळवलीस. अजूनही तुझ्या एकांकिकाच्या प्रयोगांचा, त्यांच्या यशाचा आठव होतो, गौरव होतो. पुढं तू पी. डी. ए. त आलास. तिथं अनेक प्रकारची काम केलीस. तिथ तुला एकदम दिग्दर्शन मिळण शक्यच नव्हतं. म्हणून काही भूमिका केल्यास. त्यातली एक भूमिका माझ्याच काय पण अनेक नाट्यप्रेमींच्या स्मरणात कायमची राहील. ती म्हणजे 'खून पहावा करून' या नाटकातील ! डॉ. लागूंच्या दिग्दर्शनाखाली केलेल तुझ ते काम डॉक्टरांच्या इतकच महत्त्वाच ठरल ! पुढ राज्यस्पर्धेत 'वेडा कुंभार'मधल्या भूमिकेला तुला बक्षीसही मिळाल. काही वर्षांनी 'अशी पाखरे येती'च्या प्रयोगान तू साऱ्यांच लक्ष वेधून घेतलस आणि तुझ्या हाताला 'घाशीराम'चा परीस लागला. त्याचं तू सोन केलस. कलावंत म्हणून तू आणखी उंच झालास. केवळ मराठी नाट्य वर्तुळात मोठा झाला नाहीस तर इतर प्रांतातही तुझा लौकिक झाला. मध्यंतरी मी कलकत्त्याला गेलो असताना, उत्पल दत्तांसारखा बंगाली रंगभूमीवरचा थोर कलाकार म्हणत होता–'घाशीराम पाहिल्यावर अस वाटत की, आमची रंगभूमी शंभर वर्षं माग आहे.' त्यांचे ते उद्‌गार ऐकून मी भारावलो. क्षणभर काय बोलाव तेज समजेना. खरोखरीच 'घाशीराम'चं दिग्दर्शन हा मराठी रंगभूमीवरचा चैतन्यदायी प्रकार आहे. त्या नाटकाच्या विषयाबद्दल उलटसुलट खूप चर्चा झाली. पण तुझ्या दिग्दर्शनाबद्दल कुणाचाही मतभेद नव्हता आणि नाहीही ! मराठी रंगभूमीच्या इतिहासात तो एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. आणखी काही काळानंतर त्याच महत्त्व विशेष मोलाच वाटेल !

महाविद्यालयीन रंगभूमीपासून ते राज्यस्पर्धेपर्यंत अनेक तुरे तुझ्या शिरपेचात खोवले गेले. या यशाबरोबरच काही अपयशं तुला आली. आम्हाला तुझ्या सर्वच कलाकृती आवडल्या असं नाही. काही आवडल्या, काही नावडल्या. त्यावर आपण समक्ष खूप बोललो, प्रसंगी मी लिहिलेही. अपयशान तू थांबला नाहीस खचला नाहीस. कलात्मक वाटचाल करीत राहिलास....आता तुला कलेच एक नवं क्षेत्र मिळालय. तुझा 'सामना' पाहून समाधान झाल. त्या चित्रपटाचं परीक्षण वगैरे करण्याचा मानस नाही. फक्त प्रतिक्रिया व्यक्त करतोय. चित्रपट जाणकार त्याचं योग्य ते मूल्यमापन करतीलच. पण मी मात्र एवढ म्हणेन तुझ या क्षेत्रातल पहिल पाऊल खूप काही सांगून जाणारं आहे. चित्रपट क्षेत्रातल्या तुझ्या भविष्य जीवनातील ही एक पाऊल खूण आहे तेंडुलकरांचे संवाद, निळू फुले–डॉक्टर लागू यांच्यासारखे प्रथितयश अभिनेते, आरती प्रभूसारख्या विनीच्या कवीची गीत आणि भास्कर चंदावरकरसारखा नवा वेध घेणारा संगीत–दिग्दर्शक तुला लाभला. तेंडुलकरांनी लिहाव आणि त्याच तू चीज करावस अस समीकरण आता झालय. त्यांच्या संवादाचा सूर तुला सापडलाय– रंगभूमीवर आणि चित्रपटातही ! 'सामना'-तील तेंडुलकरांचे संवाद हा एक स्वतंत्र पण महत्त्वाचा विषय आहे. काही ठिकाणी या संवादाच रूप नाट्य–संवादाशी अधिक जवळचही वाटतं. क्वचित प्रसंगी चित्रपटाच्या गतीला ते संवाद रोखून धरतात, ती गती संथही करतात आणि तरीही ते प्रभावी आहेत, परिणामकारक आहेत. त्या संवादाच वजन निळू आणि डॉक्टरांना पेललय हे नव्यान सांगायचं कारण नाही. पण तूही त्या वजनाला साजेस दिग्दर्शन केलस हे महत्त्वाच. 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' हे आरती प्रभूंचे गीत, तू 'थीम साँग' म्हणून संपूर्ण चित्रपटात वापरून तुझी कलात्मकता सिद्ध केलीस. तपशिलात काही दोषाचा विचार जरूर करता येईल. पण माझ्या दृष्टीन ते महत्त्वाच नाही. सर्वात महत्त्वाच म्हणजे या चित्रपटाच्या दिग्दर्शनात वापरलेला कलात्मक संयम, तो फार मोलाचा आहे. आजच्या मराठी चित्रपटाच्या निर्मितीच्या पार्श्वभूमीवर तर ते अधिक महत्त्वाच आहे. तसच चित्रपटाला आवश्यक ती व्यवसायाची दृष्टी बाळगूनही स्वतःच वैशिष्ट्य ठेवण्याचा प्रयत्न तू केला आहेस. निर्मात्याच्या व्यावसायिक वृत्तीने वाहून गेला नाहीस. कलेतल सत्त्व सोडल नाहीस. चित्रपटात दोन महत्त्वपूर्ण केवळ पुरुष भूमिका असताना हे सार अवघड होत. संवाद हाच ज्याचा प्राण आहे असा चित्रपट हाताळण हे एक आव्हान होत, ते तुला पेलल...आणि याच यशान तू आता आमच्या अपेक्षा वाढवल्यास. 'घाशीरामा'न जस मराठी रंगभूमीत तू नवचैतन्य आणलस, तसच मराठी चित्रपटातही चैतन्य आणायला कारणी झालास तर हवाय. आम्ही त्याची वाट पाहतोय... असाच मोठा हो, खूप खूप मोठा हो...पण त्याचबरोबर नाटक सोडू नकोस. खानोलकरांच्या 'चाफा' कथेवर नाटक होतय, त्यात तू विष्णूची भूमिका करतो आहेस अस ऐकल. तो भूमिकाही एक जबरदस्त आव्हान आहे ते तू स्वीकारशीलच त्याचीही आतुरतेने वाट पाहातोय...आणि त्याच वेळेला एखाद्या नव्या चित्रपटाची घोषणाही ऐकायला मिळेल अशी अपेक्षा करतोय.. ती ऐकेपर्यंत पुन्हा एकदा म्हणेण...जब्बार, आगे बढो ! आगे बढो !! □

फुकट ! फुकट !! फुकट !!!

# पांढरे डाग

आमचे औषध घेतल्याने डागाचा रंग तीन दिवसात बदलतो. तसेच डाग लौकर नाहीसे होऊन त्वचेच्या नैसर्गिक रंगाशी मिळतो. प्रचारासाठी एक फायल औषध फुकट दिले जाते. लवकर मागणी करा.

पत्ता—

DEBTA BHAWAN ( R. L. M. )

P. O. KATRI SARAI ( GAYA)

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १८–१–७५ ते २४–१–७५

### काँग्रेस संघटनेत पुनश्च दुफळीची चिन्हे

कन्या ही कांग्रेस संघटनेची रास असून या राशीचे सुखस्थान मंगळाने दूषित झाले आहे. भारताला आणि खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधी यानादेखील हा मंगळ अनुकूल नाही. पंतप्रधानांच्या समोर अनेक गुंतागुंतीचे प्रश्न गर्दी करून उठणार असून राशीतील रवीच्या सामर्थ्यावर अवलंबून राहिल्या तरी त्यांना यश लाभणे कठीण आहे. वैताग, वैराग्य असे काही तरी त्यांच्या मनावर पगडा बसवू लागेल. संघटनेत त्यांच्या नेतृत्वाला कदाचित याचवेळी विरोधाची चाहूल लागेल. संबंध देशातही विरोधी वारे वाहू लागतील. मात्र अनुचित असे काही घडणार नाही. बिहारचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनेल. मंत्रिमंडळात पंतप्रधानांच्या विरुद्ध हळुहळू वातावरण तयार होऊ लागणार आहे व काही ज्येष्ठ मंत्री तो प्रकटही करतील. राजिनाम्यापर्यंतही पाळी येऊ शकेल. महाराष्ट्रात प्रस्थापित नेतृत्वात बदलाची चर्चा, बदलही संभवतो.

---

**मेष : बढती-बदलीचा योग**

मेष राशीच्या व्यक्ती सध्या तरी विजयाच्या मार्गावर वावरत आहेत. भाग्यस्थानी मंगळ व दशमस्थानी रवी यासारखे सामर्थ्यशाली ग्रह तुमच्या हितासाठी तत्पर आहेत. आता तुम्ही चिंता कशाची व का करता ? रविवार ते मंगळवार व शुक्रवार, शनिवार या दिवसाची कटाक्षाने नोंद घ्या. अपयश आणि असफलता याचा काळ संपून आता विजयाचा काळ सुरू झाला आहे. नोकरीत आता कोणतीच काळजी करू नका. वरिष्ठांच्या मनात तुमच्याबद्दल आपुलकीची भावना निर्माण होणार असून तुमची बढती-बदलीची मागणी पुरी होणार आहे. कृषी, विज्ञान व वाणिज्य शिक्षितांनी सरकारी नोकरीत प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासात लक्ष द्यावे. महिलांना टेलिफोन खात्यात नोकरी मिळेल. शुभराशी २–४–८.

**वृषभ : तब्येतीकडे लक्ष द्या**

मकर संक्रांतीला तुमच्या दैवाचे शुभसंक्रमण झाले आहे. नोकरी व्यवसाय अडचणीवर मात करून प्रगतीकडे झेपावेल यात आता मुळीच शंका बाळगू नका. राशीवर केतू आहे व साडेसाती आहे म्हणून उगाचच मनात संशयग्रस्त राहू नका की मनात धाकधूकही ठेवू नका. कोणतेही काम जबाबदारीने अंगावर घ्या व निष्ठेने पार पाडा. तेवढे सामर्थ्य तुम्हाला रवीने दिले आहे. नोकरीची स्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. नोकरी कायम नसल्यास ती कायम होईल. पदवीधरांनी इंजिनियरिंग उद्योगात नोकरीचा प्रयत्न करावा. कलावंताना प्रसिद्धीचा उत्तम योग आहे. आकाशवाणीवर संधी मिळेल. आर्थिकदृष्ट्या लॉटरीत फायदा होईल. कलाकार महिलांना कलाक्षेत्रात अत्युच्च स्थान मिळेल. गायिकांना मोठा चान्स.

**मिथुन : विवेकाने वागण्याची गरज**

पाचवा हर्शल व भाग्यस्थ गुरू जरी तुम्हाला थोडीफार मदत करीत असले तरी त्यांनी निर्माण केलेले सुख रवी-मंगळ हिरावून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. मंगळ सातवा व रवी आठवा म्हणजे जबरदस्त आव्हानच आहे यावेळी विवेक जागा ठेवा व मन स्थिर ठेवून आलेल्या परिस्थितीला तोंड देणे आवश्यक आहे. आधीच तुम्हाला साडेसाती सुरू आहे. प्रामुख्याने नोकरीत वरिष्ठांकडून मुद्दाम त्रास दिला जाईल, त्यांच्याकडून बोलणी खावी लागतील. पण डोके तापवून अजिबात उपयोग नाही. 'फट् म्हणता ब्रह्महत्या' असे घडू देऊ नका. दलाल, शेअर–ब्रोकर, व्यापारी यांनी कायद्याच्या विरुद्ध जाऊ नये. पैशाची गरज भागेल. कमी पडणार नाही. करारमदार मात्र करू नका. महिलांनी नवऱ्याची मर्जी प्रथम सांभाळावी. मनाविरुद्ध वागू नये. शुभराशी ३–७–११.

**कर्क : घरात लक्ष द्या**

अंतरिक्षातील कर्तुमकर्तुम् शक्ती असलेले रवि–मंगळ–शनि हे ग्रह सध्या तुमच्यावर बरेच नाराज आहेत. हे ग्रह नाराज असताना इतर ग्रहांची राजी असून देखील काही उपयोग नाही. या वेळी प्रामुख्याने तुमची संसारात खरी कसोटी लागणार आहे. पती–पत्नीत क्षुल्लक गोष्टीवरून भांडणे होऊ शकतील. पण तुटेपर्यंत ताणू नये. एकमेकाला समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्याचप्रमाणे मुलांची कटाक्षाने काळजी घ्या. नोकरी–व्यवसायात आशा आकांक्षांना जरा ताब्यात ठेवा. नोकरीत मालकांना–वरिष्ठांना नम्रतेने उत्तरे द्या घटकाभर अन्याय झाला तरी रागाचे पाणी डोक्यावरून जाऊ द्या. स्पर्धा परीक्षेत मात्र यश मिळेल. नोकरीसाठी तुमची निवड होईल. पण प्रत्यक्ष ऑर्डर लांबणीवर पडेल. महिलांनी सार्वजनिक कार्यात काळजी घ्यावी. शुभराशी २–६–८

**सिंह : राहाणी उंचावेल**

सिंह राशीच्या माणसाचे व्यक्तिमत्त्व त्या राशीप्रमाणेच उच्च प्रतीचे असते असामान्य धैर्य, अभ्यासू वृत्ति व कौशल्यपूर्ण वागणूक तुमच्याविषयी आदर वाढवून जातात. त्याला अनुकूल असेच या आठवड्याचे ग्रहमान आहे. इच्छापूर्ती व यश हातात हात घालून तुम्हाला वरदान देणार आहे संधीला सामोरे जा–मागे रेंगाळात राहू नका हेच या वेळी तुम्हाला सांगणे आहे. नोकरीच्या दृष्टीने हा सप्ताह नेत्रदीपक यशाचा ठरावा. तुमची राहाणी उंचावणार आहे. उच्च पदाच्या नोकरीसाठी तुम्ही दिलेल्या इंटरव्ह्यूचा निकाल तुमच्या मनाप्रमाणे लागेल. नोकरी मात्र दूरच्या गावी मिळेल. रासायनिक उद्योग, इंजिनियरिंग उद्योग व शिक्षण यात नोकरी मिळेल. चालू धंद्यात बरकत येईल. वाहन घेण्याची इच्छा पुरी होईल. पैसा मोठ्या प्रमाणात खर्च कराल. महिलांनी उद्योगधंद्यात लक्ष घालावे. शुभराशी ४-६-९

**कन्या : निवासस्थान बदलू शकेल**

मित्र राशीतील मंगळाच्या प्रवेशाने तुमच्याभोवती निवासस्थानाबद्दलची वादळे निर्माण केली होती. तुमच्या मनात काय घडते कोण जाणे अशी भीती निर्माण झाली होती. पण ते पेल्यातील वादळ ठरल्याचा सुखद अनुभव या वेळी येईल. तुम्हाला एका नव्या जागेबद्दल जी इच्छा निर्माण झाली आहे, त्याला अनुकूल अशी साथ मिळेल. बुधवारी

मात्र कोणतेच काम करू नका. चौथा मगळ जरी मनाला धक्के देत असला तरी तो नोकरीत तुमचा दर्जा वाढवणार आहे. तुम्ही वरिष्ठावर प्रभाव पाडू शकाल. काही मागण्यादेखील या वेळी पुऱ्या होऊ शकतील. पैशाची परिस्थिती मागच्या इतकी प्रतिकूल राहाणार नाही. गरजेसाठी चार पैसे मिळतील. महिलांना त्याच्या आकाक्षापूर्तीला अनुकूल ग्रहमान आहे. नोकरीत यश. शुभराशी ५–९–११

## तूळ : कर्तबगारीला मोठे क्षेत्र

चित्रपट–नाटच, सगीत अशा क्षेत्राशी तुमचा निकटचा सबध आहे. तुमच्या या अगभूत कलागुणांना मोठा उठाव मिळणार असून आजवर न लाभलेल्या प्रचड कर्तृत्वाची देणगी या वेळी तुम्हाला मिळणार आहे. नोकरीत सामान्यत चांगलीच अनुकूलता राहील. काही नव्या योजनांबद्दल वरिष्ठाकडून कौतुक होईल. व्यापारी व्यक्तीला उची कापडाचा उद्योग सुरू करायला सधी मिळेल. सिनेमा, नाटक, गायन याचे कार्यक्रम जे कॉंट्रॅक्टर या वेळी लावतील ते नशिबवान ठरतील. गायक–गायिकांना प्रसिद्धी व लोकप्रियता लाभेल. ज्या विवाहेच्छूंचे विवाह ठरत नसतील त्यांचे विवाह ठरतील. काहीचे पार देखील पडतील. राहात्या जागेचा, निवासस्थानाचा प्रश्न सुटेल. महिलाच्या कलागुणाचे मोठे कौतुक होईल. शुभराशी ५–७–१०

## वृश्चिक : राजकारणात सरशी

राशीस्वामी मगळ धनू राशीत आहे व हर्षल अजून तरी व्ययस्थानी आहे. त्यामुळे खर्चाला काही ताळतत्र राहाणार नाही. पैसे बुडवणाऱ्यांना उसने पैसे देण्याची, अनाठायी पैसा उडवण्याची, व्यसनासाठी बेफिकीर खर्च करण्याची तुम्हाला जबर इच्छा होणार आहे. ती टाळण्याची हीच वेळ आहे. नाही तर पश्चात्तापाची पाळी येईल. नोकरीत गुप्त शत्रू उठाव करणार आहेत. पण त्याला तुम्ही भीक घालू नका. या आठवड्यातील एवढी उणीव सोडून दिली तर बरेच काही पदरात घालणारा हा आठवडा आहे. प्रामुख्याने राजकारणी व्यक्ती या वेळी अनेकांच्या कौतुकाचा विषय होतील. एखादे महत्त्वाचे पद त्यांना लाभेल व लोकांत त्याना मोठा मान मिळेल. विवाहेच्छूनी या वेळी थोडे थाबणे आवश्यक आहे. महिलांच्या सेवेचा गौरव होईल. नोकरीत प्रगती. शुभ राशी ६–९–११.

## धनू : चिंता करू नका.

शनि–मगळाचा प्रतियोग सासरिक जीवनात काही अडचणी, आजार, आकस्मिक खर्च व असमाधान निर्माण करीत असला तरीहि निराश होऊ नका. कोणतीच चिंता करू नका. परमेश्वरावर भरिभार ठेवा व निष्ठेने अगीकृत कार्य करीत राहा तुम्हाला काहीहि कमी पडणार नाही. मकर राशीत होणारे रविसारख्या सामर्थ्यवान ग्रहाचे सक्रमण तुमच्याही व्यावसायिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवील. नोकरीत तुम्हाला काही धक्का बसला असेल, बेकारीची टागती तलवार तुमच्या डोक्यावर असेल तर त्यातून तुम्ही निभाऊन जाणार आहा. बेकाराच्या बाबतीत सहानुभूतीचा विचार होऊ शकेल. पैसा भरपूर खर्च होईल. लेखकाना प्रसिद्धी व पैसा मिळेल. महिलानी भावनेच्या आहारी जाऊ नये. नोकरी कायम होईल. शुभ राशी ४–६–१०.

## मकर : दोलायमान स्थिती

तुमच्या राशीत येत्या आठवड्यात रवीचे मकर सक्रमण घडले आहे. ही एक असामान्य घटना आहे यात मुळीच शका नाही. मात्र ही असामान्य घटना तुमच्या दृष्टीने अनुकूल ठरेल असे मानू नये. तुमची विचारशक्ती दुर्बल करायला तुमच्या मनावरचा तावा सुटायला ती कारणीभूत ठरली तर आश्चर्य मानू नये. विशेष करून अधिकारपदस्थ व्यक्तीच्या बाबतीत हा अनुभव तीव्रतेने येईल. बारावा मंगळ धक्का देणारे खर्च निर्माण करील व तुमचे मन आक्रस्ताळे बनवील. नोकरीत दोलायमान परिस्थिती राहील. वरिष्ठाचे बरोबर की स्वतःचे बरोबर हेच ठरणार नाही. त्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. विवाहाचा विचार नको. महिलानी नोकरीत वरिष्ठाशी प्रामाणिक राहावे.

## कुंभ : कौशल्य वापरा

धूर्तपणा, चाणाक्षपणा ही शनीची खाशी वैशिष्ट्ये तुमच्याच ठायी विशेषत्वाने दिसून येतात. पण तुमच्या बाबतीत रवी हा विशेष कार्यप्रवण असतो. तुम्हाला राजयोग प्राप्त करून द्यायचा की कुयोग निर्माण करायचा हे रवीच्या हाती असते. मित्रहो यावेळी रवी तुम्हाला बारावा झाला आहे. त्यामुळे तो तुमच्या प्रगतीच्या मार्गात अडथळेच निर्माण करण्याचा जोराने प्रयत्न करणार आहे. पण तरी सुद्धा दहाव्या मगळाचे असामान्य धैर्य तुम्हाला लाभले आहे. त्याचा कौशल्याने वापर करा आणि नोकरी व्यवसायात तुमचे स्थान निर्माण करा. खते, प्लॅस्टिक, विद्युत उपकरणे व जमिनीचा व्यवहार या सबधीचा व्यवसाय अग धरील. फायदा मिळवून देईल. बेकार पदवीधरांनी यापैकी कोणताही धदा करावा नोकरीत बढती–बदली होईल. अकस्मात विवाह ठरेल. महिलांना लघुउद्योगात नफा होईल.

## मीन : स्वप्ने साकारतील

तुमचे मन सध्या शांत नसले, स्थिर नसले तरी सर्वसामान्यपणे हा आठवडा प्रगतीचा ठरेल. कारण अकरावा रवी आणि दहावा मगळ तुम्हाला पैसा, कीर्ती, प्रतिष्ठा, व्यावसायिक यश मिळवून देणार आहे. तुम्ही कोणत्याही नोकरीत असा यावेळी तुम्हाला वरची जागा मिळणार आहे. तुमच्या खात्यात अशी जागा नसली तरी ती तयार करून तुमची तेथे नेमणूक झाली तर आश्चर्य वाटू नये. या वेळी तुमचा चालू व्यवसाय–व्यापार असो वा इतर कोणताही उद्योग असो त्याला 'सजीवनी' मिळून तुमची चिंता दूर होईल. कोर्ट-कचेऱ्याचे निकाल तुम्हाला अनुकूल असतील. महिलाना प्रवासाचा योग आहे. नोकरीत पगारवाढ. शुभराशी–५–९–११

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## मोहन सैगलचा पब्लिकशी संबंध तुटला नि जादा इंटलेक्चुअलगिरी सुरू झाली !

मोहन सैगल फार पूर्वी ‘ शहीद ’ वगैरे चित्रपट काढणारा बुजुर्ग माणूस. गेली काही वर्षे फिल्मी इंडस्ट्रीला धामधुमीची गेली, त्यावेळी या माणसाने चांगली फिल्म काढण्याखेरीज अनेक भानगडी केल्या. म्हणजे डायरेक्टर्स असोसिएशनतर्फे एक सिनेमाच्या वितरणाची स्कीम मांडली, संगितकारांचे आणि अदाकारांचे सीलिंगची भानगड निर्माण झाली, त्यावेळी हे गृहस्थ लुडबुड करायचे. नवचित्रपट चळवळ, फिल्म सोसायटीज यांच्याशीही यांचा निकटचा संबंध होता. चित्रपट कर्मचाऱ्यांच्या फेडरेशनमध्ये ते पदाधिकारी होते. मनमोहन कृष्ण, माझे मित्र वसंत कुलकर्णी यांचे हे दोस्त होते. थोडक्यात फिल्म इंडस्ट्रीविषयी ज्या ज्या पॉझिटिव्ह गोष्टी चाललेल्या असत त्याच्याशी यांचा संबंध होता. त्यांची सिनेमा निर्मितीची कामगिरी मात्र निगेटिव्ह होती. त्यांनी दोस्तोव्हस्कीच्या गाजलेल्या ‘ क्राईम अँड पनिशमेंट ’वर राजकपूर, मालासिन्हासारखे अदाकार घेऊन एक चित्र काढले त्यात मराठी पेहेरावातील माला सिन्हा आणि खैयाम यांनी पेश केलेले मुकेशच्या आवाजातले टायटल साँग याखेरीज आपल्याला काही आठवत नाही. राजकपूरदेखील आठवत नाही, मग दोस्तोव्हस्की कसा आठवणार ? त्यानंतर त्यांनी एक धंदा करण्यासाठी धर्मेंद्र, विश्वजित आणि साधना यांच्या भूमिका असलेले पिक्चर काढले होते. साधनाला त्या पिक्चरमध्ये चांगली भूमिका होती आणि दादा बर्मननी दोन गाणी बरी दिली होती. पिक्चरने धंदा केला नाहीच. उघडच आहे. मोहन सैगल यांनाही धंदा करण्यासाठी पिक्चर कसे काढावे याचा विचार करायला त्यांच्या इतर फिल्मी उद्योगामुळे वेळ मिळालेला नसावा.

जे सिनेमावाले सिनेमा न काढता फिल्म इंडस्ट्रीच्या कल्याणाची चिंता करतात, त्यांची परिस्थिती आजच्या समाजवादी मंत्र्यासारखी होते. समाजाचे कल्याण तर मनात असते परंतु काहीच न केल्यामुळे व मंत्रीपदामुळे समाजाशी संबंध तुटतो. तसेच रमेश सैगल साहेबांचे झाले असावे. शक्ती सामंता किंवा जे. ओमप्रकाश हे चार पिक्चर्स काढतात, त्यांची दोन चालतात, दोन पडतात. परंतु त्यामुळे ते नेहेमी प्रेक्षकांसमोर असतात, मोहन सैगल यांची पिक्चर्स कधीतरी निघतात आणि ती पडतात आणि त्यांचा प्रेक्षकांचा संबंध तुटल्यामुळे आणि फिल्म इंडस्ट्रीची सतत चिंता वाहिल्यामुळे त्यांना करायला उरते इंटलेक्चुअलगिरी. त्यांची इंटलेक्चुअलगिरी म्हणजेच त्यांचा नवा चित्रपट ‘ संकल्प ’ हा होय !

हे धनिक भांडवलदार, त्याचा बगावत करणारा कोवळा मुलगा, त्या मुलाविषयी विलक्षण आत्मीयता असलेली खुबसुरत भाभी, त्याची प्रेयसी यामध्ये कथा गुंफलेली. तशी फ्रेममध्ये असावीत तशीच ही कॅरेक्टर्स आहेत. आता वडील भांडवलदार म्हणजे ते ठराविक गोष्टी करतातच. उदाहरणार्थ लीडर्सना विकत घेणे, साधुसंत गोळा करणे वगैरे. याच्याविरुद्ध बगावत करायची म्हणजे तुम्ही चोर आहात हे पटवून देण्यासाठी लेक्चर देणे आणि नशापाणी करणे. हिंदी पिक्चरमध्ये पूर्वी नीच जातीतील मुलीचा हात थामणारा मुलगा बापाला जमाना पहाण्याचे ज्याप्रमाणे आवाहन करतो तेच डायलॉग ह्या बगावत करणाऱ्या मुलाच्या तोंडात आहेत. एकूण भांडवलदाराविषयी व त्यांच्या विरुद्ध बगावत करणाऱ्या पिढीबद्दल रमेश सैगल साहेबांना एवढंच कळलं आहे. या बगावत करणाऱ्या मुलाची मार्गदर्शक प्रेरकशक्ती असते एक हिप्पी सुखदेव. आधुनिक नवचित्रपटामध्ये एखाद्या मिस्टरी मॅनसारखा असा एक मनुष्य असतो. त्या धनवानाच्या अजाण पोराला तो धनवानाचे रहस्य पढवत असतो. रमेश सैगल यांचा मुलगा महेश त्या भूमिकेत दिसतोच अजाण. त्यामुळे तो सुखदेवसारख्या सर्वांना ठाऊक असलेलीच फिलॉसॉफी पढतो आणि थिएट्रिकली बकवास करतो. आपली प्रेयसी फरिदा जलालचा त्याग करतो आणि एक दिवस हिप्पींच्या कळपात ‘ दम मारो दम ’ सुरू करतो. त्याच्यामध्ये होणाऱ्या निरनिराळ्या स्थित्यंतराला तसे लॉजिक काही नाही. — + डायरेक्शनही काही नाही. सुखदेवाचे भूत डोक्यावर संवार झाले असल्यामुळे, तो कुठे जाईल—काय करील ते त्या सुखदेवालाच माहीत !

मजा अशी की आपल्याला महेशविषयी सहानुभूती वाटण्याऐवजी, त्याच्या धनवान



**'संकल्प' जिच्यासाठी पहायचा ती फरिदा वाया गेली आणि ती अंजली कदम चमकली !**

बापाविषयी मग सहानुभूती वाटू लागते. अखेर कोठचाही बाप, मग तो एस्टॅब्लिशमेंटचा प्रतिनिधी असला, भांडवलदार असला, तरी आपल्या मुलाला समजावून घेण्याच्या त्याच्याही ह्यूमन लिमिटेशन्स असतातच. महेषची मागणी त्या पलीकडची वाटू लागते. सर्वात सहानुभूती वाटते ती त्याच्या भाभीविषयी—अंजली कदमविषयी. भाभी त्याच्यासाठी तळमळणारी—समजावून घेणारी—धनवानाच्या जगात हरवलेल्या समाधानामुळे गहिवरासाठी तापलेली—अशी भाभी असली म्हणजे महेशसारख्या अजाण मुलाला आई मिळते, खरी मार्गदर्शक मिळते व निवाराही मिळतो. अंजली कदम जी 'जिने की राह 'मध्ये कधी खुलली नाही आणि मराठी चित्रपटामध्ये 'आई, मी कुठे जाऊ ?' या सवालाला ओथंबलेल्या मातृत्वाने उत्तर देऊ शकली नाही, ती विलक्षण पान्हावली—जिवंत झाली. त्याच्या अदाकारीमध्ये जान आली आणि आपल्या अदाकारीच्या जोरावर तिने हा रटाळ, रूक्ष आणि काहीसा बकवास चित्रपट, आईने कडेवरून आपले मूल न्यावे तसे नेले. आपण प्रथमच मानले अंजलीला. ही बाई पडद्यावर का धडपडते आहे असे वाटायचे, पण संकल्पने तिचे काही वेगळे दर्शन घडवले—एक जिवंत अदाकाराचे.

महेशची या पुढची वाटचाल सुरू होते रेगिस्तानमध्ये. आता तो बगावत करण्याचे सोडून आत्म्याचा शोध घेऊ लागतो. आता त्याला नशेबाज मार्गदर्शक सुखदेव बंडल वाटतो आणि खुबसुरत जोगीण सुलक्षणा पंडित हिचे मार्गदर्शनपर बोल प्रकाश देऊ लागतात. 'मी काय करावे ?' यावर विचार करीत धूप आणि बरसात सहन करीत, अन्नपाणी न घेता दिवसच्या दिवस देवाच्या दारी बसतो. त्याच्या अंगावरून साप फिरतो. ही सुलक्षणा पंडित हिच्या लेखी त्याच्या साधनेची पूर्तता असते. त्याला मार्ग मिळालेला असतो आणि आता तो घरी परततो.

तो काय मार्ग असतो, हे आपल्यालाही समजले असते तर बरं झालं असतं. तशी आपल्यालाही काही साधना करायची असते पण, एखाद्या मंदिरात सुलक्षणा पंडित भेटेलच याचा नेम नाही आणि मग धूप—छाव व अंगावर साप खेळताना कोण सहन करणार ? एकूण पिक्चर संपताना आपल्या पाठीमागे सुलक्षणाचे माशुक डोळे आणि तिचे धारदार आवाजातील भारावून टाकणारे भजन आपला पाठलाग करीत रहाते.

महेशचा शोध आपण केव्हाच विसरून गेलेलो असतो ! ◻◻

# अेक वैशिष्टयपूर्ण बँक !


(आमची बँक ही एक वैशिष्टयपूर्ण बँक आहे ती विकास बँक म्हणून कार्य करते.)
समाजातील सर्व घटकांच्या संतुलित विकासासाठी ती प्रयत्नशील आहे.

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | : रु. २५ कोटी |
| अेकूण ठेवी | : रु. १२८ कोटी |
| अेकूण कर्ज | : रु १६५ कोटी |
| खेळते भांडवल | : रु. २३२ कोटी |

शाखा : मुंबईत २५ आणि नागपुरात ६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.

९, बॅंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. श्री. ग. माजगावकर